# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा


इतिहास ग्रंथ क्र. ९८६

ले. विष्णु गोपाळ पिंगे

# शिवाजी महाराजांची राजनीती

८६
२.३.४८३



# सातारचे श्रीमंत छत्रपति शिवाजी महाराज

यांचे वंशाचा

व

प्रतिनिधी आणि अष्टप्रधान यांचा इतिहास.

विष्णु गोपाळ भिडे चिटणीस निजबत पंतसचिव

यांणी तयार करून.

भोर येथील छापखान्यांत छापिला.

मुक्काम भोर.

सन २८४७ चा भादट नंबर २० प्रमाणें ग्रंथकर्त्यानें

आपल्याकडे सर्व हक्क ठेविला आहे.

सन १८६६

शके १७८८

# शिवाजीमहाराजांचा इतिहास.

## भागपहिला

महाराष्ट्रराज्याची स्थापना श्रीमन्माहाराज छत्रपति शिवाजीराजे यांणीं केली. शिवाजीमहाज हे रजपूत घराण्यांतील उदेपुरा नजीक चितोडें शहरचे शिसोदे महाराणे याज पैकीं आहेत त्याचें जन्मवृत्त असें आहे कीं,—

मूळपुरुष सजणसिंह महाराणे म्हणून चितोडेंशहरांत राहणारे होते त्याजला तीन पुत्र झाले, त्यांचीं नांवें.

पहिला. दिलीपसिंह.
दुसरा. सिंहाजी.
तिसरा. भोसाजी:

या पैकीं तिसरा भोसाजी हे चितोडें शहरानजीक मोरे किल्ल्याजवळ भोसावत म्हणून एक गांव आहे तेथें येऊन राहिले. आणि तेव्हां पासून यांचें उपनाव भोसले असें म्हणूं लागले "महाराणे हा तद्देशीय शब्द आहे" त्यास्तव महाराज सें इकडे म्हणूंलागले. त्या भोसाजीचे दुसरे मालंबंद देवजी वगैरे दहा असामी होते. त्यांतून खेलकर्णे व मालक

स

मयतां बंधू दक्षिणदेशीं घेऊन अहमदनगरचे पादशा-
ळ चाकरीस राहिले. त्यांस दरा:कास पंधराशें प्रमाणें
जार स्वारांच्या सरदाऱ्या देऊन त्यांचे नांवें चाकरीच्या
म चाकण चौऱ्यायशीं व पुरंदरपरगणा व सुपेंमहाल
नाती बहुल लावून दिलेहोते. नंतर ते उभयतां बादशा
वारी बरोबर फिरत असतां खेळकर्णे हा लढायींत ठार
तेव्हां त्याची मोठी कीर्ति होऊन खेलोजी भोसलो अ-
धांचीं नांवें पडलीं. पुढें मालोजी राहिले ते चासकमानी
ीं नदीचे डोहांत बुडाले. तेव्हां मालोजी यास बाबाजी भो
ा नावाचा एक पुत्र होता तो लहान सबब त्याचे बापाचा
म अव्यवस्था नहोण्याकरतां बादशाहानें सरकारज-
विला.

तर बाबाजी भोसले यांस घेऊन त्याची मातोश्री दौल-
पासून वेरूळघुमेश्वर म्हणून पांच कोशा वर एक गां-
त्या गांवीं येऊन राहिली. तेथेंच बाबाजी भोसले यांचें
झालें. पुढें कांहीं दिवसांनीं भीमेचे काठीं येऊन देऊळ
व रवानवदे व जिंती या तीनगांवच्या पाटीलक्या त्यांणीं
घेतल्या. तेथें आपण गुमस्ते ठेऊन वेरूळगांवीं पुनः प
ऊन राहिले. त्यास तेथें दोन पुत्र झाले. त्यांत पहिला
ी. यांचा जन्म शके १४७४ सन १५५२ इसवीसालीं

झाला. धाकटा विठोजी या उभयतांचीं लग्नें झाल्या वर सर्व कुटुंब व खरलें घेऊन बाबाजीभोसले हे देऊळ गांवीं येऊन वतना वर गुजारा करून राहिले. नंतर बाबाजीभोसले मृत्यु पावले. त्या वेळेस उभयतां चिरंजीवांच्या उमरी अदमासें सतरा अठरा वर्षांच्या होत्या.

मालोजी व विठोजी हे उभयतां प्रतिवर्षी कुनोहाळपर्व त ऊर्फ श्रीशंभूमहादेव शिखर शिंगणापूर याचे दर्शनास ये त होते. आणि त्या उभयतांची निष्ठा श्रीजवळ फार असे; ते-ल्हां एक वर्षी उभयतां दर्शनास जात असतां त्या पर्वताच्या ए के झाडी खालीं बसले होते. तेथें श्रीशंभूची कृपा होऊन गोरक्षा व्याचे वेषानें मालोजीस दर्शन देऊन तुमचे वंशीं राज्य मि-ळेल असा आशिरवाद देऊन गोसावी गुप्त झाला. हें वर्तमान मालोजीनें आपले बंधु विठोजी यास सांगून दोघांनीं देवद र्शनें घेऊन देवास नवस केला कीं, आमचे वडलाची दौलत आह्मास मिळाली तर आह्मी येथें एक तलाव बांधूं असान वस करून तेथून निघून फलटणचे वणगपाळराव नाईक निंबाळकर यास जाऊन भेटले त्यांणीं उभयतांचा आदर-करून दर असामीस सालीना बाराशें होन प्रमाणें नैनात-करून आपले जवळ चाकरीस ठेविलें.

पुढें निंबाळकर हे कोलापुरकरा वर स्वारी करण्यास

गेले त्यांजबरोबर मालोजी व विठोजी असतां तेथें निंबाळ
कराचे लक्षांत वर विजापुरचे बादशाहानीं रवाना केलेली
फौज येऊन उभयलष्करची लढायी झाली त्या लढायींत मा
लोजी व विठोजी निपोटे स्वार होऊन हत्तीवर निशाणें होतीं;
त्या हत्तीस माले लावून बादशाहाचे फौजेचा मोहोरा माघा
रा फिरविला. आणि बहुत पराक्रम करून यश मिळविलें.
त्या योगें त्याची मोठी कीर्ती होऊन तें वर्तमान बादशाहाचे
वकिलांनीं अहमदनगरचे बादशाहास श्रुत करून विनंती के
लीकीं हेउभयतां भोसले आपले पदरचे त्या अर्थी हेही सर-
कार सन्निध असावे तें बोलणें सरकारांत मान्य होऊन उभ
यतां भोसले यांस पत्रें पाठवून आणविण्याची आज्ञा लुक-
जी जाधवसरदार यास झाली त्या वरून त्यांणीं पत्रें देऊन बोला
वावयास जासूद देऊन देऊळगांवीं पाठविलें त्या संधीस मालो
जी व विठोजी हे निंबाळकराचा निरोप घेऊन घरीं आलेहोते
त्यांस तीं पत्रें पावलीं त्यांचीं उत्तरें आज्ञेप्रमाणें येतों अशी दे
ऊन आपण फलटणास येऊन निंबाळकरास तें वर्तमान सां
गून त्याचा निरोप घेऊन श्रीशंभुमहादेवाचें दर्शन घेऊन दे
ऊळगांव येथें पुनः परत येऊन आईची आज्ञा घेऊन अह म
दनगरचे पादशाहाकडे गेले.

तेथें गेल्या वर अगोदर पातशाहा यास भेटून त्याचे

दरबारास राजवाडयांत गेले. त्यांणीं उभयतांचा मोठा सन्मान करून जाधवराव यास आज्ञा करून त्याची दौलत जमेस केलेली त्यांचे वडिलाकडे सरंजाम चालत होता; तो यांजकडेस देण्यास सांगितला. त्याप्रमाणें त्यांणीं देऊन तीनहजार स्वारांचे सरदारीवर बहुत दिवस चाकरी करीत होते, त्यांणीं मोठी योग्यता मिळविली.

याउभयतांनीं कांहीं दिवसांनीं घरीं येऊन आपलीं लग्नें केलीं. त्यांत मालोजी भोसले यांस वणंगपाळराव नाईक निंबाळकर फलटणकर यांणीं आपली कन्यादिली लग्न मोठया समारंभानें झालें होतें. तिचें नांव दिपाबाई. हिणें शाहासरीफ पिरास आपल्यास पुत्र होण्याबद्दल नवस केला होता. नंतर पुत्र झाला त्याचें नांव शाहासरिफ असें नांव ठेविलें. त्याचसच शाहाजी भोसले असें म्हणूं लागले. त्याचा जन्म शके १५१६ इसवीसन १५९४

पुढें बादशाहाचे चाकरीस विठोजी भोसले यांस ठेऊन मालोजी भोसले श्रीशंभू महादेवाचे दर्शनास येऊन पूर्वी नवस केल्या प्रमाणें बहुत द्रव्य खर्च करून पाणया करतां एक मोठा तलाव बांधला

नंतर माघारे गुल्हा आपले चाकरीवर पातशाहाकडे गेले.

नंतर मालोजीराजे यांणीं आपला पुत्र शाहाजी रूपवान फार चांगला होता. त्याजला शके १५२१ सन १५९९ या वर्षी शिमग्या मध्यें लुकजी जाधवराव सरकारचे मोठे सरदार होते त्यांस भेटण्यास नेला, तेव्हां जाधवराव व हे ल्या मुलास पाहून फार खूष झाले. आणि आपली कन्या जिजाबाई मांडीवर होती, तिला बोलिले कीं, हा नवरा तुझा होय. इतक्यांत तीं दोन्हीं मुलें एकमेकावर गुलाल उधळून खेळूं लागलीं. तें पाहून सर्व सभासद मंडळी स चमत्कार वाटला. तेव्हां मालोजी भोसले हे सभेंत उभे राहून बोलले कीं, जाधवराव हे आजपासून आमचे व्याही झाले यांस तुम्ही साक्ष आहां.

दुसरे दिवशीं जाधवराव यांणीं मालोजी राजास भोजनास बोलाविलें. तेव्हां मालोजीनीं उत्तर केलें कीं तुम्ही व्याही व्हाल, तर आम्ही भोजनास येऊं; नाहीं तर येतना हीं. हें वर्तमान जाधवराव यांचे स्त्रीस कळलें. तिचे मनास आलें नाहीं. कारण कीं, आपली मुलगी मोठे मातबर सरदारास द्यावी; यास देऊं नये. म्हणून जाधवराव याणें ती गोष्ट त्या वेळेस मान्य केली नाहीं. तेव्हां आम्हास ही मुलगी कर्तव्य आहे म्हणून मालोजी राजे म्हणाले. अशीं परस्पर आग्रहाचीं बोलणीं बरीच चालली. म

ध्यस्त रीतीनें निश्चयांत नहोई. दुराग्रह दोन्हीं कडे पडला. आग्रहानें मालोजीराजे बहुत प्रयत्न व श्रीदेवीची प्रार्थना करते झाले. शके १५२५ माघशुद्ध १५ सन १६०३ चे दिवशीं आपलें शेत बाग मळा होता, तेथें एकटेंच जावें, असें मनांत येऊन गेले. अस्तमान समय झाला. त्या समयीं एकाग्र चित्तें जाधवराव यांचा आपला कलह ईश्वर कसा सिध्दीस नेईल. आम्हास भाग्य नाहीं. म्हणोन यांचना केली. "सोयरीक दुसऱ्यास देणें ते व्हां पुरुषार्थच काय उरला याहून मरण बरें." असे चिंताग्रस्त होते इतक्यांत श्रीदेवीचा साक्षात्कार होऊन देवीची आज्ञा झाली की, तुझा भाव शुध्द पाहून तुजवर कृपा करावी, म्हणून प्रसन्न आहे. तुझे कुळीं त श्रीसांब अंशें करून अवतार घेऊन, धर्म स्थापन करणारा व देवब्राह्मणास पीडा झाली आहे, ती दूर करणारा असा तुझे वंशीं एक शककर्ता होऊन, पुष्कळ पुरुष राज्य करतील.

या प्रमाणें वर देऊन जवळ एक वेरूळ होतें तें दाखविलें. आणि सांगितलें कीं, यांत द्रव्य पुष्कळ आहे ते, तुझे तुझें मनइच्छित काम होईल.

असा साक्षात्कार झाला. तेव्हां श्रीची प्रसन्नता आणि दर्शन झालें. एवढ्यानें कृतकृत्यता मानून घरास जाणें अ-

थवा तेथून उलटणें विसरले. प्रहर रात्र झाली असतां विठोजीराजे यांणीं मालोजी राजे अद्याप कां आले नाहीत म्हणोन शोधास पाठविले. तेव्हां मालोजी राजे बागेंत आहेत म्हणून माणसांनीं सांगितलें. त्या वरून विठोजीराजे बागेंत गेले . त्या वेळस त्यांज वळ श्रीचा प्रसाद साक्षात्कार झाला. हें वर्तमान संपूर्ण सांगितलें. त्याजवर तेही बहुत आनंद मानून रात्र फार झाली घरास चलावें म्हणून बोलले आणि घेऊन आले.

दुसरे दिवशीं देवीचे साक्षात्कारांत जें वारूळ दारवबून द्रव्य सांगितलें तेथें जाऊन पहावें असें मनांत आणलें; परंतु द्रव्य साध्य झाल्यास कसें आणावें? कोठें ठेवावें? राज्य यवनाचें. द्रव्य जाऊन प्राण व प्रतिष्ठा दोन्हीं जाणार. असे विचारांत दुसरा दिवस गेला. दुसरे दिवशीचे रात्रीस श्रीचा दृष्टांत झाला कीं तूं भय पावलास. मी प्रसन्न होऊन द्रव्य दिलें त्यास कदापि विघ्न होणार नाही. या द्रव्याचा तुंबहुत धर्म करावा. निंदावाद असल्यास तें काढून श्रीगोंदें एथें शोधवा नाईक यांचे घरीं ठेव. तोठवून पाहिजे तेवेळेस तुझें तुला देईल. या प्रमाणें दृष्टांत झाल्या वर मालोजीराजे आणि विठोजी व दुसरे विश्वासू मनुष्य घेऊन वारूळास निघे जाऊन खणावयास लागले तों आंत मोठा सर्प पाहिला तेव्हां भयाभी

त होऊन पळाले आणि मालोजीराजे त्यापुढें राहून हातजो डून बोलले कीं श्रीदेवीनें मला एथें द्रव्य सांगितलें. त्या प्रमा णें आहे, तरी तुम्ही कृपा करून द्यावें. तेव्हां सर्प तेथून गेला. नंतर तें सर्व खणून श्रीनीं सांगितल्या प्रमाणें शेषापा नाईक यांजकडे ठेविले. तें त्यांणीं घेवणेचें मान्य केलें.

नंतर भोजन झाल्यावर तुम्हास श्रीदेवीनीं द्रव्य दिलें. तेव्हां तुमच्या भाग्योदयच आहे. तुम्हास राज्य प्राप्त झाल्या वर तुमची पोतदारी आम्हास वंशापरंपरागत करून द्या वी. तें त्यांणीं मान्य केलें. श्रीचे कृपें करून त्याच्या घरीं द्र व्य झालें तेणें करून दिवसें दिवस त्यांची योग्यता वाढ ली. निजामशाई सरकारची चाकरी करीत होतच. आण खीं हजार घोडीं खरेदी करून पागावाढ विली. श्रीशिखर महादेव एथें चैत्रमासीं यात्रा भरते तीस पाण्या वांचून या त्रेकऱ्यांचे फार हाल होतात म्हणून तलाव बांधला. श्रीरु षणेश्वरा चे देवालयाचा जीर्णोधार केला. याप्रमाणें पुष्कळ देवालयें बांधलीं व दान धर्म केले.

जाधवराव यांचे शरिर संबधाचा प्रयत्न करण्याक रतां निंबाळकर अनुकूळ करून त्याचे द्वारें पातशाहास- श्रुत केलें कीं, आग्रहास पडून जाधवराव आमचा शरिरसं बंध करीत नाही व रून पातशाहानें जाधवरावास म्हटलें कीं तुम्हीव

ते शरिर संबंधीं. असें असतां आयद्दा करतां तो करूंनये मुलगी द्यावी त्या वरून जाधवराव यांणीं अनुमान करून उत्तर सांगून पाठविलें. तेव्हां अनमान काय निमित्य क रलान हें विचारायास पाठविलें. त्यांणीं राजे यांचें वैभव - आमचे बराबरीचें नाहीं वरकड शरिर संबंधीं आहेच. आ मचे घरांत सर्वांचे विचारास समान बरोबरीचें पाहून क - न्या द्यावी, असें आहे. ते समयीं पातशाहाचे मनांत आलें कीं आह्मी सांगितलें असतां, आयद्द करतात. त्या पेक्षां मालो जी भोसले पास याजहून सवाई मनसब व वैभव देऊन - ही गोष्ट करावी. भोसले मनसब देण्यास योग्य व शूर - कामेंकाजें ही केलीं आहेत. ह्मणोन पंचहजारी मनसब - असा किताब लिहून शिवनेर व जुनर वगैरे तालुके सरंजा [redacted] व साहेब नाबत दिला. जाधवराव याहून भाग्यवान कलं माणिया उपर याचे पुत्रास कन्या द्यावी; ह्मणोन आज्ञा के ली. तेव्हां जाधवराव व त्यांची स्त्री या सर्वांस हर्ष होऊन पा तशाहाचे मनोगत व मुलखंदर गुणवान कुलीन ह्मणून मा न्य करते झाले. दौलताबादेस लग्न समारंभ शके १५२६ सन १६०४ या वर्षी लग्न केलें त्या समारंभास पातशाहा येऊन योग्यता दिली. लग्नाचा समारंभ फारच मोठा व चांगला झाला.

शाहाजीराजे भोसले थोर होऊन त्याजकडे बापाचे वे
ळची जाहागिर वगैरे चालत होती. परंतु अहमदनग
रचे राज्यांतील बहुतेक मुलुक मोंगलांचा पातशाहा
शाहाजान याणें घेतलाच होता. पुढें अहमदनगर-
चे बादशाहास त्याचा चाकर फत्तेरखान याणें कैद क
रून त्याचे गळ्यास फांस लावून जिवें मारिलें. असें
दुष्कर्म केलें. नंतर त्या फत्तेरखानानें अहमदनग-
बादशाहाचा मुलगा गादीवर बसवि ला. पुढें मोंग
लाचे बादशाहाकडून फत्तेरखाना कडे सनद आली;
त्यांत पूर्वी शाहाजीभोसल्या कडे चालत आलेल्याजा
हगिरी पैकीं ही मुलुख दिला. त्या समयीं नगरचे पात
शाहाचा मुलगा लहान सबब तें राज्य फत्तेरखानाकडे
राहिलें.

असें झाल्या वर शाहाजीभोसले खिन्न होऊन तेथू
न निघून महमद अदिलशाहा विजापूरचा पादशा-
हा याचा आश्रय धरून त्याजपाशीं चाकरीस राहिले.
त्याचे चुलते विठोजी यास पुत्र आठ होऊन त्यांचा वंश
वाढी गांवीं होता.

नंतर शाहाजी भोसले विजापुरचे पातशाहाजव-
ळ कारभार करूं लागले. आणि कित्येक ब्राह्मण जव

ळ बाळगून बहुत किल्ले हस्तगत केले. आणि फौज जमा करून स्वाऱ्या केल्या. त्या शाहजीस विजापूरचे बादशाहचे प्रधान मुरारपंत यांणी सहाय्यास घेऊन विजापूरकरांस भिमा व निरा यांमधला नवा मिळालेला मुलूख यांचा बंदोबस्त केला. तेणेंकरून शाहाजीचें चातुर्य प्रगट झालें. म्हणून मुरारपंत याणें बादशाहा जवळ फारच शिफारस करून लश्करचा दुसरा अधिकार देववून कोल्हार व बंगलोर व उसकटा व बालापूर व शेरा असे पांच परगणेयाची जाहगिर दिली. व आणखी मागाहून शाहजीचे शौर्यावर बादशाहाची सम्प्रसन्नता होऊन इंदापूरपरगणे व बारामती परगणा व पुण्याजवळचे मावळांतील तळवट जमीन पुणेंपांताचे जाहगिरीला अधिक लावून दिली. त्या मुलकाचे संरक्षणाचे कामावर शाहजीनें दादोजी कोंडदेव या नांवाचा कोकणस्थ ब्राह्मण हुशार व भरंवशाचा करकून नेमला होता.

या शाहजी भोसल्यास दोन स्त्रिया होत्या. पहिली जिजाबाई जाधवराव यांची कन्या. दुसरी तुकाबाई मोहिते यांची कन्या

पहिलीस दोन पुत्र. त्यांत वडील संभाजी आणि धाकटे शिवाजीमहाराज.

धाकटे शिवाजीमहाराज.

दुसरी स्त्री तुकाबाई यांस एक पुत्र त्याचे नांव व्यंकोजी तेच कर्नाटकांत शाहाजीस मिळालेले जाहगिरीचा उपभोग करीत चंदीचंदावर ऐथें संस्थान करून राहिले त्यांचे वंशा कडे अद्याप चंदावर संस्थान चालत आहे.

थोरले स्त्रीचा वडील पुत्र संभाजी याजला शाहाजी कर्नाटकांत गेले ते समयी आपले जाहगिरीसहित संस्थानीं लोक भांडतात यामुळे आपणास उपद्रव लागतो सबब एक कानिकगिरीचा किल्लेदार यांचे पारिपत्या स पाठविलें असतां तेथे संभाजीचा पराभव होऊन मृत्यु पावले.

थोरले स्त्रीचे धाकटे पुत्र शिवाजी यांचे संपूर्ण वर्णन "भाग दुसरा कारकीर्द दुसरी" यांत केले आहे.

शाहाजीभोसले शके १५८६ सन १६६४ या वर्षी मृत्यू पावले. त्यांचे वृंदावन श्रीशंभूमहादेव ऐथें असिध आहे.

# भाग २रा.

## कारकीर्द शिवाजीमहाराजछत्रपतियांची

## (शके १५४९ सन १६२७ पासून शके १७०२ सन १६८० पर्यंत)

---

शाहाजीमहाराज विजापुरास परतगेले तेव्हां; जिजाबाईसाहेब गरोदर वाटेनें संरक्षित जाणार नाहींत म्हणोन शिवनेरी किल्ल्यावर ठेविली तेथें शके १५४९ सन १६२७ इसवी वैशाख शुध्द तृतीयारविवार रोजीं शिवाजीमहाराजांचा जन्म झाला.

शिवनेरी किल्ल्यावर जिजाबाईसाहेब व शिवाजीमहाराज ७ वर्षें होते; त्या ठिकाणीं शिवाजीमहाराजांचा मूलपणीं छंद घोड्यावर बसणें, हत्तीवर बसणें, तीर मारणें हा फार असे. आणि भारत भागवतादि युद्ध कथा ऐकण्याची फार गोडी होती.

शाहाजीचे वडील पुत्र संभाजी कर्नाटकांतीं युध्दांत पडले. आणि जिजाबाई व शिवाजी इकडे शिवनेरीस फार दिवस राहिली. यामुळें शाहाजी याजला शिवाजीस पाहण्याची फार उत्कंठा होऊन जिजाबाईसाहेब आणि शिवाजीमहाराज यांस कर्नाटक प्रांतीं नेऊन

भेटले. आणि मग शाहाजी व शिवाजी विजापुरास आले.

मुरारजंग देवराव विजापूरचे बादशाहाचे दिवाण यांणीं शाहाजीराजे यांचा पराक्रम पादशाहाशीं वर्णन करून तारिफ केली. त्याजवरून पादशाहानीं शाहाजीस पोशाख देऊन पुणेंदेश, सुपे, इंदापूर, बारामती असे बारामावळ सरंजाम दिला. त्याचा कारभार शाहाजीयाणें दादोजीकोंडदेव "त्याचाएक विश्वासू कारकून" यांजकडे सांगितला.

दादोजीकोंडदेव यांणीं मावळांत लांडग्यांचा फार उपद्रव झालाहोता ते लांडगे मारले. व मुलुखशामलाचे उपद्रवानें उजाड झालाहोता, तो बहुत करून वस्ती करून लावणीची तजवीज केली. व निमताने व धारे बांधले.

शिवाजीराजा स यवनांचे राज्याचा व मुसलमानाचे धर्माचा तिरस्कार असे. आणि लहानपणापासून त्याचे मनांत हिंदु धर्मस्थापावा असें होतें. या मुद्धें विजापुरी बादशाहास भेटणें विषयीं शिवाजीस शाहाजीराजे आग्रह करीत असतां "यवनासभेटणें व त्याचें अन्न खाणें आणि राहणें अतिनीच आहे." हिंदु धर्मस्था-

पावा असें वारंवार बोलअसत. शाहाजीराज़े याणें आपण व जिजाबाईसाहेब यांजकडून व दुसरे मंडळी कडून शिवाजीस समजून सांगितलें तथापि तो शिवाजीचा दुराग्रहच होता.

शेवटीं एके दिवशीं फार आग्रह करून मुरारपंतदिवाण यांचे सल्ल्यानें शाहाजीराजेयांणीं शिवाजीराजे यास पादशाहाचे दरबारास नलें. तेथें गेल्यावर पादशाहास मुजरा किंवा कांहीं अदाब नकरतां शिवाजीमहाराज कचेरींत बसले.

बादशाहा यांणीं मुरारपंतदिवाण यास मश्म केला कीं, शाहाजीराजेयांचे हेच पुत्रकाय? त्यावरून दिवाण यांणीं उत्तर केलें कीं "निशास्त व बरखास्त दरबार अद्यापि पाहिलानाहीं; परंतु गुणवान व शूर चांगले आहेत" अशी तारीफ केली. तेव्हां पादशाहानीं त्याचा सन्मान करून पोषाख देऊन निरोप दिला.

दरबारांतून घरीं आल्यावर शाहूराजेयांणीं विचार केला कीं, शिवाजीमहाराज यांचे मनोगत विपरीतदिसतात. राज्य यवनी तेव्हां मोठ व मोठे होई पर्यंत यांजला दूर ठेवावें. आणिमुरारपंतयाससल्लाविचारल्यावरून त्यांणीं शाहाजीचे विचारा प्रमाणें सल्ला दिली.

विजापूर मुकामीं शके १५५९ सन १६३७ या वर्षी शिवाजीमहाराजांचें लग्न शिर्के यांचे मुली बरोबर मोठे समारंभानें झालें. त्या बाईचें नांव सईबाई असें ठेविलें शके १५५९ सन १६३७ या वर्षी शाहाजीराजे यांणीं जिजाबाईसाहेब व शिवाजीराजे यांस पुण्यास रवाना केलें. आणि त्यांजबरोबर पुणें व मावळ प्रांतीं जे पूर्वी शाहाजीनें दादोजीकोंडदेव यांस ठेविलेंहोतें ते हि ठेव घेऊन विजापुरीं गेलेहोते त्यांस बरोबर दिलें.

शिवाजीमहाराज पुण्यास आल्यावर तेथें दादोजी कोंडदेव यांणीं रंगमहाल यानांवाचा एक वाडा बांधला होता त्यांत महाराज मातोश्रीसह राहिले.

शिवाजीमहाराज पुण्यास आल्यावर त्यांच्या मनांत ध्यास होता कीं वडिलांनीं मिळविलेलें स्वाऊन राहणें, यवनांचे अन्न खाणें ठीक नाहीं. सर्व पृथ्वीयवनाक्रांत झालीआहे. हिंदुधर्मबुडाला या साठीं कांहीं उद्योग करमसलत करून हिंदुधर्म स्थापावा.

ही गोष्ट शिवाजीनें दादोजीकोंडदेव यास सांगून सल्ला विचारली तेव्हां दादोजीनें उत्तर केलें; आपण मनांत आणलेले गोष्टीचा शेवट लागणें दुर्घट आहे. सर्व पृथ्वीयवनाक्रांत झाली. या करण्यास आपणास मात

बर स्थलें असावी. हिंदुराजे व फौज जागोजाग आ पल्यास सहाय्य असावी. आपण ही जिवाहून अधिक श्रम करावे तद्यात ईश्वरीप्रसाद व सिध्दपुरुषांचा आ शिरवाद घडावा. अशा गोष्टी पाहिजेत. असें असून आ पण मनांत आणतां हें कसें घडेल. वडिलांनीं मिळ-विलेली संपत्ती जाऊन अपेक्षा येईल. असें दादोजीनें उत्तर केलें. यानंतर दादोजीनें मसलत करण्याचीं जी जी लक्षणें व गुण सांगितले ते शिवाजीचे मनांत ठस-ले. आणि त्यांचे (दादोजीचे) उपदेशामुळें शिवाजी-चा निश्चय कर्मी नहोतां त्यांणीं आपला हेतु सिध्दीस-जावा यांसाठीं उद्योग चालविला. ही गोष्ट शके १५६३ सन १६४१ इसवी या वर्षी झाली.

पुढें कांहीं थोर झाल्यावर शके १५६३ सन १६४१ इसवीचे सुमारें शिवाजीनीं मावळे लोकांवर प्रीती करू न त्यांस शिकारीचे कामांत वागवून त्या लोकांस डोंग रीकिल्ल्यांची माहिती करून दिली. त्या लोकांत एकजी कंक, दुसरा तानाजीमालुसरा, तिसरा बाजीपासल कर शिवाजीचे बालमित्र होते ते वरा होतांच कांहीं ल श्कर येऊन तोरणा किल्ला प्रथम घेऊन कांहीं दिवसां नीं त्याची डागडुजी केली. त्यांत एके दिवशीं जगदीश्व

र रुपेनें एक हांडा मोहरांनीं भरलेला सांपडला.

त्या नंतर शिवाजीमहाराज यांणीं विजापुरास व कील पाठवून बादशाहा यास समाजाविलें कीं मी किल्ला घेतलाआहे हा आपले राज्यधानीपासून दूर आहे, आणि एथील लोक फार उत्पाती आहेत यासाठीं ही जागा विश्वासू सेवका कडे असल्यानें बंदोबस्त राहील. त्या जवरून किल्ला त्याजकडे असावा अशी विजापूरचे बादशाहाची आज्ञा तर झालीनाहीं. पण विजापूरचे दरबारचे लोक शिवाजीस कांहीं अनुकूळ असल्याच्या योगानें पुन्हांही गोष्ट बादशाहाचे दरबारीं निघाली नाहीं.

नंतर दारूगोळ्याची तयारी करून शके १५६९ सन १६४७ या वर्षी तोरण्या नजीक आग्नीयेदिशेस मोरबदेदुर्गा देवीचा डोंगरदीड कोसा वर चांगला पाहून दुसरा राजगड बांधण्यास आरंभ केला ती विजापूरचे बादशाहा यास खबर कळून किल्ला नबांधण्या विषयीं मनाई पाठविली. दादोजीकोंडदेवही वारंवार सांगत होते कीं हे नीट नाहीं; परंतु ती गोष्ट शिवाजीनीं ऐकलीनाहीं. राजगड किल्ला तीनमाच्या सवेळा, सजिवनी, पद्मावती असे बांधून किल्ला बांधला

नंतर दादोजी कोंडदेव यांस वारधक्य प्राप्त होऊन

मरण पावले. त्यांणीं अंतकाला पुर्वी शिवाजीराजास-
बलावून सांगितलें कीं मी आपल्यास हिताविषयीं नि
षेध करीनतो तों त्याची क्षमा असावी. आपण स्वतंत्रपणें
वागोन मुसलमानापासून हिंदूचीं देवस्थानें राखून गा
ई ब्राह्मण व प्रजेचा प्रतिपाळ करावा. इतकें बोलून दादो
जीकोंडदेव यांणीं प्राण सोडला

या संधीत शाहाजीमहाराज यांणीं दादोजीपं-
तास द्रव्य जमा झालें असेल तें पाठवावें म्हणून लिहि
लेंनोंतेवारले नंतर महाराजांनीं उत्तर पाठविलें कीं ए-
थे खर्च वाढला आहे. याउपररवर्चास खजीनाआणवि
णें तोंकर्नाटकमांतांतून आणवावा. इकडून पाठवीत
नाहीं असें लिहिलें. त्याजवरून सर्व आरोप पुन्हांनीं-
केला. अचाट कर्मे करुंलागले. द्रव्य व मुलूख याचाच
आहे म्हणोन संतोष मानिते झाले. आणि तेथें विजा
पुरींराहणें ठिकनाहीं म्हणोंन चंजाउराकडे जाण्याची
मसलत काढून ते (शाहाजी) तिकडे गेले.

नंतर शिवाजीराजानीं आपले पित्याचे जाह
गिरीचा वसूल पित्याचे नांवें घेऊंलागले. आणि-
त्या जाहगिरींत चाकणकिल्ला त्यावरचा फिरंगोजी
हा आपणास अनुकूल झाल्या वर त्याजला माम-

लतीची सनद दिली. रूपेपरगणेयाचा मामलेदार बा जिमोहिते अनुकूळ होऊन वसूल देईना सबब त्याचे कामगारा सहित त्याजला धरून कर्नाटकांत शाहाजि कडे पाठविलें. आणि चाकणाचा किल्ला व रूपेपरगणा आपले सत्तेंत आणला.

खेरिज कोंडणा किल्ला घेऊन त्याचें नांव सिंह गड ठेविलें. व पुरंदरकिल्लाही घेतला. आणि तेथील लोक आपले चाकरीस ठेविले. नंतर युक्तीनें युद्धके-ल्या वांचून चाकणकिल्ला व निरानंदी या दोहोंमधील-मुलूख घेतला.

नंतर कालियानीचा सुभेदार याणें मोठा खजिना विजापुरास पाठविला तो शिवाजीनें वाटेंत छापा घा लून सर्व द्रव्य हरण केलें. आणि पुढें कांगोरी, दुंग, नि कोना, भोरप, कुवारी, लोहोगड, राजमाची हे सात किल्ले व तळेघोसाळे आणि रेडी हे दोन किल्ले कोकणचे-घेऊन गांव लुटून द्रव्य राजगडास नेले. व कालिया-नीचा सुभेदार कैद करून किल्ले सही केले. आणि देव-स्थानाचे व ब्राह्मणास जें पूर्वी दिलेलें सर्व चालविलें

शिवाजीमहाराज कोकणांत गेलेनंतर हरिहरेश्व राचें दर्शन करून निघून येतांना गोवळकर सावं-

वंत येऊन भेटले त्यास चाकर ठेविलें. त्याजपासून-
तीनशें होनाची तलवार नामांकित होती ती तीनशें हो
न व पोषाख देऊन घेतली. तिचें नांव भवानी असें ठे-
विलें. ती तलवार शिवाजी पाशीं आल्या पर बहुत प
शस्ती जाहली तिची पूजा नित्य नेमानें करूं लागले.

नंतर शिवापूर व पुणें एथें आंबराई लाविली. शि
वापूर एथील आंबराईस आपले वडिलाचें नांव शा-
हाबाग असें नांव ठेविलें. व त्याजवर रायगड, हपत्ती
याजकडे होता तो भेदें करून घेतला. ही गोष्ट शके १५६९
सन १६४७ या वर्षी झाली.

हें वर्तमान विजापूरचा बादशाहा महमद अलीशा
हा यांस कळतांच शिवाजीला मनाईपत्र पाठविले. व
शिवाजीचे तीर्थरूप शाहाजी यांचे ऐश्वर्य कर्नाटकांत-
फार वाढलें होतें ते आपले लेकास अनुकूळ असतील
असें समजून त्याजला बाजी घोरपडे सरदार मुधोळक
र यांजकडून कैद करून शके १५७१ सन १६४९ इस
वी या वर्षी बादशाहानें आपले जवळ नेऊन आज्ञा के-
लीकीं लेकाचें बंड तुम्ही मोडावें, त्यांणीं उत्तर केलें कीं, शि
वाजी माझें ऐकत नाहीं; परंतु तें त्याचें बोलणें पादशा
हास खरें नवाटतां शाहाजीला चिरेबंदी कोठडींत घालू

न वारा जाणें पुर्तें छिद्रमात्र कोठडीस ठेविलें. आणिसा गितलें कीं या अपराधाची क्षमा मागण्यास शिवाजी-लौकर नयेईल तर छीद्र बंद होईल.

हें वर्तमान शिवाजीराजास कळल्यावर त्याचे मना त क्षमा मागण्यास जावें असें आलें. परंतु त्याची स्त्री सईबाई यांणीं विजापूरसरकारचा विश्वास धरूंनये अ शी सल्ला देऊन जाऊंदिलेंनाहीं. नंतर शिवाजीनीं दि-ल्लीचा बादशाहा शाहाजहान यास आपले बापाची मुक्त ता विजापूरकराकडून करवावी असें पत्र पाठविलें त्या प्रमाणें दिल्लीहून विजापूरास सूचना आलीअसेल व विजापूरसरकारचा दिवाण मुरारपंत याचें व शिवाजी चें इष्टल होतें या योगानें शाहाजीस कोठडींतून काढून किल्ल्यांत ठेविलें.

त्या पुढें चारवर्षे शाहाजी विजापुरी कैदेंत होते तों पर्यंत शिवाजीनीं कांहीं बंड केलें नाहीं. नंतर कर्नाटकांत बंड झालें त्याचे बंदोबस्ताकरतां बादशाहानीं शाहाजी भोसले यास कैदेंतून मुक्त करून पाठविलें.

हें वर्तमान शिवाजीस कळल्यावर निराव कोय नानदीचे काठीं आपला मुलूख होता त्याचें संरक्षण होण्यासाठीं आपला मुख्यकारभारी दादाजीनिळकं

ठ्यास ठेवून त्यास पेशवे पद देऊन फौजेची सरदारी दि ली. व जावली परगण्याचा राजा याशीं लढाई करून त्या स ठार मारून त्याचा परगणा घेतला. व रोहिडाकिल्लाही घे तला.

खेरिज सके १५७९ सन १६५७ इसवी या वर्षी मोग-लाचे राज्यांत शिवाजी उपद्रव करूंलागले. आणि दिल्ली चे बादशाहाचा पुत्र अवरंगजेब हे विजापूरकरा शीं लढूं ला गले तेव्हां त्याजला शिवाजीनें नम्रपणें पत्र पाठविलें. त्यांत कि जापुरकराचा मुलूख आम्ही घेतलां आहे त्याची सनद आ पण द्यावी असें लिहिलें त्या प्रमाणें त्याणें सनद देऊन खे-रीज दाभोळ व त्या खालचा मुलूख दिल्लीसरकारचा अ-सून विजापूरकर उगीच सत्ता करतात तरी तोहि घ्यावा अ शी आज्ञा केली.

नंतर शिवाजी हे मोगलाचे मुलखांत जाऊन जुन्नर-शहर लुटून त्यांत दौलत फार सांपडली ती राजगडास पो चविली. व नगरचे लुटींतही हत्ती, घोडे वगैरे दौलत फार सां पडली. त्या पुढें आणखी औरंगजेबास नम्रतेचें पत्र लि-हिलें. आणि वकिला बरोबर सागून पाठविलें कीं मी आपले चाकरीकरतां पुष्कळ खारजमा केलेआहेत तेव्हां औरंग जेब दुसरे कामाचे बंधांत असून त्याणीं त्या अन्वयें मान्य

केलें.

इतक्यांत समुद्रतीरीं शिवाजीनें किल्ले घेतले. आणि सर्व कोकणपट्टी घेण्याचें मनांत आणून त्याकामावर श्यामराजपंत पेशवे यांस नेमिलें. त्याशीं फत्तेखान यांणें लढायी करून पेशव्याचा पराभव केला.

नंतर श्यामराजपंतास शिवाजीमहाराजांनीं माघारी आणून त्याचा अधिकार मोरोत्रिंबक पिंगळे यास दिला तो मोरोत्रिंबक फार चतुर शूर सरदार होते.

या खेरीज दुसरे कामगार मुलखाचे बंदोबस्ताकरितां केले ते.

१ माणकोजीसरनोबत. ३ सोनोपंत डबीर.
२ बाळकृष्णपंत मजमदार. ४ रघुनाथबल्लाळ सबनीस.
पुढें निळोसानदेव ५ गंगाजी नागोजी वाकनीस.

एणेंप्रमाणें कामकाजाचा बंदोबस्त ठविलाहोता.

नंतर विजापूरचे दरबारांत असें ठरलें कीं शिवाजीचें बंड अवश्य मोडलेंपाहिजे. यासाठीं स्वार ५००० व पायदल ७००० व कितीएक तोफा व जेजाला नेमून त्याचे सरदारीचें मुख्यत्व अफसूलखानाला देऊन शिवाजीचे पारिपत्यास रवाना केला. त्यासरदारानें गर्वानें अशी प्रतिज्ञा केली कीं शिवाजीस बांधून आणून स्वामीचे सिंहासनापुढे

पायरी वर आणून दाखीन. अशी प्रतिज्ञा करून ते अफ
सूलखान शके १५८१ सन १०६९ फसली यावर्षी लश्कर
सुद्धा पंढरपुराहून वाईस आले. हें वर्तमान शिवाजीरा
जे यांस कळतांच शिवाजीराजे प्रतापगडा वर जाऊन रा
हिले. त्या पूर्वीच त्यांणीं पारघाटचे पायीमागें डोंगर होता;
त्याचा किल्ला मोरोत्रिंबक पिंगळे याचे हातून बाधून त्या
किल्ल्याचें नांव प्रतापगड ठेवून तेथें आपले कुळस्वामीदे
वीची स्थापना केली आणि त्या संस्थानाचें काम मोरो
त्रिंबक पिंगळे यास दिलें. त्या वेळेस किल्ल्याकडे उत्पन्न
न्नास हजार पर्यंत प्रतिवर्षी असोन पिंगळे याचे जाती
कडे त्यांतून पंचवीसहजारापर्यंत पोंचत होतें त्या संस्था
नचें काम हल्लीं पिंगळे याचे वंशांतील बहिरोनारायण-
याजकडे चालत आहे. नंतर शिवाजीनीं प्रतापगडाहून-
एक वकील अफसूलखानाकडे पाठवून बोलणें फार नम्र
तेचें स्तुतियुक्त लाविलें कीं तुम्ही मोठे प्रतापी आहां. तेव्हां
त्यास माझी लढायीची शक्ती किती आहे. तुमचे योगे
पातशाहाही क्षमा करील तर तुम्हाला सर्व मुलुख देईन;
त्या वरून सरदाराचें मन प्रसन्न काहीसें झालें. आणि-
गोपिनाथपंत या नावाचा कोणी एक आपला करकून बो
लण्यास पाठविला. तो पारगांवास पोंचल्या वर शिवा-

जीनीं भेटीसाठीं किल्लावरून उतरून भेट घेतली त्या वेळेस-
शिवाजीनीं त्याबरोबरचे लोकांस सद्दा सन्मान करून रा
हण्यास जागा वगैरे सरबराकेली. आणि रात्रौ कोणा
सनकळतां गोपिनाथपंताची गांठ घेऊन सांगितलें कीं
आह्मास श्रीभवानी माता देवीची प्रसन्नता होऊन आ-
ज्ञा झाली आहे कीं तूं गाई ब्राह्मणाचा प्रतिपाळ कर. त्या
वरून या कर्मास आह्मी प्रवृत्तक आहों. त्यासँ तुह्मी अ
नुकूळ व्हाल तर तुह्मास हिवरेगाव जहागिर करून दे
ईन त्या वरून तो ब्राह्मण वरा होऊन निष्कपटपणा बद्दं
ल शिवाजीस शापथ दिली. आणि उभयतांचे विचारें ठर
लें कीं अफसूलखानास मसलत करावयास ह्मणून आ
णावें. नंतर गोपिनाथपंता बरोबर कृष्णाजी भास्कर देऊ
न पाठविलें. त्यांणीं अफसूलखानास जाऊन सांगितलें
कीं शिवाजी तुह्मास फार भितात. तुह्मी अभय घाल
नर ते आपले स्वाधीन विश्वासें करून होतील. तें ऐकून
अफसूलखान गोपिनाथपंताचे सांगण्या प्रमाणें वागू
लागला. शिवाजीनीं मोरोपंत व नेताजीपालकर वगै-
रे बरोबर मावळेलोक आणून प्रतापगड व जावली या दोनजा
गीं राखण ठेविले होते. अफसूलखान फेरीची तयारी क
रून दीड हजार फौज घेऊन प्रतापगडा जवळ आला.

तेव्हां गोपिनाथपंतानें शिवाजी मियेल असें सागून फौज मागें ठेवून एक हत्यारबंद बरोबर घेऊन अफसूलखानास भेटीचे जागीं आणून बसविले. शिवाजीनी स्नानसंध्या नित्यकर्म उरकून मातेचे चरणीं मस्तक ठेवून आशिरवांद घेऊन आंगांत चिलखत चढवून उजवे अस्तनीं त गुप्त बिचवा शस्त्र ठेविलें. आणि डाव्या हातीं वाघनखें घेऊन भेटीस निघाले. त्याचे बरोबर तानाजी मालुसरा ही निघाला. तो हत्यार बंद होता. त्यास ही गोपिनाथपंतानें कांहीं मागें ठेविलें नंतर शिवाजी व अफसूरखान भेटतां भेटतां शिवाजीनें अफसूलखानाचे पोटांत वाघनखें खुपसलीं. तीं-बळकट लागलीं इतक्यांतें तो खंरेनें दूर होऊन तरवार-उपसून, वार करून मोठा घात आहे असें बोलला. त्याच वेळेस शिवाजीनीं आपले अस्तनीतला बिचवा काढून अफसूलखानास ठार मारलें त्याणें वार केलेला शिवाजीस चि लखता मुळें लागू झाला नाहीं. अफसूल खाना बरोबर आलेला हत्यारबंद सयदबंधू आपल्या धन्याजवळ आला. त्याचे हातची तरवार शिवाजीनें घेतली. आणि त्यान बरोबर लढूं लागले. व त्यास तुला जीवदान देतों असे किनीए क वेळ बोलले तें त्याणें न ऐकतां इमानदारीनें धन्यासाठीं-लढतांच त्यास ही ठार मारलें. त्या समयीं शिवाजीचे लो-

कानीं येऊन अफसूलखानाचें शीर कापून किल्ल्यावर नेलें पुढें संकेता प्रमाणें तोफांचा बार केला तो एकाएकीं प्रतापग ड व जावलीचे गुप्त लोकांनीं ऐकून ते सर्व लोक येऊन अफ सूलखानाचे लश्करावर छापा घालून त्या लश्कराचा फार नाश केला. त्या वेळेस शिवाजीस घोडे ४००० व कांहीं हं त्ती व उंट आणि बहुत द्रव्य व तोफा व जेजाला वगैरे पुष्कळ सरंजाम सांपडला. त्या छाप्यांत कितीएक लोक धरून नेले. जे गेले त्यास जाऊं दिलें. व अफसूलखानाची स्त्री व पुत्र सांप डली ती शिवाजीनें आपला सरदार खंडोजी काकडा याचे ह वालीं केली. त्याणें त्यांजपासून लाच खाऊन सोडून दिली. स बब त्या काकड्यास ठार मारला. या लढायींत जे लोक शूरपणा नें लढले व जखमी झाले त्यांचा सन्मान करून अलंकार वस्त्रें दिलीं त्या योगें शिवाजीची कीर्ती होऊन शिपायीलोक युध्दा स तत्पर राहिले. गोसिनाथपंतास संकेता प्रमाणें हिवरेगांव दे ऊन सन्मान केला. आणि सरदारीचा अधिकार देऊन आपले जवळ चाकरीस ठेविले.

नंतर शिवाजीनी पन्हाळा किल्ला घेऊन कृष्णातीरची खंडणी घेतली. खेरिज कोकणचे व सह्याद्रीचे किल्ले हस्तगत केले. रांगणा व खेळणा हे दोन किल्ले युध्द करून घेतले. त्या पैकीं खेळण्याचें नाव विशाळगड ठेविलें. तें अद्याप चालत आ

हे हें वर्तमान विजापुरास कळलें. नंतर त्या बादशाहानें आपला सरदार रुस्तुमखान होता त्यास कोल्हापूरचे बंदोबस्तास नेमिलें व त्याज बरोबर स्वार ३००० आणि कांहीं पायदळ होतें तो पन्हाळ्याजवळ येतांच शिवाजीनीं आपले स्वारज मा करून त्यांचा पराभव करून त्याजला कृष्णेपार माघारा-घालविला. आणि पायदळ जमा करून विजापूर पर्यंत खडणी घेऊन माघारी विशाळगडास येऊनं कोकणांत राजापूर व दाभोळ हीं दोन्ही लुटून बहुत द्रव्य राजगडीं नेलें.

हें शिवाजीचें कृत्य विजापुरी बादशाहास कळल्यावरून एक कट करून एक जोहार सिद्दी होता त्याज बराबर अफसूलखानाचे दुप्पट फौज देऊन शिवाजीचे पारिपत्यास नेमिला त्याचे हातून ही कांहीं एक न होतां उलटे शिवाजीनें आपल्या कामगारांच्या टोळ्या करून त्यासच्च उपद्रव-केला.

नंतर विजापूरचे बादशाहा स्वतः फौज घेऊन कराडास आले. त्यांणीं कितीएक किल्ले घेतले व शिवाजीनीही शृंगारपूर वगैरे युध्द करून घेतले.

नंतर शिवाजीनीं श्रीरामदास स्वामीचा गुरुपदेश घेऊन स्वामीची कृपा संपादन केली. व मतापगडा वर कुळ-स्वामी देवीची स्थापना केलीच होती त्या देवीची ही मसन्नता

करून घेतली. त्या योगें कर्नाटकांत बंडें उत्पन्न झालीं. त्याचे
बंदोबस्ता करतां बादशाहास माघारे जावें लागलें. त्याणींप
रतजानांना वाडीकरसावंत याचे कुमकेस बाजीघोरपडे मुधो
लकर व बाळोलखान यास देऊन तिघांस शिवाजीस जिंक
ण्याविशीं सांगितलें.

हें वर्तमान शिवाजीस कळतांच त्याणीं कांहीं लोक बरा
बर घेऊन चोरवाटेनें फार जलदीनें जाऊन मुधोळा वर छा
पा घालून मुधोळकर व त्याचे कितीएक माऊबंद मारून गां
व जाळून लुटून परत माघारे आले.

नंतर शिवाजीभीं शके १५८४ सन १६६२ इसवी या व
र्षी मोठें सैन्य जमा करून पायदळाचे सरदार मोरोपंत पिं
गळे व स्वारांचा सरदार नेताजी पालकर यास करून जुनरा-
चे उत्तरेकडील कितीएक किल्ले पिंगळे यांणीं घेतले. व पालक
र याणें अवरंगाबाद पर्यंत मोंगलाचे मुलखांत लुटालूट करू
न पुण्यास माघारा आला.

हें वर्तमान दिल्लीचा पादशाहा अवरंगजेब यास कळ
तांच त्यांणीं शाईस्तेखान सुभेदार यास शिवाजीचे मुलखी
जाऊन त्याचा मुलूख घेण्याची आज्ञा केली. त्यावरून त्या-
णें येऊन पुणें व जुन्नर किल्ला घेतला. जुन्नर किल्ला घेते वेळे
स शिवाजीकडील फिरंगोजी नरसाळा किल्लेदार यांणें मोठा

पराक्रम केला. आणि आपले धणी शिवाजीयांस मिळा
ला. नंतर आणखी मागाहून शाइस्तेखानाचे कुमकेस-
जोतपूरचे राजे एशावंतसिंग फौजेसह पाठविले. त्यादो-
घांस शिवाजीनीं पुष्कळ शूरत्व दाखविलें. आणि माघारें
हटविलें. कितिएकवेळां त्या मुसलमानांचा पराभव-
केला. नंतर औरंगजेब बादशाहानें शाईस्तेखानाची ब-
दली करून त्याचे कामावर कुलतान माजूम सुभेदार-
यास नेमिला.

नंतर शिवानीं उडकर जमा करून चारहजार स्वा
रानिशीं सुरतेस जाऊन लुटालूट करून सहा दिवस
पर्यंत स्वस्थपणें द्रव्य नेऊन रायगडीं ठेविलें. इतक्यांत
त्याजला आपले तीर्थरूप कर्नाटकांत शिकारीस गेले-
असतां घोड्यावरून पडून मृत्यू पावल्याची खबर लाग
ली नंतर त्याची क्रिया सिंहगडावर करून मग आपले रा
जगडास जाऊन आपले राज्याचा बंदोबस्त करीत कांहीं
दिवसराहून आपले नांवास राजा असें पद जोडून आप-
ले नांवें शिक्काचालवूं लागले. हेंवर्तमानशके १५८६ सन
१६६४ वर्षझालें. आणि त्याचसालीं शिवाजीनीं अहम-
दनगरची पेठलुटून औरंगाबादेसभोंवताली धामधूमकरू
नहोते तों मागून विजापूरचे दोनसरदार येऊन कोंकणप

टी घेण्याविषयीं फार यत्न करीत होते; त्याजवर फौजे सहित शिवाजीराजे येऊन त्या सरदाराची दुर्दशा केली; त्या समयीं अकस्मात शिवाजीराजे जागोजाग प्रगट होतात; या वरून ते असंख्य रूपें धरितात की काय अ सा सर्वलोकांस भास झाला. आणि शिवाजीचे लढाऊ गलबतांनीं कितीएक दुसरीं गलबतेंवमोंगलाचे जहाजा वर बसून मक्केस जाणारे लोकांस लुटून बहुत द्रव्यें जमा केलीं. व मालवणा पासीं गोव्याचे दक्षिणेस सात रत्नरकोशांवर बालशिलोर या गांवीं लूट करून पुष्क ळ द्रव्य घेऊन तेथून महाबळेश्वरीं शिवाजीराजे आले

एतें शके १५८७ सन १६६५ इसवी या वर्षी शिवा जीनें मलबार पानीं स्वारी करून सरत शहर लुटलें; ते वेळेस फौज १५००० नेली होती. त्या समयीं बहुत द्र व्यानें भरलेले हुबळी शहर लुटलें; त्यांत लुट मिळाली इतकी कधीहीं लूट मिळाली नव्हती.

त्या पुढें औरंगजेबास मक्केस जाणारे लोक शिवा जीनें लुटलेहें समजतांच फार रागयेऊन त्याचे पारिपत्या स एक राजा जयसिंगरजपूत, दुसरा दिलिरखान, आ फरखान, हे दोघे सरदार मोठी फौज देऊन पाठविले. ते सरदार मोठे प्रबळ होते. त्यांणीं येऊन पुरंदर व सिंह

गड व पुण्यास घेरा घातला. ही खबर रायगडास शिवाजीस लागली नव्हती; पुरंदरचे किल्लेदार धैर्यानें लढत होते. व बाजी परभू महाडचा देशमुख याणें मावळे व हेटकरी लोक जमा करून, दिलिरखानाशीं फार मोठें युध्द करून दिलिरखानाचे लोक ठार मारले. तेव्हां दिलिरखानानें त्या मावळे लोकांचे सरदारास तीर मारून ठार मारिला; परंतु किल्लेदारांनीं किल्ला दिला नाहीं.

राजा जयसिंग मोंग विख्यात अशी कीर्ति, त्या जवळ फौज फार होती; आणि तो एकाएकीं आला; यामुळें शिवाजीकडील मानकरी वगैरे भय पावले; हें जाणून शिवाजीनीं त्या जयसिंगाशीं सल्ल्याचें बोलणें लाविलें, आणि शके १५८७ सन १६६५ या वर्षी थोडकेसे लोक बरोबर घेऊन जयसिंग राजाच्या लश्करांत शिवाजीमहाराज पोचले. तेव्हां जयसिंगानें शिवाजीराजाचा फार सन्मान केला. व दिलिरखानया शींही सलोरवाच केला. आणि त्याचे हवालीं पुरंदर-किल्ला केला; त्या वेळेस असें ठरलें कीं, मोंगलाचे मुलुख जे शिवाजीनें घेतले ते परत द्यावे, व विजापूर सरकारचे बत्तीस किल्ले घेतले त्या पैकीं वीस मोंग-

लास द्यावे. बाकी बारा किल्ल्यांची जाहगिर दिल्लीहून शिवाजीराजासकरून द्यावी. व शिवाजीचे पुत्र संभाजी आठवर्षांचे होते; त्यास पांचहजारस्वारांची मनसब द्यावी; असें ठरून कलह वाढला नाहीं. आणि अवरंगजेबास शिवाजीनें नम्रतेनें पत्र पाठविलें कीं विजापूरचे बादशाकडे जो मुलूख आहे. त्यांत चवथाई आणि सरदेशमुखीचा दहावा अंश मला द्यावा; या दोन्हींचें उत्पन्न पांचलक्ष होनाचें आहे; त्यातून वर्षास तीनलाख होन आपल्यास स्वामित्व देईन असें कबूल केलें; तेव्हां औरंगजेबाचे मनांत ही विजापूर बुडवावें, असें होतेंच. म्हणून त्याणें शिवाजीला फौजेसह अनुकूळ व्हावें; असें जयसिंगास पत्र लिहिलें. त्या प्रमाणें उभयतां विजापुराकडे चालले.

उभयतांबरोबर विजापूरचे सरदार यांणीं फौजेसहित येऊन मोठी शर्तचिलडायी केली. त्यावेळेस शिवाजीवत्याचा सरदार नेताजी पालकर यांणीं मोगपराक्रमेकेला. हेंवर्तमान औरंगजेबास कळल्यावर प्रसन्न होऊन शिवाजीसि बहुमानाचीं वस्त्रें व स्तुतीचें पत्र पाठविलें; आणि मा गाहून दुसरें पत्र पाठविलें त्यांत तुम्हीं येऊन भेटावें; तुमचा मोगासन्मान होईल. व परतजाण्यास अडचणा-

पडणारनाही. असें लिहिलें. त्यावरून जयसिंगाचे म सलतीनें दिल्लीस जाण्याचा निश्चय करून आपल्या साऱ्या किल्ल्यांचा बंदोबस्त केला. आणि रायगडीं सर्व मानकरी जमाकरून आणि आपण तेथें येऊन मोरोत्रिं बकपिंगळे व आबाजीसोनदेव व आनाजीदत्तो यांतिघां स आज्ञाकेली कीं, आह्मीं दिल्लीहून परत जाऊन येईपर्यंत तुह्मीं मुख्यत्वेंकरून सार करावा; असें सांगून आपला पुत्र संभाजीयास बरोबर घेऊन शिवाजीराजे पांचशेंस्वार व एकहत्तीर मावळेलोक इतक्यासहित शके १५८९ सन १६६७ यावर्षी निघून दिल्लीजवळ गेले, तेव्हां बादशाहा नीं आपणून जातांदोनसरदारसामोरे पाठविले व भेटझा ल्यावर बादशाहानें शिवाजीसि सरदाराचे ओळींत बसवि लें तेव्हां त्याजला रागयेऊन काहीं दुर्भाषणकेलें तें बादशा हास कळल्यावर शिवाजीनीं पुनः दरबारास येऊंनये, अ सा निरोप पाठविला. मग शिवाजीनीं औरंगजेबास विनं- ती केली कीं माझेंचाकरीचें कारणनसेल तर माघारेजातो, त्यावर काहींउत्तरनदेतां शिवाजीराजे यांचेराहण्याचेहवे- लीसमोंवतीचवकीबसविली. नंतर शिवाजीराजानीं पुनः विनंती केली कीं, मजबरोबरचेलोकतरीं माघारेजाऊद्यावे, तेंबो लणेंसरकारांतमान्यहोऊनलोकजाण्यासहुकूमदिला. शिवा

जीचे चिरंजिवा सहित तेथें राहिले. त्यांणीं दरबारांत मो
ठे मोठे सरदारांसीं नजराणा देऊन भेट करून आपल्या
स तुवरणाईतपणादारवविला. आणि देवब्राह्मण, फकी
र वगैरे यास बहुत धर्म केला. आणि मिठाया भरून पे
टारे नजर पाठविण्याचा पात चालविला. आणि एके दि
वशीं आपण व चिरंजीव असे दोघे पेटाऱ्यांत निजूनतें
पेटारें माणसांकडून शहराबाहेर नेले. आणि पेटाऱ्यातून
बाहेर निघून एका घोड्यावर दोघे बसून गुप्तरूपें मथुरे
स जाऊन एक ब्राह्मणाचे घरीं मुलास ठेवून आपण गो
सावियाचा वेष धरून माघारे रायगडास आले. तेथें आप-
णास सर्व गोष्टी अनुकूळ आहेत असें मनांत आणून-
स्वस्थ राहिले. त्या वेळेस जयसिंगानें विजापुरास वेढा घा
तला होता; त्याचा पराभव होऊन फार नाश झाला.
त्याचे बदलीवर पुन्हां सुलतान माजूम सरदार नेमिला
आणि जयसिंग दिल्लीस माघारें बोलाविला तो जातांना
वाटेंत मृत्यु पावला.

या सुलतान माजुमास शिवाजी नीद्रव्य खर्चून वश
केला. आणि त्याचे हातून बादशाहास लिहून पाठविलें, त्या
त चाकरीची कबुलायत लिहविली; त्यावरून बादशाहानें
राजा असें पद देऊन पुणें व चाकण व सुपे परगणा व वरा

डभांतांत एक जाहगिर या प्रमाणें दिली व पुत्र संभाजी-
यास मनसब देऊं केली होती, ती दिली.

शके १५९० सन १६६८ या वर्षी शिवाजीराजास स्वं
डणी विजापूर सरकारानीं तीन लाख, व गोवळकोडचा बा
दशाहाची पांच लाख, या प्रमाणें प्रतिवर्षी देऊं, असे करा
र होऊन चालू झाली.

नंतर शिवाजीराजानीं दोन वर्षे आपले राज्याचे वस्क
लाचे व लश्करचे वर्तणुकीचे वगैरे कायदे नवे करून पूर्वी
मिळालेलें द्रव्य आपण घेतल्या किल्ल्यावर नेऊन ठेवून प्र-
तिवर्षी दसऱ्यास समारंभ करून फौजेची हजिरी घेणें व सर
सालचा जमाखर्च पाहण्याची वहिवाट चालविली; तेणें क
रून त्याची प्रशंसा मोठी झाली. व त्यावेळस कामगार केले ते,

१ पेशवा मुख्यप्रधान. मोरोत्रिंबक पिंगळे यांणीं सर्व चौकशी करावी.

२ मुजूमदार आबाजी सोन देव यांणीं जमाबंदी व खर्चाची चौकशी करावी.

३ सरनीस. आनाजी दत्तो यांणीं दप्तर संरक्षण करावें.

५. सरनोबत २
१ स्वारांचे काम प्रतापराव गुजर.
१ पायदळाचें काम येसाजी कंक.
—

६. सोमनाथपंत डबीर. यांणीं परराज्यांतील चौकशी व-

व मनदांची वारनिशी. वोळणें करावें.

४. वांकनीस दत्ताजी त्रिम ७. न्यायाधिश. निराजीरा
ळ यांणीं खासगी शिबंदीव वजी. यांणीं इनसाफ करा
दप्तरचें काम करावें. वा.

८ न्यायाधिश. शाभूशास्त्री
प्रथम. नंतर रघुनाथराव केले

या प्रमाणें अष्टप्रधान केले. चिटणीस बाळाजी आवजी परभू फार चतूर होता, तो केला. व बाळकृष्णपंत हणवंते फडणीस केले. शेषापानाईक चांभार गोंदेकर यांस मालोजीराजे यांचे पूर्वीचे वचना प्रमाणें जामदार केलें. या प्रमाणें करून हे तीनकामगार निरंतर जवळहोते

नंतर सिंहगड वगैरे बहुत किल्ले युध्द करून शिवा जीनीहस्तगत केले. मोंगलाचे लोक धरावयास आलेल्या चा पराभवकेला. असा दिवसेंदिवस जयफारझाला. खा नदेशालुटून वसूलाचीचौथाईप्रतिवर्षघेतजावी, असें ठरवून आवडा वसालहेरहे दोन किल्ले घेतले. नंतर अव रंगजेबानीं दक्षिणदेशांत मोहोबतखान दुसरासरदार पाठविला. त्याबराबर मोठी फौज दिली. हेंवर्तमान शिवा जीराजासकळलांच मोरोपंत व प्रतापराव गुजर याजब रोबर वीसहजार फौज देऊनत्यावर लढायीस पाठविलें.

त्यांणीं युध्द करून मोंगलाचे फौजेचा अतिनाश केला. शिवाजीराजाचे फौजेची मर्दुमकी अतिविख्यात झाली.

नंतर शके १५९५ सन १६७३ यावर्षी शिवाजीराजा नीं सैन्य जमा करून विजापूरचा बादशाहा अबदुलमहमद मरणपावतांच त्याकडे स्वारी करून पन्हाळा किल्ला घेऊन-हुबळीशहर आनाजीदत्तो यांजकडून लुटवून असंख्य द्रव्य-मिळविलें. व परळी किल्ला घेतला. व सातारा किल्ला व चंदनवंदन व नांदगिरी व पांडवगड व तायवड असे किल्ले हस्तगत-केले. व अबदुलकरीम विजापुराहून फौज घेऊन आला, त्याचा पराभव शिवाजीराजाचा सरदार हंसोजीमोहिते यांणीं केला. त्या मोहित्याचे लोकांत संताजीघोरपडे व धनाजीजाधव मोठे विख्यात होते, त्या वेळेसच आबाजीसोनदेव मेले. त्याची मुजूमदारी त्याचा लेक रामचंद्रआबाजी यास दिली.

या नंतर बहुतकरून दक्षिणप्रांत व कर्नाटक चंजार्फ व गैरे प्रांत व किल्लेकोट हस्तगत केले. व मांडलिकराजे व पाळे-गार सर्व खंडणी देऊंलागले. विजापूरबादशाहात हस्तगत जा हली. भागानगरचे पातशाहानीं तह केला. दौलताबादशाईनी-ल कित्येक सुभे पास झाले. ६॥ सुभे दक्षिणप्रांत राज्य बनकरून हस्तगत झालें. व राहिलें त्यांत चौथाई मोकासा बाबदी सावोत्रा निमेंअम्मल स्वराज्य जाहला. एक दिल्लीचें राज्य

मात्र स्वसत्तेंत येणें राहिलें तें ही सत्तेंत येईल; असें शिवाजी-
महाराजांचे मनांत येऊन आपण असेंच राज्य करणें हे पा-
ळेगारांत संख्या धरतात. याजकरितां क्षात्रधर्माभिमाणें राज्या-
भिषेक करवून सिंहासनाधिश्वर व्हावें; छत्रपतीक्षत्रिय कुलाच
तंस राजा असें म्हणतांवेराज्यनीतीनें राज्य चालवावें; म्हणोन
महाराजांनीं निश्चय करून आपले पदरी लोक, सरदार, कारकू-
न, महाल, किल्ले, कारखाने, मुलूख, माणसें आपले सत्तेंत कि-
ती आहेत, यांची निवड केली, त्यांतून मुख्यांचीं नांवें खालीं लि
हिली आहेत.

## कारकूनव मुत्सद्दीवगैरे.

| | |
|---|---|
| १ मोरो त्रिंबक पिंगळे. | २२ दत्ताजी गोपिनाथ बोकील. |
| २ रामचंद्र निळकंट. | २३ आनाजी रंगनाथ केळकर. |
| ३ रघुनाथराव पंडित. | २४ विठ्ठल दिनदेव गरुडकर. |
| ४ अंणाजी दत्तो. | २५ कोनेहरपत. |
| ५ जनार्दन पंत हणमंते मज मदार. | २६ शिवभट उपाध्ये. |
| | २७ शिवाजी शंकर. |
| ६ दत्ताजी पंतवाकनीस. | २८ कृष्णाजी पंत. |
| ७ बाळाजी सोनदेव. | २९ मथुरे. |
| ८ निराजी रावजी. | ३० काशीपंत मथुरे. |

९ प्रल्हाद निराजी.
१० बाळाजी आवजीचिटनी वीस.
११ चिमणाजी आवजी दरदार.
१२ तिमाजी केशव सबनीस
१३ भास्कर भट उपाध्ये.
१४ शामजी नाईक पुंडे पोतदार
१५ शंकाजी निळकंठ
१६ रघुनाथ बल्लाळ कोरडे.
१७ बाळाजी रघुनाथ.
१८ नरहर बल्लाळ सबनीस
१९ रावजी सोमनाथ सप्ते.
२० व्यंकाजी दत्ताजी.
२१ त्रिंबक भास्कर.
३१ विश्वास राव.
३२ विसाजी पंत मथुरे.
३३ कृष्णाजी जोशी.
३४ नरहर आनंदराव
३५ बाळ भट गोसावी उपाध्ये.
३६ कृष्णाजी सखाजी.
३७ शामजी आवजीका रखवालीस.
३८ एसाजी गोविंद
३९ शामराव पद्मनाथ.
४० गोविंद भटजी उपाध्ये.

# सरदारलोक.

१ हसाजी हंबिरराव मोहिते. सरनोबत.
२ गोमाजी नाईक पानसबल्ल
३ बहिरजी नाईक इंगळे.
४ खंडोजी जगताप.
५ गोंदजी जगताप.

६ सताजी राजे भोसले शा
हाजीराजे महाराजयांचे
नाटक शाळेचे पुत्र.
७ साबाजी भोसले शिगणा
पूरकर.
८ रुपाजी भोसले सरदार.
९ मानशिंग मोरे.
१० माहादजी नाईक पानस
बळ.
११ मकाजी अनंदराव.
१२ सुधाजी रावजी ण ५२.
१३ गणोजी दरेकर.
१४ कान्होजी आगरे.
१५ संताजी घोरपडे
१६ धनाजी जाधवराव.
१७ तैलगराव पागे सरदार.
१८ एकोजी खाडेकर जुमले
दार.
१९ रामचंद्री.
२० कान्होजी माडवळकर
२१ संताजी जगनाप
२२ बाजी जळगे.
२३ मालोजी नलगडे.
२४ हिरोजी शेळके.
२५ मालोजी निंबाळकर.
२६ जेशिंग पालकर
२७ आनंदराव निंबाळकर.
२८ बाजी मोहिते
२९ चंदाजी काठकर.
३० नेताजी काठकर.
३१ [illegible]लाजी शिर्के.
३२ [illegible]नाजी शिर्के
३३ [illegible]णोजी शिर्के (पिलोजीचे
[illegible]त्र)
३४ [illegible]भाजी शिर्के.
३५ [illegible]शिंग पालकर.
३६ नरसोजी भोसले.
३७ मुजवलराव.
३८ अरेराव.
३९ बहिरजी घोरपडे.

४० संभाजी काटकर.
४१ सूर्याजी काटकर.
४२ राया नी गडधे.
४३ देवजी उघडे.
४४ केरोजी पवार.
४५ परसोजीशितोळे.
४६ रामाजी जळगे
४७ एसाजी खंडेकर.
४८ बुबाजी पवार.
४९ कृष्णाजी घाटगे.
५० कृष्णाजी पवार.
५१ संभाजी कावजी.
५२ आपणे.
५३ रामोजी शिर्के.
५४ वाघोजी शिर्के.
५५ हरजी राजे महाडीक.
५६ अनंदरावडफळजारी.
५७ तुकोजी पालकर.
५८ उचले.
५९ आतलोजीराजेमहाडीक

६० महादजीनाईक निंबाळकर
६१ एसाजी पांगारत.
६२ खंडेराव दाभाडे.
६३ नेमाजी शिंदे.
६४ खंडोजी आटोळे.
६५ बहिरजी बडगर.
६६ बळवंतराव देवकाते.
६७ भवानराव देवकाते.
६८ माहूरगिर.
६९ काकडे.
७० कडु.
७१ कोकाटे.
७२ आमरोजी पांढरे.
७३ अमृतराव निंबाळकर.
७४ बाळोजी नाईक निंबाळकर रे.
७५ दमदेरे
७६ होंडे.
७७ मालोजी निंबाळकर

# पायदळाचेसरदार

## मावळेलोक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एसाजी कंक सरनोबत | १८ | हिरोजी राउे. |
| २ | तानाजीराव मालुसरे. | १९ | रामोजीमोरे. |
| ३ | जिवमाहाला | २० | डोळे. |
| ४ | सोनमाहाला. | २१ | नानाजी दुंदुसकर. |
| ५ | शानपाटील एशावंतराव | २२ | पिलाजी सणस. |
| ६ | रामाजी विश्वासराव. | २३ | जावजी पारले. |
| ७ | कृष्णाजी नाईक. | २४ | मुधोजीहुणकणे. |
| ८ | रूमानजी नाईक. | २५ | विठुजी कडु. |
| ९ | नाना सावंत | २६ | इदाजी गोरड. |
| १० | कोंडजी वळखले. | २७ | महादजी फर्जंद. |
| ११ | बाजी राव पासलकर | २८ | हिरोजी फर्जंद |
| १२ | बाबाजी प्रभुदेशपांडे. | २९ | नागोजी फर्जंद नाईक. |
| १३ | हिरडस मावळकर. | ३० | बरवाजी फर्जंद. |
| १४ | बाजीसुरारदेशपांडे म हाडकर. | ३१ | पारठे. |
| १५ | दवळे. | ३२ | ठाकुर |
| १६ | कुडाळकर. | ३३ | ढमाले. |
| १७ | मलघडे. | ३४ | दादाजी बापुजी देशपांडे |
| | | ३५ | चिमणाजी बापुजी देशपांडे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | रामदळवी. | ४८ | मुधोजी सासवदेकर |
| ३७ | वांगराव. | ४९ | कृष्णाजी भोसले. |
| ३८ | दिनकरराव | ५० | हरजीनाईक जासूद. |
| ३९ | मालसावंत | ५१ | गणोजीकावळे. |
| ४० | तुळाजी फर्जंद. | ५२ | खंडोजीनाईक जासूद. |
| ४१ | जावजी मोलने. | ५३ | सोमाजीनाईक बाकी. |
| ४२ | हिरोजी मालगिरे. | ५४ | रुयाजीकाळे. |
| ४३ | मुधोजी खानवळकर. | ५५ | बापूजी मांदरे. |
| ४४ | एसजी दरेकर. | ५६ | सूर्याजी मालुसरे. |
| ४५ | बाजीराव दरेकर. | ५७ | राणोजी दरेकर. |
| ४६ | सोनदळवी. | ५८ | तुकोजी लाड |
| ४७ | चांगाजी कडु. | | |

## अमदारांचेसरदार.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दर्यासागर. | २ | इब्राहिमखान |
| २ | मायनाक भाडरी. | | |

## किल्लेव मांत,तालुके

| | मांतसातारा | वाई | मांत कराड. |
|---|---|---|---|
| १ | सातारा | १ चंदन | १ कसबेकराडवगैरे |

| | |
|---|---|
| २ | परळ/सजनगड |
| ३ | वैराटगड. |
| ४ | पांडवगड. |
| ५ | कमलगड. |
| ६ | नाथवडा. |

| | |
|---|---|
| १ | वंदन |
| २ | नांदगिरी. |
| ३ | वर्धनगड. |
| ४ | महिमनगड |

| | |
|---|---|
| २ | वसंतगड |
| ३ | मच्छिंद्रगड |
| ४ | भूषणगड. |

## प्रांत मावळ.

| | |
|---|---|
| १ | रोहिडा |
| २ | कलजा. |
| ३ | पुरंदर |
| ४ | रुद्रमाल |
| ५ | राजगड |
| ६ | सिंहगड. |
| ७ | तोरणा. |
| ८ | नारायणगड |
| ९ | मोरगिरी. |
| १० | चावडागड. |
| ११ | पारगड |

| | |
|---|---|
| १२ | तुग |
| १३ | तिकोना. |
| १४ | विसापूर. |
| १५ | कुवारी. |
| १६ | घनगड. |
| १७ | राजमाची |
| १८ | वासोटा. |
| १९ | शिवनेरी |
| २० | मदनगड. |
| २२ | रांगणा. |
| २३ | रानेगड. |

| | |
|---|---|
| २४ | पन्हाळा |
| २५ | पांडवगड. |
| २६ | गगनगड. |
| २७ | खेळणा (विशा |
| २८ | ळगड) |
| २९ | गजेंद्रगड. |
| ३० | शिवडा |
| ३१ | भुपाळगड. |
| ३२ | खेळणा. |
| ३३ | सुदरगड. |

## प्रांतकोकण,बांधारीवनळदुर्ग.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | मालवण (सिंधुदुर्ग | १२ | विजयदुर्ग | २० | जयदुर्ग. |
| | | ११ | खांदेरी | २१ | कुलाबा. |
| २ | रत्नागिरी. | १२ | अजनवेल. | २२ | रायगड. |
| ३ | राजकोट. | १३ | मंडणगड | २३ | कमनिधीगड. |
| ४ | पाली | १४ | लिगाणा. | २४ | राम गड. |
| ५ | कांगोरी. | १५ | कमारगड | २५ | रसाळगड. |
| ६ | करनाळा | १६ | कवर्णदुर्ग | २६ | भोरप. |
| ७ | बालकगड | १७ | सारंगगड. | २७ | माणिकगड. |
| ८ | सिंदगड. | १८ | बलडगड. | २८ | समानगड. |
| ९ | बिरवाडी. | १९ | प्रतापगड. | २९ | मंडणगड. |

## प्रांत कोकण

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | वहिरवगड. | ८ | प्रबळगड. | १५ | कुंभगड. |
| २ | सागरगड. | ९ | मित्रगड | १६ | मंडणगड. |
| ३ | शिलारागड. | १० | भास्करगड. | १७ | प्रचितगड. |
| ४ | महिधरगड. | ११ | आरनाळा. | १८ | घोसाळागड. |
| ५ | सेटगोगड. | १२ | महिपतगड. | १९ | कावजई |
| ६ | अवचितगड. | १३ | मनोहरगड. | २० | सुमानगड. |
| ७ | मलादगड. | १४ | सहजगड. | २१ | विरगड |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | रत्नगड. | ३३ | मकरंदगड. | ३६ | माहुली. |
| ३१ | सरगड. | ३४ | महिमंडणगड | ३७ | समानगड |
| ३२ | महिमतगड | ३५ | | | |

## ठाणें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | कल्याण | ५ | वाई | ९ | सपें. |
| २ | शिरवळ | ६ | तासगाव | १० | भिवडी. |
| ३ | खटाव | ७ | चाकण. | ११ | मिरज. |
| ४ | बारामती | ८ | कऱ्हाड | १२ | करवीर. |

## प्रांतबागलाण.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोलरी. | ३ | नाहवा. | ५ | हरसल. |
| २ | लोणरा. | ४ | अहिवंतगड | ६ | घोडप. |
| | | | | ७ | मुलेरी. |

## प्रांत त्रिंबक

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | त्रिंबक. | ८ | मनरंभगड | | |
| २ | रामसेन. | ९ | सिंधगड. | १५ | चांवडस. |
| ३ | गडगडा | १० | जिवधनगड | १६ | चांदवडी. |
| ४ | बडिक | ११ | रेवलागड. | १७ | हरिद्रगड. |
| ५ | हर्षण. | १२ | पट्टागड. | १८ | राजदेहर. |
| ६ | आंवदा. | १३ | रावलागड. | १९ | मनोहरगड |
| ७ | मानचनागड. | १४ | हडसर | २० | मृगगड. |

| | | |
|---|---|---|
| २१ सबळगड<br>२४ आणलाई | २२ मार्कंडयागड | २३ केराक |

प्रांतफौडबिदनूर

| | | |
|---|---|---|
| १ कोटफौड. | ५ कोटकडवाळ | ९ कोटशिवेश्वर |
| २ कोटकाहुर | ६ कोटआकोलें: | १० कोटमगरूळ. |
| ३ कोटबलार. | ७ कोटकटेजर. | ११ कोटवल्याळ. |
| ४ कोटकलबुर्गे | ८ कोटकृष्णागिरी | १२ कोटकडनूर |

प्रांतकर्नाटकवगैरे.

परगणेजगदेवगड.

| | | | |
|---|---|---|---|
| १ जगदेवगड | ११ गगनगड | २१ सुंदरगड | ३१ हरिहरगड. |
| २ वारूणगड | १२ महाराजगड | २२ कोटगारूड | ३१ महिनदगड. |
| ३ सुदर्शनगड | १३ सिध्दगड. | २३ रजनगड. | ३२ कोटचालगोडा. |
| ४ कृष्णगिरी | १४ मलकाजुनगड | कमोदगड | ३३ कोटआटनुर. |
| ५ रम्यगड. | १५ कस्तुरीगड | २४ कोटत्रिपादुर | कोटशामल |
| ६ जवादिगड | १६ मार्तंडगंड | २५ भवानीदुर्ग | ३४ कोटतुटाजेठी |
| ७ प्रबळगड. | १७ बहिरवगंड | २६ कोटविराडे | ३५ कोटअमरापुर |
| ८ दिघपल्लीगड | १८ रामगड. | २७ कोटवरवनूर | ३६ कोटचांगमाळ |
| ९ मंगळगड | १९ मनोहरगड | २८ कोटतुलसूर | ३७ कोटआदुर |
| १० नदीगड | २० कलपगड | २९ कोटतळगिरी | ३८ कोटधर्मपुरी |

प्रांतएदुर तालुके वगैरे.

| | |
|---|---|
| १ कोटअर्काट | २ कोटदळणाप, चेतपासहली रसाळगड. |

रण

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | कोटचिमळ | १२ | पालकोट | २० | एश्रावंतगड. |
| ६ | कोटचिकान दुर | १३ | चजिबाराकोट | २१ | श्राणगड. |
| | | १४ | कोटवृंदावन | २२ | गोजरागड. |
| ७ | पुरव्यगड | १५ | सागरगड | २३ | कोलबलगड. |
| ८ | गर्जनगड | १६ | साजरागड. | २४ | पडवलगड. |
| ९ | पडवीडगड | १७ | अजरगड. | २५ | कुभेगड |
| १० | कर्नाट गड | १८ | कोटलहदुर | २६ | कोटचिवादी. |
| ११ | कैलासगड | १९ | महिमंडणगड | | |

## प्रांतवनगडवगैरेतालुका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | वनगड. | ११ | गहनगड. | २० | बिराटकोट. |
| २ | श्रीमनगड | १२ | गंधर्वगड. | २१ | दुमदुर्ग. |
| ३ | श्रीमंतगड | १३ | दामेगड. | २२ | ब्रह्मगड. |
| ४ | श्रीगर्दनगड | १४ | रूपगड. | २३ | गणेशगड. |
| ५ | श्रीनरगुंद | १५ | पराक्रमगड. | २४ | श्रीवर्धनगड. |
| ६ | श्रीचमका | १६ | कानकाद्रिगड | २५ | वडन्न गड |
| ७ | रागड. | १७ | ठाकुरगड. | २६ | रवलगड |
| ८ | सरसगड. | १८ | आंबेजिराई | २७ | मृगमदगड. |
| ९ | बुधलाकोट | | गड. | २८ | मईवारगड. |
| १० | मैंदगिरी. | १९ | सोमशेखरगड | २९ | मूमंडलगड. |

| | | |
|---|---|---|
| २९ नलगुंद | ३१ बिदनुरकोट | ३५ हतमगलगड. |
| मिरागड | ३२ भास्करगड. | ३६ मलकोन्हरकोट. |
| ३० महिपाल | ३३ भीमगड | ३७ मल्हारगड |
| गड | ३४ माणिकगड. | |

## प्रांत चंदी.

| | | |
|---|---|---|
| १ राजगड | ३ चैनगड. | ५ मदोन्मतगड. |
| २ कोमकोट | ४ कृष्णगिरी | ६ भरवट्टगड. |

## प्रांत चंजाउर व अरणी.

यां प्रमाणें लिहिले आहेत. या खेरीज किनिएक चांगलीं माणसें होतीं, व प्रांत मुलूख होते.

रामेश्वरा पासून गोंडवण चांदे वराड हे प्रांत नर्मदे पर्यंत दस्त झाले. चौथ मोकासा अंमल बसून चालला.

अशी निवड करून राज्यव्यवस्था चालविण्यास अष्टप्रधान केले. हादशाकोस बारामहाल; व अष्टदशाशाला (अठरा कारखाने) करून त्याजवर कामगार केले.

# अष्टप्रधान.

## पूर्वी पारशी भाषेंत नांवें होतीं ती बदलून संस्कृत भाषेंत केलीं.

| पारशी नांव | त्याचें संस्कृत. | ज्यास किताब दिला त्याचें नांव. |
|---|---|---|
| १ पेशवे. | मुख्यप्रधान. | मोरोत्रिंबक पिंगळे. |
| २ मुजूमदार | पंतअमात्य. | रामचंद्र आबाजी बहुतकर |
| ३ सरनीस. | पंतसचीव. | आनाजी दत्तो. |
| ४ वांकनीस | मंत्री. | दत्ताजी त्रिमळ. |
| ५ सरनोबत | सेनापति. | हसाजीराव मोहिते. |
| ६ डबीर. | संमत. | जनार्दन पंत हणवंते. |
| ७ न्यायाधिश | न्यायाधिश. | बाळाजी पंत पुढें हेमाजी अनंत. |
| ८ न्यायशास्त्री | पंडितराव. | रघुनाथराव |

## द्वादश कोसवारामहाल.

| | |
|---|---|
| १ अंतःपुर रक्षणी महाल | २ द्रव्यभांडारमहाल पोतें |

३ धान्यागार महाल (कोठी)
४ अश्वधन महाल (पागा)
५ गो धन महाल (थट्टी)
६ आराम क्षेत्रे महाल (शेरी वागा.)
७ महाल टंकशाळा.
८ महाल शिबिंदी कादियानें
९ महाल इमारत
१० महाल सौदागिरी.
११ महाल चौबिक.
१२ वंसनगार. जामदारखाना

# अष्टदशशाळा.

## अठराकारखाने.

१ गजशाळा (हत्तीमहाल.) (पिलखाना.)
२ पानीय शाळा (अंदारखाना)
३ उष्ट्रशाला. (उष्टारखाना)
४ रत्नशाला. (जवाहिरखाना)
५ शस्त्रशाळा. (शिलखाना.)
६ रथशाला. (गाडिखाना.)
७ सिबिरशाला. (फरासखाना)
८ मल्लशाळा. (नालिमखाना.)
९९ जिन्नसखाना.
१० अंबरखाना. (धान्यसंग्रहस्थान.
११ यंत्रशाळा. (तोफखाना)
१२ खटकशाला (शिकारखाना.)
१३ लेखनशाला. (दप्तरखाना.)
१४ पाकशाला. (मुदबखखाना.)

| | |
|---|---|
| १५ नाटकशाळा नटरखाना. १७ | तांबुलशाला, सराफखाना |
| १६ भेरी दुंदुभी, नगारखाना. १८ | वैद्यशाला, सरबतखाना. |

याप्रमाणें करून नंतर काशीक्षेत्राहून पैठणास गागाभटनामें मोठा विद्वानब्राह्मण आलाहोता, त्याजला मोठे सत्कारानें आणून रायगड मुकामीं अष्टप्रधान व मांडलिक राजे व सरदारउमराव वगैरे व शास्त्री पंडित बोलावून आणून जमाकेले. या प्रमाणें राज्याभिषेकाची सर्व तयारी करविली

शके १५९६ जेष्ट शुद्ध ६ सन १६७४ इसवी पासून मोठा समारंभ करून प्रथम राज्याभिषेकांगवृतबंध व होम हवने यज्ञ ब्राह्मणभोजने करून नंतर जेष्टशुद्ध १३ शके मजकूर रोजीं सईबाईसाहेब पट्टराणी यांस पटबंधन करून त्या सहवर्तमान शिवाजीमहाराज यांस यथाशास्त्र राज्याभिषेक झाला. आणि त्या दिवसा पासून शिवाजीमहाराजांचा शक चालूझाला.

राज्याभिषेकानंतर सर्व राजेरजवाडे अष्टप्रधान वगैरे सरदार यांस योग्यते प्रमाणें वस्त्रें, शस्त्रें, घोडा, हत्ती, चौरी, पालखीवगैरे देऊन शास्त्री, पंडित, वैदीकब्राह्मण यांस मोठेसत्कारें करून वस्त्रें व दक्षिणा दिली. वसोन्याची तुला केली. आणि राज्यरीती स्थापून राज्य चालविलें.

नंतर शके १५९८ सन १०८७ फसली या वर्षी तोटा

रा व पन्हाळा यांचे मधला मुलूख तिसऱ्यानें घेऊन वर्धनगड वगैरे चार किल्ले बांधिले. नंतर शिवाजीमहाराजांचे शरिरीं समाधान नसून कांहीं महिने साताऱ्यास होते, तेव्हां देवीची सेवा अनुष्ठानें फार करून दुरवणयातच कर्नाटकमांतीचे राज्य घेण्याची मसलत केली. त्या सालचे अखेरीसच्या र ३०००० आणि ४०००० पायदळ अशी ७०००० फौज घेऊन गोवळकोंडयास जाऊन तेथील बादशाहाशीं लढकरून त्याजपासून तोफा वगैरे सरंजाम घेऊन शके १५९९ सन १०८८ फसली या वर्षी तेथून निघून कृष्णेचे पलिकडे श्रीशैल्य परवतीचें देवस्थान आहे; तेथें देवदर्शनासमहाराजए कटच्च गेले. तेथें बारादिवस मोठें दुर्घट तप करून शेवटीत रवारीनें कंठ कापून घेऊंलागले; त्यासमयीं श्रीभवानीदेवी- मत्यक्ष येऊन त्याचें निवारण करून बोलली कीं, राजा, तुझे हातून अद्यापि हिंदुधर्म वाढवावयाचा आहे तुला जय येईल; असा आशिरवाद देऊन गुप्त झाली. नंतर महाराज- आपले लश्करांत जाऊन मिळाले. व जिंजिकिल्ला विजापूर- सरकारचा होता; तो घेतला; विजापूरसरकारचा एक सरदा र पांचहजारस्वारानिशी होता; त्याचा पराभव केला.

नंतर चंदोरभांत घेण्याचा यत्न चालविला. आपि- आपला सावत्रबंधू व्यंकाजीराजे यांस चंदोराहून भेटण्या-

स बालाविलें. तेव्हां त्याचा निरुपाय होऊन भेटण्यास आला
त्याजला आपले बापाचे जाहगिरीचा अर्धाभाग वाटणी मागि
तली. परंतु त्याणें ऐकिलें नाहीं. मग शिवाजीमहाराज याणींत
जला माघारी जाऊं दिलें. युध्दा वांचून हेंघडतनाहीं; असें मन
त आणून बिलोरास येऊन आपले बापाचे जाहगिरी संबं
कोल्हार व बंगलोर व उसकटा व बाळापूर हे सर्व परगणे ये
तलें. आणि विजापूरकरांचे मुलखाची लुटालूट केली. आणि
आपले मुलुखाकडे परत येतांना आपले बापाचा दासीपुत्र
यास व रघुनारायण व हंबिराव मोहिते, यांस कर्नाटकाचें क
म सोपून दिलें.

मग बिजोरी, कुपाळ, व बहादुरवेडा हे किल्ले घेतले. व त्या
काम जर्नादनपंत रुमंत यास सांगितलें. आणि आपण दु
ल शहरास आले. इतक्यात व्यंकाजीनें मागेराहिले लश्करा
छापा घालून आपणच पराभव पावला हें वर्तमान शिवाजी
हारा जास कळल्या वर त्याणीं व्यंकोजीस सांगून पाठविलें
अझीदांडगाई केल्यास सरदारासह येऊन तुमचें पारिपत्य
करावेंलागेल. तेव्हा व्यंकोजीनें रघुनाथनारायण यांचे हातें
ल्लिचे जिनगीचा व मुलखाचा अर्धाभाग शिवाजीस दि
आणित्यास वश्य केले. मग शिवाजी रायगडी आले. व आणखी
पुष्कळ स्वाऱ्या करून विजापूरसरकार जेरीत आणून तह केल

शिवाजीमहाराजास सात स्त्रिया होत्या. पहिली सईबाई विगे जी मोहिते नेवासकरांची कन्या. तिचा पुत्र संभाजी, यांचा जन्मरा यगडासजेष्ठ शुध्द १० शके १५७९; दु०, पुतळाबाई शिर्क्यांची कन्या. तिसरी सोयराबाई हिचा पुत्र राजाराम यांचा जन्म, शके १५८०. चौथी, सकवारबाई. पांचवी; लक्ष्मीबाई. सहावी, सगुणा बाई. सातवी गुणवंताबाई. व या खेरिज पहिले स्त्रीस एक कन्या होती; तिचें नांव अंबिकाबाई. अशीं शिवाजीमहाराजा स तीन आपत्यें होतीं.

शिवाजीमहाराज मोठे विलक्षण चतुर पुरुष होते, त्याचेंशौ र्यत्याचे सदरचे पराक्रमा वरून किती होते, हें समजलेंच. व मसं-गानुसार अनुसरून स्वकार्य साधण्याची मोठी दक्षता होती. मि-जास अगदीं नसून कजाखी सोसण्याचा मोठा अभ्यास होता. द्र व्याचा व्यय उदारपणें धर्मादि सत्कर्मास करण्याची मोठी आवड होती. अंतःकरण त्यांचें निरंतर सदय असून सर्वांभूतीं दया होती त्यांणीं ब्राह्मणांचे व प्रजेचे पालन उत्तम प्रकारें केलें. भगवत्भ क्तीविषयीं मोठी निष्ठा. व गुरूसेवेच्या ठायीं अति आदर. त्यां-स पूर्वी साक्षात्कार झाला होता, हें मागें लिहिलेंच आहे. वर्ज्या पुरुषा वर श्री रामदास स्वामीची व श्रीभवानीदेवीची पूर्ण कृपा होती. सारांश असा पुरुष दोनशें वर्षांत झालानाही व पुढें होणें कठीण.

शिवाजीमहाराज रायगडावर असतां गुदगीचा आजार होऊन ज्वर येऊन सातवे रोजीं (चैत्रशुद्ध १५ शके १६०२ रौद्र नामसंवछरे तारीख ५ एप्रिल सन १६८० ) या रोजीं देवाज्ञा झाली. त्या वेळेस त्याजकडे सर्व कोकणपट्टी व पुणे प्रांत व कर्नाटकांतील देश व दुसरे कांहीं देश त्याचे स्वाधीन होते. त्या देशांतडों गरीकिल्ले ही पुष्कळ होते, त्यावर शिबंदीलोक ठेवून मुलुखाचा बंदोबस्त ठेविलाहोता, अंतकाळ समयीं त्याँचें वय चेपन्नव षाँचे होतें.

अंतकाळा पुर्वी पेशवे व सचीव वगैरे मोठे सरदारां जवळ महाराजानीं सांगितलें कीं, थोरला पुत्र संभाजी याचे गुण नीट नाहींत. याजमुळें राज्यास अपाय होतील, असें दिसतें; ही गोष्ट सोयराबाईसाहेबमहाराजांची तिसरीस्त्री यांस कळतां च तिचे मनांत आपले पुत्रास राज्याधिकारी करावा, असें येऊन सर्व प्रधान वश करून घेतले. आणि ठरविलें कीं, राजाराम साहेब लहान आहेत तों पर्यंत राज्यकारभार प्रधान लोकांनीं चालवावा.

[illegible] असे जनार्दनपंत रामत यास पन्हाळ्यावर होते, त्यांचे बंदोबस्तास लष्कर सध्दां पाठविले. [illegible] लतीचें पत्र पन्हाळ्यावर हिराजीफरजंद बंदोबस्तास पाठविलें. नें पत्र संभाजी [illegible]

संभाजी याम स होता लागून

त्या मसलतीची कृति आपोआप श्रुत झाली. तेव्हां त्याणीं त्या किल्ल्याची शिबंदी अनुकूळ करून त्याचे दोन मुख्य सरदार होते; ते ठार मारून टाकिले. समंतानीं किल्ला सभोवार उगीच घेरा घालून सुमारे दोन महिने तेथें होते. नंतर तेथून करवीरास गेले. इतक्यात राजारामास राय गडीं शके १६०२ सन १६८० जूनमहिन्यांत तक्ताधिपतिकरतात तों पेशवे व सचीव याउभयतांचें वैमनस्य आले, संभाजीमहाराजानीं समंताचे लश्करचे लोक वश करून व आणखी मावळे लोक बरोबर घेऊन रात्रीस कोलापुरास जाऊन जनार्दनपंत यास धरून पन्हाळा किल्ल्यावर नेऊन ठेविलें. हें वर्तमान हंबिरराव मोहिते सेनाधिपति यांस कळल्यावर ते व पेशवे मिळून संभाजीचे भेटीस गेले. रायगडीं शिबंदी त्यास अनुकूळ झाली. व दुसरे लश्करीराजे ही अनुकूळ झाले. नंतर संभाजी निघून रायगडावर गेले..

# भाग ३ रा
# संभाजीमहाराजांचाइतिहास

## संभाजीमहाराज रायगडीं पोंचताच आनाजीदत्तो सचीव यांचें पायांत बिडी घालून बंदींत ठेविले; व त्यांची-सारी दौलत घेतली. आणि राजाराममहाराज यांसही बंदींत घालून त्याची आई सोयराबाई यांस आपले समोर आणून विनाकारण दुर्भाषणें अमर्यादेचीं करून हिणें आपला नवरा मारला; सबब हिजडा हालहाल करून मारावें, अशी आज्ञा केली; तेणेंकरून ती शरमीच्या योगें च मरण पावली मग तिजकडील कितिएक सरदारांची डोकी मारिलीं व एक सरदारास कडेलोट केला. असा क्रूरपणाए काएकीं भगट केला. तेणेंकरून संभाजीमहाराजांस सर्व लोक नाखुषी होऊन हे अपशकूनी आहेत असें लोकम्हणूलागले.

नंतर शके १६०२ श्रावण शुद्ध ५ पंचमी सन १६८० इसवी या वर्षी महाराजास राज्याभिषेक झाला. तेव्हां त्यांणीं जंजिऱ्याचेसिद्दीसीं युद्ध केलें. आणि १६०३ शकांत पन्हाळ्यावर जाऊन राहिले, तेथें समजलें कीं, औरंगजेबाचा पुत्र महमद आकबर हे बंड करून पळून आले; ते

आपणास आश्रय मागण्यास आले आहेत यास्तव त्यां चे भेटीस आपला एक मानकरी पाठविला, व त्यांजलारा हण्यास एक जागा दिली. तो, आनाजीदत्तो, सचीव यांचे प क्षपाती मंडळीनीं त्या महमदाशीं राजाराम साहेब यांचे हि ताची, व संभाजीचे घाताची, अशी मसलत केली, हें वर्त मान संभाजीस कळलें. व ती खबर महमदा नें ही कळवि ली. मग संभाजीमहाराज समारंभानें त्या महमदाचे भे टीस गेले; नंतर आनाजीदत्तो व शिर्के कुळांतील मुख्य सांपडले ते, व बाळपरभूचिटणीस व त्याचे पुत्र व दुसरा एक त्याचा भाऊबंद, इतकी मंडळी हत्तीचे पायी बांधून ठा र मारिले; असें क्रूरकर्म केलें.

नंतर बहुतकरून वडिलाचे वेळचे अष्टप्रधान व सर दार यांचाही धिःकार करून मोरोपंतपिंगळे यांस बंदींत घे विलें. आणि मुख्यकारभारी एक कलुषा ब्राह्मण कनुजाजा तीचा होता, त्यास केले. त्या कलुषाचे स्वाधीनत्वें करून सर्व कामें चालूं लागल्या मुळें अन्याययुक्त गोष्टी घडूं लागल्या. त्या लिहिण्या जोग्या नाहींत.

औरंगजेबाचे मनांत बहुत दिवस विजापूरचें राज्य घ्यावें असें होतें: म्हणून त्या औरंगजेबानें आपला पुत्र अजिमशाहा याजबराबर सैन्य देऊन विजापुरावर पाठ

विले.त्याची आणि विजापूरकर यांची लढायी मार्गातहो ऊन त्या वेळेस विजापूरकर पराभव पावले. त्या लढायीं त त्या अजिमग्राहाची बायको आपले फोजेस हत्ती वर बसून धीर देत असे.ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे.

नंतर औरंगजेब लौकरच विजापुरास सैन्यासहि त येऊन त्या शहरास वेढा घातला. शोवर्टी शके १६०८ क्षयनाम संवत्सरे कार्तिकमासी (सन १६८०) या वर्षीवि जापूरकरांनीं किल्ला औरंगजेबाचे हवालीं केला. आणि विजापूरकरांचे कितिएक सरदार आपले चाकरीस ठेवू न ती राजधानी बुडविली.

मग संभाजीमहाराजा वे राजधानींतील मुलूख घे ण्याचें औरंगजेबानें मनांत आणून कितिएक सरदारफे जे सहित रवाना करून जागोजाग ठाणी वगैरे ते हस्तगत क रीत असतां एक वेळेस संभाजीमहाराज निर्भयपणें थोड केच लोकांनिशीं संगमेश्वरा जवळ शिकारीस जाऊन राहि लेहोते; हें वर्तमान मोंगलाचा एक मोठा सरदार तकरीबरो न यास कळतांच त्याणें आपला पुत्र इखलाजखान यांज बरोबर अत्यंत विश्वासू थोडकेसे स्वार देऊन अकस्मात पाठविले ते संगमेश्वरा जवळ पोंचले; तोंच ही बातमी जा सदानीं संभाजीमहाराजास कळविली; परंतु त्या बा मी

दारांस तुम्ही मुर्ख आहां; मुसलमान काय करणार आहे त; व अशी वडबड कराल तर तुमचीं नाकें कापीन, असें उन्मत्तपणानें गर्वोक्तीचें उत्तर केलें. इतक्यात इखलासखा न स्वारा सहित मोठ्या त्वरेनें संभाजीचे वाड्यांत जाऊन जे लोक सांपडले ते मारून टाकिले. मागाहून तकरीबखानही आला; त्या वेळेस संभाजीचा कारभारी कलुशा याजवळ कांहीं लोक होते, ते लढूं लागले. त्यांत कलुशास निराची- जखम लागली. इतक्यांत मोंगलाचे सरदारानें संभाजीम हाराजास ओळखून कलुशा कारभाऱ्यासहित धरून रखे रिज चोवीस असामी धरले; आणि औरंगजेब कोल्हापुर एथें होते, तेथें त्यांस खबर कळविली. त्यांची आज्ञा झाली, कीं, त्यांजला फार बंदोबस्ताने हुजूर आणावें; नंतर औरं- गजेब तेथून निघून अकलुजे करून तुळापुरी जाऊन राहि ले. तेथें तकरीबखानाने संभाजीस फार दुःख देतलें, ते व्हां बादशाहाची आज्ञा झाली कीं, एव्हां त्याजला कैदेंतच ठ सूंघावें, मग अन्याया प्रमाणें पारिपत्य करतां येईल. नंत र बादशा हाजवळ श्रेष्ट व चतुर लोक होते. त्यांणीं संभाजी ना जीव रक्षण करण्याची सल्ला दिली व त्यांत आपले हा संभाजीचे अवघड किल्ले येतील; असें ही जाहिर केलें सरकारचे मनास येऊन संभाजीस सांगून पाठविलें;

कीं तुम्हीं मुसलमान व्हाल तर जीव वाचेल; त्यांणी
तर समय नजाणतां उध्दटपणाचें पत्र पाठविलें कीं,
आपली कन्या बेगमसाहेब जर द्याल तर मी बादेन, व
से तुम्ही दुष्ट मुसलमान, तुमचे पैगंबरास धिःकार अ
सो; अशीं अनेक भाषणें करून मोंगलांसशिव्यादेऊंलाग
हें वर्तमान औरंगजेबास कळतांच फार राग येऊन
आज्ञा केली कीं, संभाजी लष्करचे बाजारांत नेऊन प्र
त्याचे डोळे लोखंडाचे डागणीनें भाजून नंतर जीभ क
पुन डोकें मारावें; त्या वरून आज्ञे प्रमाणें संभाजीमहा
ज व त्याचा वजीर कलुशायास फाल्गून वद्य अमवास्
शके १६१० सन १६८८ इसवी रोजी गार मारलें; या प्रमा
महाराजांचा वाईट परिणाम क्रूरपणानें व पापाचरण
नें आणि दुष्टसंगतीनें झाला; एणे करून तेवळेस सर्व हि
दूस शिवाजीराजाची आठवण होऊन फार दुःख झाले
या संभाजीमहाराजांची स्त्री एसूबाई, तिचा पुत्र
बाजी हा त्या वेळेस लहान ( सहा वर्षांचा होता, त्यांचा ज
सन १६८२ (शके १६०४) वैशाख शुध्द सप्तमी सेवा
गडावर एसूबाईचे विद्यमानें सरदारांनीं मसलत क
ली कीं, शिवाजी थोर होई पर्यंत राजाराम धणी क
मसलतीस जनार्दनपंत हणमंते, रामचंद्र आ

हुनकर महादजीनाईक पानसबळ. धनाजीजाधव, मल्हा
दनिराजी खंडोजीबल्लाळ चिटणीस संताजी घोरपडे, गं
डेराव दाभाडे. या आठअसामींत मल्हादनिराजीहे फा
र चतुर बुद्धिमान होते ते असेकीं, राज्यावर नानाप्रकार
चीं संकटें जरीं त्या वेळेस येतहोतीं; तरीं तेस्वस्थ चित्तेंक
रून नाहींशीं करीत, तीं अशीं कीं कोठींत धान्य नव्हतें, ल
श्करचा बंदोबस्त नव्हता, तशांत शाहूचें बाबल्य. इतक्या
अडचणी त्याणीं आपल्या कु शाग्रबुद्धिनें नाहींशा के
ल्यामल्हादनिराजीनें शिबंदी ठेऊन शिवाजीचे रीती प्रमाणें
बंदोबस्त केला. कोठींत धान्य भरून ठेविलें. आणि ठरवि
लें कीं, शाहूस बातमी नलागण्यासच महाराजानीं एकठि
काणींनराहतां रायगड पासून विशाळगड पर्यंत किल्ल्यांत
चालून पालून राहावें. मग विशाळगडास कुटुंबा सकट रा
जाराम साहेब गेले. एसूबाई व शिवाजी उभयतां रायगड
एथेंराहिलीं. त्याच शिवाजीस पुढें शाहू महाराज असें ना
व पडलें.

त्याचें कारण पुढले भागांत दर्शविलें आहे.

# भागचौथा.

## राजारामसाहेबमहाराजांचा इतिहास.

या महाराजांचे नावें राज्यकारभार चालून रीतिप्रमाणें प्रधानलोक कामें करीत होते. ते वेळेस सर्व सरदारांस साव धपणें राहण्याची आज्ञा झाली; पुढें कोकणपट्टी घ्यावयास औरंगजेबानें लश्कर पाठविलें. त्यास रायगडा वर एसूबा ई पुत्रासध्दां आहे; ही खबर लागतांच त्या लश्करानींकि ल्यास वेढा घालून तो किल्ला कांहीं दिवसांनीं हस्तगत के ला. आणि एसूबाई व शिवाजी सांपडले; त्या दोघांस औ रंगजेबाचे लश्करांत नेली. त्यांज वराबर एक शिवाजी महाराजांचा जुना सरदार होता, त्याचा सन्मान औरंगजे बानीं करून, शिवाजीवर भीति घेवून त्याचें नांव शाहू अ सें ठेविलेव एसूबाई यांचा मेह औरंगजेबाची कन्या बेगम साहेब यांचीं झाला.

मग मोंगलांनीं मिरज व पन्हाळा किल्ला घेतला, ते व्हां राजाराम महाराज यांणीं आपले बरोबर प्रल्हादनि राजी वगैरे विश्वासू एकवीस माणसें घेऊन वाण्याचे दे

पानें जींजीस जाण्याकरतां गुमरूपें निघाले, तथापि काहीं वर्तमान औरंगजेबास कळलें. तों राजाराम महाराज बंगलोर शहारा जवळ जाऊन उतरले; ही बातमीमों गलांचे सरदारास कळली, असें खंडोबल्लाळ चिटणीस यां णीं जाणून राजारामम्हाराजा बरोबर संताजी घोरपडे व धनाजीजाधव देऊन त्यास तेथून पळविलें, आणि आपण तेथेंच मंडळी सध्दां मुकाम करीत बसोन बोलण्याचा ए क विचार करतात; तों मोंगलाचे लोक येऊन मारहाण क रूंलागले; परंतु सर्वांचें एकचित्त या मुळें ठिकाण लागूदि लानाहीं; नंतर त्यास सोडिलें. मग ते सर्व लोक संकेता म माणें जिंजित एक ठिकाणीं जमले.

राजारामम्हाराजानीं जींजीस जाण्याचे पूर्वी प्रल्हाद निराजी यांचे मसलतीनें मोरोपंत पिंगळे याचा पुत्र नि ळो मोरेश्वर यास पेशवेपणाचा अधिकार देऊन रामचंद्रआ बाजी बहुतकर यांस सरमंतपणाचें काम सांगून विशाळग ड व रांगणा वगैरे किल्ले व मुलकाचें काम सांगितलें. शिदो जीगुजर व कान्होजी आंगरे यांस लढाऊगलबतांचें काम सांगितलें. महादजीनाईकपानसबळ यांस सेनापति केलें, तो लौकरच मरण पावला; नंतर तो अधिकार संताजी-घोरपडे यांस दिला.

राजाराममहाराज जिंजीस पोचल्या वर आपलेंम हत्व वाढावें म्हणोन आपल्या जवळ शिवाजी समाणेंअ ष्टप्रधान वगैरे कायम केले ते;-

| | |
|---|---|
| १ पंडावे पहिलेच; निळो मोरेश्वर होते. | ६ श्रीशंकराचार्य, पंडित राव केले. |
| २ जनार्दन पंत हणवंते यांस अमात्य पदवी दिली. | ७ सेनापति, पहिलेच. संताजी घोरपडे होते, त्यांस हिंदुरावममुलकत मदार असें जाव देवून नगारा वजरिपटका निशाण दिले. |
| ३ शंकराजी मल्हार यांस सचीव पदवी दिली. | ८ निराजी रावजी न्यायाधीश केले. |
| ४ रामचंद्र निंबक पुंडे यांस मंत्री पदवी दिली. | |
| ५ महादाजी गदाधर यांस सुमंत पदवी दिली. | |

| | |
|---|---|
| १ धनाजी जाधव सरदार-यांस जयसिंगराव किताब दिला. | १ प्रल्हादनिराजीयास, सर्वप्रधानांत श्रेष्ठ, असेंजवें पतिनिधीपद दिले. |

या प्रमाणें व्यवस्था करून संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांस फौजेसह्यां मोंगलाचा मुलूख लुटण्यास पाठविलें. आणि गुप्तपणें मराठेमानकरीलोक आपले मुलखी होते, त्यास पोषाख वगैरे जाहगिर व इनामाच्या सनदा पाठवून आपण तक्ताधिपति झाल्याचें वर्तमान कळ विलें, त्या योगें ते मानकरीलोक खूष होऊन आपले वकील जिंजीस पाठवूं लागले.

हें वर्तमान औरंगजेबास कळलें, नंतर जिंजीग्रह र घेण्यास जुलफिकारखान सरदार पाठविला; परंतु-ती मसलत शेवटास गेली नाहीं. मग तो सरदार दक्षिण देशांत स्वाऱ्या करून खंडणी घेऊं लागला.

इकडे रामचंद्रपंत बहुतकर यांणीं किल्ले व मुलका-चा व शिबंदीचा बंदोबस्त चांगला केला. मोंगलाच्या तो-ड्या बहुत खराब केल्या; मग त्यांस संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे येऊन मिळाले. नंतर तिघांनीं मोंग लाचे मुलकांत चौथाई व सरदेशमुखीचा हिसा घ्याव यास आपले कडील लोक पाठविले. त्याणीं आज्ञेप्रमाणें हक्क घेऊन शिवाय घास दाण्याचा हक्क घेऊं लागले. त्या लोकांत पवार व आठवले व थोरात हे तीन सरदार मुख्य होते. त्याजवर राजाराममहाराज खूष होऊन त्यांस बक्षिसपा-

ठविले. आणि पवारास विश्वासराव, व थोरातास दिनक रराव व आठवल्यास समशेरबाहदर असे किताब दिले.

रामचंद्रपंत बहुतकर याणीं आपले लष्करांत धन गरलोक वादवून त्याचा कारकून शंकराजीनारायण मो ग शाहणा होता, त्याणें मोंगला पासून राजगड घेतलाह्म णून त्यांस सवाईची मामलत सांगितली; हें वर्तमान राजा रामसाहेब यांस कळल्या वर खूष झाले; आणि शंकराजी नारायण यांस "मदारुलमोहम" असा किताब व वस्त्रें पाठविलीं; व परशुरामत्रिंबक कुळकर्णी किल्हईकरयां णीं पन्हाळा किल्ला घेतला, संताजीनीं मिरज घेतली; त्या स मिरजेची देशमुखी दिली. मग संताजी व धनाजी यां णीं फौज जमाकरून गोदातिरचे मोंगलाचे मुलखास उ पद्रव करण्यास गेले. त्यांणीं मोंगलाचा तीनवेळां पराभ व करून त्यांचे मोठे सरदार धरिले.

नंतर औरंगजेबानें जींजीवर दुसरा सरदार, आप ला पुत्र "कामबक्ष" योजून त्याजबरोबर असदखान व जीर फौज सक्त देऊन शके १६१५ सन १६९३ इसवी या वर्षी पाठविला, मग पूर्वी आलेला जुल्फिकारखान उदास होऊन गुप्तपणें राजाराममहाराजांस वशाझा ला. मुद्दें रामचंद्रपंतानीं फौज घेऊन सोलापूर पर्यंत मु

लुख लुटींत गेले नंतर दोन वर्षें काही एक गडबडीचें वर्तमान झालें नाहीं.

नंतर संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे उभयतां कर्नाटकांत जाऊन त्यांणीं मोंगलाशीं युध्द करून मोठा जय मिळविला, पुढें मोंगलाचे सरदारानीं जमाव करून जिंजी शहर घेऊन तेथून राजाराम महाराजांस काढून दिलें, इलक्याच प्रल्हादनिराजी प्रतिनिधी वारले. व संताजी घोरपडे व धनाजी जाधव याउभयतांचे परस्परें विरुध्द आलें.

मग राजाराम महाराज साताऱ्यास येऊन रामचंद्रपंताचे मसलतीनें सातारची राजधानी चालू केली, त्या संधींत जनार्दनपंत हणवंते अमात्य मृत्यू पावले. म्हणून न पुन्हा अष्टप्रधानांत फेरफार केला.

१. प्रतिनिधि मृत्यु पावले; म्हणून त्या पदवीचा अधिकार तिमाजी जनार्दन हणवंते यांस त्यांचे बापाचे-अगत्यास्तव दिला.

२. अमात्य मृत्यू पावले; म्हणून त्या पदवीचा अधिकार रामचंद्र आबाजी बहुतकर यांस दिला.

३. सचीव शंकराजीमल्हार होते; ते जींजीस वेढा-पडल्यावर आपला अधिकार टाकून काशीस गेले; स

बद्दल ती पदवी शंकराजी नारायण यांणीं पूर्वी पराक्रम करून राजगड वगैरे मुलूख घेतलाहोता; त्यास दिली.

या प्रमाणें फेरफार केला; मग संभाजी घोरपडेमें गलाचे मुलखास उपद्रव करित असतां त्यास मोंगलाचे लोक धरण्याचा यत्न करीत होते; परंतु सांपडले नाहींत. मग फार दिवसांनीं घोरपडे पळतांना असावधपणानें स्नानास उतरल्या जागीं त्याचा देवशिजी गोजिमानपा म्हस्सवडकर याणें पाउलाग करून घोरपडेस धरून डोकें मारले, नंतर सेनापतिचा अधिकार धनाजीजाधवराव यास दिला.

नंतर राजाराम महाराजानीं मोठें लश्कर जमाकरून खानदेशांत व वराडदेशांत जाऊन खंडणी घेतली. ह्मां औरंगजेबानें राजाराम महाराजांचे पाठीस जुलफिकारखान लावून आपण स्वतःस्वारी करून सातारा घेतला; इतक्यांत राजाराम महाराजांस पळण्याचा श्रम होऊन; सिंहगडावर दुःख श्रमानें पडलेहोते; तेथेंच शके १६२१ फालगून वद्य नवमी; सन १६९९ इसवी या वर्षी कैलासवासी झाले;

"त्यांचें वृंदावन हल्लीं त्या किल्ल्यावर असून त्यां

पूजा वगैरे खर्चास मौजे अमेपुरी हा गांव चालत आहे. म
रणकाळीं त्यांचें वय ४३ वर्षांचें होतें.

या राजाराम महाराजांस दोन स्त्रिया होत्या. पहि
ली, ताराबाई; मोहित्यांची कन्या. तिचा पुत्र शिवाजी; दु
सरी, राजसबाई, कागलकर घाटगे यांची कन्या. तिचा
पुत्र, संभाजी.

राजाराम महाराजांचे अंतकाळीं शिवाजीचें वय द
शवर्षांचें, व संभाजीचें तीनवर्षांचें होतें; यामुळें राज्यका
रभार अकरा वर्षे केला.

# भागपांचवा.

## कारकीर्द ताराबाईसाहेब यांची.

ताराबाई महाराज ही आपले भतार कैलासवास झाल्यावर राज्यकारभार चालवूं लागली. ती एकचं किल्ल्यावर हमेषा राहातनसे;

तिणें निमाजी जनार्दन हणवतें प्रतिनिधी पदावर होते तेस्या पदास गैरलायक, असें ठरवून, ती पदवी परशुरामभिंबक किन्हईकर यांणीं पूर्वी पन्हाळा किल्ला घेऊन पराक्रम केलाहोता; व ते चतुर, असें जाणून त्या जला दिली

धनाजी जाधव सेनापति यांणीं एक दिकाणीं नरा हतां चहूंकडे स्वाऱ्यास पाठवून जागोजागी चौथाई व रदबदामुखी व घांसदाणा यांचे निमित्यानें खंडण्या घेतल्या मुळें औरंगजेब पातशाहा यांज कडे दक्षिण देशाचा मुलुख होता; त्याचा वसूल कमी येऊं लागला; आणि चिंची कमताई होऊन दिल्लीहून आपले खासगी द्रव्य खर्चास आणिलें; तेंही मराठेसरदारानीं छापा घालून घेतलें.

पुढें औरंगजेब यांचा वृध्दाप काळ होऊन राज्याचे उपयोगी नाहींसा झाला, व त्याचा पुत्र कामबक्ष तोहीउपयोगी नव्हता. या मुळें त्याचे सरदार फार उदास होऊनस्वामीचें कामांत मन पुरविलें नाहीं; सबब त्या बादशाहाचें बळ कमी पडलें.

इतक्यांत मराठे सरदारानीं देशांत बहुत उपद्रव करून रामचंद्र पंत अमात्य यांणीं पन्हाळा व पावनगड घेतला; व परशुरामत्रिंबक प्रतिनिधी यांणीं वसंतगड वसंतारा किल्ला घेतला.

तेव्हां ताराबाईसाहेब यांणीं आपल्यास राहण्याची जागा पन्हाळा किल्ल्या वर करून तेथें राहिली. व रामचंद्रपंत फार लोभांत वागूं लागले.

या पुढें सिंव्हगड व रायगड वगैरे कितिएक किल्ले-पुन्हां मोंगलानीं घेतलेले आणखी त्याज पासून मराठे सरदारांनीं परत घेतले.

मग औरंगजेब अगदीं थकून अहमदनगर एथें शके १६२९ सन १७०७ इसवी या वर्षी परत येऊन डेरे देऊन राहिले, आणि आपले सरदारास सांगितलें, कीं एथें माझा मृत्यू आहे; नंतर त्याच वर्षी माघमासी तेथेंच मृत्युपावले. औरंगजेब मोठे चतुर असून अर्थसं-

पादनावर दक्षता फार होती. शाहाणा आणि अंमल
वाकब राज्यकारभारांत कुशल आणि उदासपणेंव
गत होते त्यांची संपत्ति उत्कृष्टच होती या मुळें त्यांस
र्व लोक त्याचे अंतपर्यंत फार मान्य करीत होते.

औरंगजेब मरणा पूर्वी संभाजीमहाराजांचीस्त्री
व पुत्र रायगडाहून धरून नेली होती, त्यास दिल्ली
आपले कुटुंबाचे माणसांत नेऊन ठेविलीं होतीं. आणि
खा पुत्राचें नांव शिवाजी असून औरंगजेब त्यांसही
साव आहे असें थेटपणें म्हणून शाहू असे नावानें हाक मा
रीत असे पुढें तेंच नाव प्रसिद्ध झालें. त्या शाहूमहाराजा
चीं दोन लग्नें औरंगजेबानें केली. एक शिंदेकरच्या
स्तुमराव जाधव यांचे कन्येशीं तिचें नांव अंबिकाबाई होतें
दुसर कऱ्हाडचे शिंदेपाटलाचे कन्येशीं तिचें नाव सा
वित्री बाई होतें. त्या जाधवरावास व शिंद्यास शाहू
महाराजांचे आप्तपणा मुळें मोठा सन्मान करून यो
ग्यतेस चढविले, आणि शाहूमहाराजास अक
कोट, इंदापूर, नेवासे व सुपें या परगणेयाची जहा
र करून दिली. व आपले कंबरेची तरवार व आ
खीं दोन तरवारी दिल्या, त्यांत एक भवानी नावा
शिवाजीमहाराजांजवळ होती. ती व दुसरी आण

खानाचे हातची शिवाजीनें घेतल्नाही ती अशा ती न नरवारी दिल्या त्या हल्लीं सानाऱ्यास आहेत व अ फसलखानास मारलेली वाघनखें ही आहेत.

औरंगजेब मरण पावल्यावर त्याचा पुत्र अजिमशाह याणें आपला भाऊ सलतान माजूम याज बरोबर युध्द करण्यास जातांना आपले बरोबर शाहूमहाराजास नेले. व देशांत लश्कर होतें तो राह सोडला.

मोंगलाचें लश्कर देशांतून गेलें ही गोष्ट मराठे सरदारांस हिनकारक होऊन धनाजी जाधव यांणीं पुणण्याचे फौजदारा पासून चाकण किल्ला घेतला व मराठेइतर सरदार मोंगलाचे मुलखांत उपद्रव करीतच होते नंतर अजिमशाह याणें जुलफिकारखान यांचे मसलतीनें आपले मुलखांतील मराठ्यांचा उपद्रव नहो ण्यास्तव शाहूमहाराजांची आई व स्त्रिया जामीन की स देवून शाहूस देशास जाण्यास हुकूम दिला व शाहू स सांगितलें कीं तुम्ही आम्हाशीं नीट वागाल तर आ-णखीं भिमा व गोदा यांचे मध्यंतरी जितका मुलूख-आहे तितका व तुमचे वडिलांनीं विजापूरचा मुलूख घेतला आहे त्यापैकीं काही देईन, असा लेख ठरविला.

मग शाहूमहाराजांनीं वराडखानदेशामधीदोन

सरदार आपले राज्यांतील होते त्यांस सांगून पाठविलें
कीं आह्मीं देशीं येतों; तुह्मी अनुकूळ असावें; नंतर ते सरदा
र शाहूमहाराजास भेटून अनुकूळ झाले; व दुसरे, हैबतरा
व निंबाळकर व नेमाजी शिंदे वगैरे किंतिएक सरदार अ
नुसरले. आणि शाहूमहाराजांनी ताराबाईस पत्र लिहि
ले कीं मी आपल्या जागीं येतों, माझें पद मला द्यावें.

तेव्हां ती गोष्ट ताराबाईच्चे मनांत नसून त्यांणीं आ
पले अष्टप्रधान जमवून त्याजपासून "तुमचे पुत्रास आह्मी
अनुकूळ असूं अशी शाफथ घेतली; आणि ताराबाई बोलूं
लागली कीं तो शाहू खरा नाहीं तोतया आहे.

हें वर्तमान शाहूमहाराजांस कळून त्यांचे मनांत आ
लें कीं अगोदर आपण गोदातिरीं राहून खरा शाहू अशी
लोकांस प्रसिध्दी होऊं द्यावी. परंतु इतक्यांत युध्दकरण्या-
जोगी पंधराहजार फौज आपल्या जवळ जमली सबब
तेथून युध्द करण्या करतां दक्षिण देशांत येऊं लागले; तों
शिवणेंपरगणेयांत पारदगांवीं, तेथले गांवकरी यांणीं शा
हूमहाराजाचे लष्करावर तोफांचे बार केले, तो गांव ता
राबाईकडे होता, तें युध्द चाललें असतां त्या दंग्या मध्यें
त्या गांवांतील कोणीएक स्त्रीनें आपला मुलगा कडेवर
घेऊन शाहूमहाराजा कडे येऊन बोलली कीं हा माझा मू

ल आपल्या सेवेशी अर्पण केला आहे, तो मुलगा शा
हूमहाराजांनी घेतला, इतक्यांत लढायींत जय मा
झाला म्हणून त्या मुलाचें नांव फत्तेसिंग ठेविलें. भा
णि उपनाव भोसले असें ठेविलें. आणि आपल्यास पा
दशाहानीं ज गाव जाहागिर दिले होते, त्या पैकीं अक्क
कोट परगणेयाची जाहागिर लावून दिली व राजे भोसले
असें पद दिलें.

ते फत्तेसिंग राजे अक्कलकोट कराचे मूळपुरु षा
चे वंशज शाहाजीराजे भोसले अक्कलकोट कर कायम
हल्लीं असोन त्यांजकडे ती जाहागिर चालत आहे. त्यां
स एक पुत्र आहे त्याचें नांव बाबासाहेब त्याचे उत्तमगु
ण पाहून त्यांज वर सर्व दौलतीचा कारभार शाहाजी रा
जे यांणी सोपून दिला आहे.

पुढे शाहू महाराजाचे लश्करांची आणि ताराबा ई
चे लश्कराची गांठ पडून धनाजीजा धवरावाचें ही बोल-
णें झालें. मग पुण्याचे उत्तरे कडे पंधरा कोशावर शा
हू महाराजांचे आणि ताराबाईचे फौजेची लढायी झा-
ली; त्यांत ताराबाईचे फौजेचे अधिकारी परशुरामत्रि
बक प्रतिनिधी होते; त्याणीं धनाजीजा धव शाहू महा रा
जास मिळालेले पाहून आपण काहीं लोक घेऊनसाता

न्यास आले. मग शाहूमहाराजांनीं धनाजी घेऊन चंदन वंदन किल्ले घेतले; तेथें नाराबाईचे सरदारांचीं मुलें माणसें सांपडलीं तीं बदींत ठेऊन सातारा किल्ला ही घेतला. हें वर्तमान शके १६३० सन १७०८ या वर्षी झालें: यांची कारकीर्द आठ वर्षे जागली.

# भागसहावा.

## कारकीर्द शाहू महाराजांची

शाहूमहाराज सातान्यास येऊन पोंचल्यावरत्या नें आपली गादी कायम करून अष्टप्रधान केले ते- प्रतिनिधि परशुराम त्रिंबक ताराबाई कडे अनुकू ल झाले, म्हणून त्यास कैद करून गदाधरमल्हाद या स ती पदवी दिली. व बहिरोपंत पिंगळे यांस मुख्य प्रधान केलें.

सेनापति. धनाजी जाधव कायम करून त्याजला मोंगलांतील वसूल करण्याचें काम सांगितलें त्या कामा वर सेनापति याणीं आपले तर्फे दोन कारकून नेमिले त्यांत आबाजी पुरंदरे सासवड एथील कुळकर्णी; व बाळाजी विश्वनाथ ( चौल मोंतीं श्रीवर्धन गांव आहे ते थील भट ) असे दोघे होते.

इतक्यांत औरंगजेबाचे पुत्र सलतान माजूम व अजिमशाहा हे दोघे लढायी करूंलागले त्या लढा यींत सलतानमाजूम फत्ते होऊन अजिमशाहावत्या चे दोन पुत्र व कितीएक सरदार मरण पावले तिसरा

बंधू कामबक्ष हा औरंगजेबाचे पश्चात आपणास बादशा
हा म्हणवूं लागला. त्यास मराठेलोक ही अनुकूळ होते, प
रंतु त्यांची वृत्ति ठीक नव्हती, या मुळें मराठे लोकांनीं त्या
चा पक्ष सोडून दिला. सुलतान माजूम याणें दक्षिण दे
श जिंकावयास निघते वेळेस कामबक्ष यास हैदराबा
द व विजापूर या दोन संस्थानची बादशाही देत असता
त्याणें ऐकलें नाहीं. सबब त्यांजवर आपला सरदार जु
लफिकारखान नेमून त्याणें हैदराबादे जवळ कामबक्ष
याशीं मोठी लढाई केली, त्यांत कामबक्ष मारला गेला.

मग त्या जुलफिकारखान यास सुलतानमाजूम
यांणीं "मिरउलउमराव" असा किताब देऊन दक्षिण दे
शाचा अधिकार दिला. तो जुलफिकारखान हैदराबाद
चे लढायीस गेला, त्या वेळेस त्याचे कुमकेस शाहू रा
जानीं आपली फौज पाठविली, या मुळें तो सरदार शा
हूमहाराजांचें कल्याण चिंतित असे. त्यांणीं बादशाहा
स समजाविलें कीं, शाहूमहाराजास आपण अनुकूल
व्हाल तर आपलें हितच घडेल; त्या वरून सुलतानमा
जूमपादशाहा हे दक्षिणची सरदेशमुखीची सन द
शाहूमहाराजास देण्यास सिध्द झाले.

इतक्यांत ताराबाईचे वकिलानीं जाहिर केलें कीं

ताराबाईचा पुत्र मुख्य धणी यांस बादशाहानीं ताराबाई चे मुलाचे नांवें सनद तयार मात्र केली, परंतु नेमठ र विला कीं, तूर्त सनद तहकूब ठेवावी. ताराबाईची आणि शाहूची लढायी होऊन जोमुख्य ठरेल त्यास सनद देऊं असें उरविलें.

मग त्याच वर्षी शाहूमहाराजांनीं ताराबाईशीं ल ढाई करण्यास्तव पर्जन्यकाळीं लश्कर जमा करून ठे विलें होते, मग दसरा झाल्या वर तयारी करून प्रथम प न्हाला व विशाळगड हे दोन किल्ले घेतले, तेव्हां ताराबा ई रांगणा किल्ल्या वर होती, तेथून पळून मालवणास गेली, आणि शाहूमहाराज कोल्हापुरास गेले.

इतक्यांत सुलतानमाजूम माघारी हिंदुस्थानांत गेले, त्याज बरोबर जुल्फिकारखान सरदारही गेले त्याणें आपले अधिकारा वर दाऊदखान पन्ही हा सरदा र कायम करून त्याजला दक्षिणेचा अधिकार देऊन खेरिज बऱ्हाणपुरचा हि दिला. आणि शाहूराजाचे स रदारास सांगितलें कीं तुह्मास प्रतिवर्षी वसूला पैकी चौथाई दाऊदखान देत जाईल.

हें वर्तमान शाहूमहाराजांस समजून कोल्हापुरा हून सातान्यास आले, आणि दोन लग्ने केलीं, एक

कुवरजीशिर्के यांचे बहिणीशीं, तिचें नांव सकवा
बाई होते; यांस पुत्र संतान नाहीं व ती आपले भ
तारा बरोबर सति गेली. दुसरे, सोनोजि मोहिते
यांचे कन्येशीं, तिचें नांव सगुणाबाई तीस एक व
र्ष होता तो एकवर्षाचा असतांच मृत्यू पावला.

मग धनाजीजाधवसेनापति आजारी होऊ
न वारणेचे कार्डीं मृत्यू पावले, ह्मणून ते पदत्याग
चिरंजीव चंद्रसेनराव यांस दिलें, परंतु अधिका
बाळाजीविश्वनाथ संभाळूंलागले, सबब त्यांचा द्वे
ष चंद्रसेनराव जाधव करूंलागले.

शाहूमहाराज सातान्यास आल्यावर ताराबा
ईसाहेब मालवणाहून पन्हाळ्यास आली, तेव्हां
तो किल्ला तेथील हवालदारानें त्यांच्या हवालीं केल
आणि कोलापूर आपलें संस्थान करून तेथें रा
लीं आणि आपले धाकटे चिरंजीव संभाजी यां
त्या संस्थानचे धणी केलें.

त्या समयीं रामचंद्रपंत अमात्य व शंकराज
नारायण सचीव हे दोघे त्यांच्या पक्षाचे होते, मग
महाराजांनीं सचिवाचे ताब्यांतील राय[redacted]गड किल्ला घे
ला नंतर सचिवानी पर्वी[redacted]तीह्मणून

बवडे मुकामी सन्यास घेऊन जलसमाधी घेतली.

नंतर त्या सचिवाचा पुत्र दोन वर्षांचा होता; त्या जवर शाहू महाराजांनीं कृपाळू होऊन त्या मुलास सचीव पदाचीं वस्त्रें देऊन त्याचें काम त्यांचे कारभाऱ्या चे हातून घेऊंलागले. त्या सचिवाचें नांव नारो शंकर होतें.

नंतर आपले प्रतिनिधी पूर्वीचे परशुरामपंत ह्यांस शाहू महाराजांनीं कैदेतून सोडून नवे प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद यांस दूर करून त्या जागीं नेमिलें असतां परशुराम त्रिंबक यांणीं आपले पुत्र यांजिले यांणीं आपला सारा मुलुख हाती लागतां च विशाळगडा कडील ताराबाईचा पक्ष स्विकारला ते व्हां ताराबाईनें त्यास कोलापूरचे प्रतिनिधी केले, अ सें होतांच शाहूमहाराजांस संशय येऊन पुन्हा पर शुराम त्रिंबक यांस कैद केलें.

नंतर बैबतराव निंबाळकर सरलष्कर व बालाजि विश्वनाथ यांणीं मोंगलाचे लष्करासीं पुरंदराजवळ युद्ध करून जय मिळावला.

या पुढें शाहुमहाराजांनीं फौजेच्या दोन टोळ्या करून त्यांत एक टोळी वर बहिरोपंत पिंगले पे

शावे नेमून कोकण पटींत जाऊन कल्याण परगणा रक्षावयास सांगितलें, व दुसरे टोळी वर बाळाजीविश्वनाथ यास मुख्य करून शंभूमहादेवाचे डोंगराकडे कृष्णराव खटावकर बंडाळा करून उपद्रव देत होता त्याचें पारिपत्य करावयास सांगितलें; त्याप्रमाणें त्याणें खटावकराचा पराभव करून आपण जय पावला, त्या लढाईंत परशुरामत्रिंबक मंत्रिनिधि याचे तिसरे पुत्र श्रीनिवासपरशुराम (श्रीपतराव) होते, त्यास तीर्थरूपानीकैदेतून सोडून पाठविलेकी तुमचे वडील भावानी दंगा करून ताराबाईचा पक्ष स्वीकारल्या मुळें हा आह्मा वर प्रसंग गुदरला आहे त्यास यावेळेस जर तूं शौर्य करशील, तर माझी सुटका होईल त्या वरून श्रीपतराव यांणी मनापासून झटून शौर्य केलें, म्हणून शाहूमहाराज खूष होऊन परशुरामत्रिंबक यांस कैदेतून मुक्त केलें व त्याची पदवी त्यास दिली.

बहिरोपंत पिंगळे पेशवे हे आंग्रे यावर गेले होते; त्यांची लढायी कोकणांत झाली; त्या युध्दांत बहिरोपंत शूर असतां दैव वशें करून आंगरे यास जय मिळून पिंगळे यास कैदेंत ठेविलें; आणि-

सातारा घेण्यास आंगरे जाणार अशी बातमी उठली हें वर्तमान शाहूमहाराजास कळून त्यांणीं सर्व लोक साताऱ्या जवळ जमा करून त्यांत मुख्यत्व बाळाजी विश्वनाथ यास दिलें त्यांणीं आंगरे याशीं तह करून न पिंगळे यांस सोडवून घेतलें आणि किल्ले घेतले-होते ते माघारे घेऊन आंगरे यांणीं आपले सरकारचे पक्षानें वागावें असें कबूल करून घेतलें असें केल्यावर त्याचें चातुर्य व शौर्य शाहूमहाराजांनीं जाणून शके १६३० सन १७०८ इसवी या वर्षी बाळाजी विश्वनाथ साताऱ्यास येतांच त्याजला पेशवे पदवी देऊन त्याजकडे हुजूरांतून आबाजीपुरंदरे मुतालिक व रामचंद्रपंत भानू फडणीस नेमून दिले.

नंतर पिंगळे आपले घरी बसून त्याजकडे सरसुभा रें दहाहजार पर्यंत सरंजाम व प्रतापगडचे देवीचें संस्थानचें काम मात्र चालत होतें.

बाळाजी विश्वनाथ यांस पेशवे पद मिळाल्यामु ळें चंद्रसेन जाधवानीं शाहूमहाराजाचा पक्ष सोडला, त्याची पदवी मानसिंग मोरे यांस दिली. परंतु तो विशेष शूर नव्हता; त्या वेळेस हैबतराव निंबाळकर सरलष्कर यांस ती पदवी न दिल्या मुळें ते कलह क

रून गोदातिरीं जाऊन राहिले; आणि मोंगलाची सरदारी पतकरली.

पुणेंपरगणेयांत मोंगलाचा अधिकारी बाजी मोहिता होता, त्यास बाळाजीविश्वनाथ यांणीं हा तारवालीं घेऊन तो परगणा आपल्या हस्तगतकेला. आणि उत्तमप्रकारें मजेचें पालिग्रहण करूं लागले. त्या दिवसां पासून बाळाजीविश्वनाथ पेशवे यांचें बळ वृध्दिस पावलें.

शके १६३० सन १७०८ इसवी या वर्षी शाहूमहाराज गादीवर बसून प्रतिनिधि व अष्टप्रधान कायम केलेते,—

१ प्रतिनिधि परशुरामत्रिंबक पहिलेच होते.

## अष्टप्रधान.

१ मुख्यप्रधान बाळाजीविश्वनाथ पहिलेच होते.
२ अमात्य अंबराव बापुराव हणवंते कायम केले.
३ सचीव नारोशंकर होतेच. (त्याचे वंशज अकडे ही सचिवपणा कायम असून भोर एथें आहे.)
४ मंत्री, नारोराम शेणवी जाधवसेनापति याजवळ कारकून होते; त्यांस कायम केलें, त्याचा वंश इसलामपूर एथें आहे.

५ सेनापति मानसिंग मोरे पहिलेच होते; पुढें कां
ही दिवसानीं खंडेराव दाभाडे केले.
६ कमंत आनंदराव कायम केले.
७ न्यायाधिश होनाजी अनंत कायम केले.
८ पंडितराव मुद्गलभट उपाध्ये.

---

१ परसोजी भोसले मृत्यु पावले होते; म्हणून त्यां
चा मुलगा त्यांचा पुत्र कान्होजी भोसले यां
स दैऊन सेनासाहेबसभा ही पदवी दिली.
१ दावलसिंग सोमवंशी यांस त्यांची सरलश्क
री दिली.

---

या प्रमाणें करून या मंडळी वर राज्यकारभा
र सोपून शाहूमहाराज आपण स्वस्थ अंतकरणें
करून राहिले. आणि दानधर्म ईश्वराचें पूजनभी
नियुक्त करून ब्राह्मणाचें व प्रजेचें पाळण करूं
लागले आणि मोंगललोक शाहूमहाराजास-
फार मानूं लागले; त्या योगें फार कीर्ती झाली.
पुढें शाहूमहाराजाशीं सयदहुसेन याणें तह
करून फरुकशाहरास दिल्लीहून पदच्युत करून ते

थील बादशाहा सलतानमाजूम यांचा महमदशा-
हा यास स्थापन केलें. आणि सयदहुसेन कारभा
र करूंलागले; त्या पूर्वीच शाहूमहाराजानीं त्याणें
तह केलाहोता कीं सहास्कमे दक्षिणेची चौथाई, व
सरदेशमुखी व हैदराबाद व विजापूर व म्हैसूर
व कर्नाटक व त्रिचिनापल्ली व तंजावर हा मुलूख व
खानदेश खेरिज करून दक्षण, शिवाजीराजानें घेत
लेला मुलुख याची सनद आम्हास द्यावी. व गोंड व
ण व वऱ्हाड यांतील मुलुख कान्होजी भोसल्यानीं घे
तलेला तोही मागितला; आणि आपली आई व बाय
को दिल्लित होती, त्यांस लौकर पोचतें करावें. असें
सांगितलें. आणि इतकें दिल्यावर वर्षासि दहाला-
खरुपये खंडणी, सरदेशमुखी उत्पन्नाची नजर, व चौ
थाई बद्दल पंधराहजार फौज निशी, चाकरी करूं असें
ठरविलें, तें शाहूमहाराजाचें सर्व बोलणें सयदहुसेन
यानें बहुत करून मान्य केलेहोते, त्याजबद्दल दिल्लीत
बाळाजीविश्वनाथ पेशवे फौजसुध्दां होते; मग महम
दशाहा बादशाहा झाल्या वर पेशव्यानीं त्याची आ-
ज्ञा घेऊन फौजेचा खर्च सयदयाजपासून घेऊन
व शाहूमहाराजाची खाशीं माणसें होतीं तीं घेतली.

व सदरीं लिहिले तहा प्रमाणें चौथाई व सरदेशमु खी व स्वराज्याच्या सनदा घेऊन सातान्यास आ णूनदिल्या. आणि स्वराज्यांतील वसूल जमाक रा वयास लागले.

नंतर कांहीं दिवसानीं परशुराम त्रिंबक व बा ळाजीविश्वनाथ व खंडेराव दाभाडे हे तिघे मृत्युपा वले. नंतर दरबारात थोडीशी व्यवस्था कमी झाली मग बाळाजिविश्वनाथ यांचा अधिकार त्यांचे वडी लपुत्र बाजिराव बल्लाळ यांस दिला व मतिनिधीप द त्यांचे तिसरे पुत्र श्रीनिवास परशुराम प्रधान राव यास दिले व त्रिंबक राव दाभाडे यांस से नापति कायम केलें.

खंडेराव दाभाडे यांचे हातारवाली दमाजीगा य कवाड होते त्यांणीं शौर्य केले असे दाभाडयांनी- मरणा पूर्वी सरकारास सांगितलेंहोतें त्यासुबेंत्या दमाजीस समशेरबहादर किताब दिला ते दमाजी बडोदेकर गायकवाड यांचे मुळपुरुष त्यांचे वंशा कडे हल्लीं बडोदे संस्थान चालत आहे ते दमाजी मेल्या वर त्यांचे पुतणे पिलाजी गायकवाड यांस त्या पदवी वर कायम केलें.

शके १५६८ सन १६४६ चे सुमारें ब्रह्मणपूरचे सुभेदार व मोंगलाचे मोठे सरदार यांशीं बाजिराव पेशवे यांणीं लढायी करून त्याचा पराभव केला. त्यांत मल्हारजी होळकर निरानदीचे काठचा होळगांवचा चौगुला व कण्हेरखेडचा राणोजी शिंदा हे दोघे बाजीरावा जवळ चाकर होते-त्यांणीं फार शौर्य केलें. व त्यांची चांगली चालपाहून त्या दोघांस उत्तरोत्तर पदवीस चढवून मोठ्या सरदाऱ्या दिल्या. त्या प्रमाणें शिंदे यांचे वंशाकडे ग्वालेरसंस्थान व होळकर यांचे वंशाकडे इंदुरसंस्थान हल्लीं चालत आहे.

मग बाजीरावपेशवे यांणीं माळवाप्रांतांत दोन स्वाऱ्या घालून बहुतद्रव्य आणलें. व आणखीही बहुत पराक्रम केले.

पुढें श्रीपतराव प्रतिनिधी शाहूमहाराजा जवळ हजर [illegible] चालूं फारच झाला. व प्रतिनिधीचें चातुर्य आणि उत्तम धार्मिक वगैरे स्वभाव चांगले होते त्यायोगानें शाहूमहाराजजेंकाम आपण करावयाचें ते देखील प्रतिनिधीचे हातून करवूं लागले. नंतर प्रतिनिधी

नीं कोलापुरास जाऊन संभाजीचे लश्करगर्दी युद्ध करून संभाजीस पन्हाळ्या कडे पिटून लाविलें व ताराबाई व निचीं सून धरून सातारा किल्ल्या वरचे विलीं. व आणखीही कित्येक पराक्रम केले.

पुढें कान्होजीभोसले यांणीं सरकारची अवज्ञा केली. म्हणून त्याची सेनासाहेब सुभा ही पदवी काढून त्याचा भाऊ रघुजीभोसले यांस तीपदवी दिली

यानंतर बाजीरावपेशवे यांणीं बहुत पराक्रम करून त्रिंबकराव दाभाडे हे निजामउल्मुल्लुखास मिळून मराठीराज्याचे दोन भाग करावयास इछितात असें समजल्या वरत्यांशीं बाजिरावयांणीं मोठी लढायी करून दाभाडे यांस ठारमारिलें. वया लढायींचे पूर्वी मोठा पराक्रम करून दिल्लिच्यादर वाज्या पर्यंत प्रवेश केलाहोता. व यापूर्वी हिंदुस्थानांत मोठमाठ्या स्वाऱ्या केल्या.

नंतर पेशवे यांस शके १६६२ सन १७४०इ सवीचे चैत्रमासीं नर्मदेचे काठीं देवाज्ञा झाली पुढें त्यांची जागा त्यांचे वडिलपुत्र बाळाजीबाजिराव यांस त्याच वर्षी दिली.

त्या बाजिराव पेशव्या वर शाहू महाराजांचा लो
भ होऊन त्यास, पोर्तुगीज लोकांचा मुलुख घेत ला
होता; त्याची सनद दिली. व गुजराथ खेरिज क रू
न नर्मदेच्या उत्तरेचे मुलुखाची खंडणी घ्यावया
स सांगितली: त्या वरून पेशवे यांचें बळ वृद्धिसपा
वलें.

पुढें शाहू महाराजांस शारिरीं समा धान नाहिं
सें झालें: आणि कांहीं दिवस भ्रांती झाली: पुढंभ्रां
ति गेल्या वर पुर्वीचि त्यांचा पुत्र मृत्यु पावला होता:
म्हणून विचार ठरला की, आपले पूर्वज मालोजी
यांचा भाऊ विठोजीभोसले यांचे वंशीचा कोणी मु
लगा दत्तक घ्यावा. परंतु त्या वेळेस सांपडलानाही
म्हणून महादाजीपंत पुरंदरे व गोविंदरावचिटणी
स यांस शाहूची आज्ञा झाली की. ताराबाई सातार
चे किल्ल्या वर आहे. तिच्या नातवाचा शोध करून
आणावावे ते व्हां ताराबाईस विचारतां त्यांणीं सां
गितलें की मी आपला नातु तुळजापुरीं मावशीचे
घरीं ठेविलाहोता. तो बारशीमुकामीं गुप्तपणें राहि
ला आहे: हें वर्तमान शाहू महाराजांची स्त्री स क
वारबाई यांस कळून ती रुष्ट झाली: इतक्यांत बा

बाजीबाजीराव प्रधान पस्तीसहजार फौज घेऊन-
सातान्यास आले. नंतर शाहूमहाराज यांणीं त्या
पेशाव्यास सुमपणें सनद करून दिली कींतारा
बाईचा नातू आमचे जागीं आधिपति करून त्या-
चा व त्याचे वंशाचा उत्तम रीतीनें संभाळ करून स
र्व राज्याचा कारभार तुह्मी करावा. या प्रमाणेंलि
हून दिलें. तेव्हां श्रीपतराव प्रतीनिधी मृत्यू पावले
मग त्याचा अधिकार जगजीवनराव परशुरामया
स दिला. त्यांचा सर्व कारभार यमाजी शिवदेव मु
नालीक करीतहोते.

नंतर शके १६७१ मार्गशीर्ष शुद्ध तृतीया स
न १७४९ इसवी सनीं सातारमुकामीं रंगमहाला
त शाहूमहाराज कैलासवासी झाले, तेव्हां त्याचें
वय सासष्ठवर्षांचें होतें.

या शाहूमहाराजाचे कारकीर्दीत, राज्याची-
पूर्वी बहुत अव्यवस्था झाली होती, त्याची सुधार
णूक उत्तम प्रकारें होऊन प्रजेचें पालण चांगलेंके
लें. सर्व सरदार व अष्टप्रधान यांचीं कामें, ज्याचीं
त्याजकडे कायम ठेऊन बहुत लोक राजी ठेविले
होते. आणि चातुर्यें करून सर्व कामांत स्वस्थ प

णें दक्षना ठेविली होती. सर्व काल धर्मवासना अस
न त्यांचे हातून दक्षिणादेशांत व हिंदुस्थानांत मो
ठमोठे अधिकार व संस्थानें अधिकार देऊन कैला
सवासी झाले. त्याजकडे कोट्यावधीरुपयांचीसंथा
नें अद्यापि चालत आहेत. व ब्राह्मणास वगैरे लक्षा
वधीरुपयांचीं इनामें वंशापरंपरा चालण्या सारखी
करून दिली, तीं त्याजकडे चालत असून ते लोक
फार सरंजाम आहेत. असा धार्मिक राजा पुनःहो
णारनाहीं. यांची कारकीर्द बेचाळीस वर्षे वागली.

# भागसातवा.

## कारकीर्द रामराजे महाराज यांची.

शके १६७१ सन १७४९ या वर्षी बाळाजिविश्वनाथपेशवे यांणीं शाहूमहाराज यांचे आज्ञे प्रमाणें धाकटे शिवाजी करवीरचे यांचा पुत्र बारशी ये थें होता, त्यांचा शोध करून आणून सातारचे गादीवर बसवून त्याचे नांव रामराजेमहाराज ठेऊन-त्यांस इतमामी माणसांचे खर्चास नेमणूक करून राज्यकारभार स्वतंत्रपणें पेशवे करूंलागले.

या महाराजास स्त्रिया तीन होत्या. त्यांत वडी स्त्री तुकाबाई नेवासकर मोहिते यांची कन्या. दुसरी जानकीबाई मोहिते घिंगाकर यांची कन्या. तिसरी, सगुणाबाई बराणजी मोहिते यांची कन्या.

यांस औरस पुत्र नव्हता म्हणून त्याणीं आपला वृध्दापकाळ जाणून आपले पूर्वज मालोजी भोसले यांचे बंधू विठोजी भोसले याचे वंशातील भिवकजी भोसले वाघीकर यांस दत्तक घेऊन त्याचें नांव शाहूमहाराज आबासाहेब ठेविलें.

नंतर रामराजे महाराज शके १६९९ सन १७७७ या वर्षी कैलासवासी झाले.

यांची कारकीर्द अठ्ठावीस वर्षे चालली.

## भागआठवा.

## कारकीर्द शाहु महाराज आबासाहेब यांची.

रामराजे कैलासवासी झाल्या वर शाहु महाराज आबासाहेब यांस शके १७०१ सन १७७९ या वर्षी सातारचे गादीवर बसवून पेशवे राज्यकारभार चालवित होते.

या महाराजांस स्त्रिया होत्या. पहिली, लक्ष्मबाई; मारायणजी मोहिते माजगांवकर यांच्या दुसरी कमळजाबाई, नरसिंगराव गुजर यांची बहीण; तिसरी, गुणवंताबाई, आबाजीराजे महाडीक यांची बहीण. चौथी आनंदीबाई; मचानजीराजे शिर्के यांची कन्या.

या चौघी स्त्रियांतून आनंदीबाई यांस पुत्र जाह
ले ते –

१ वडील पुत्र प्रतापसिंह महाराज यांचा जन्मश
के १७१४ माघशुद्ध संप्तमी सन १७९२ इस
वीं या वर्षी झाला.

२ दुसरे पुत्र रामचंद्रराजे महाराजभाऊसाहेब यां
चा जन्म शके १७१७ सन १७९५ या वर्षी झा
ला; ते भाऊसाहेब प्रतापसिंह महाराजांचे का
रकीर्दीत शकें १७४१ सन १८१९ इसवी या व
र्षी कैलासवासी झाले, त्यांस दोन स्त्रिया होत्या
पहिली, डेरवणकर शिर्के यांची कन्या; ती प्रता
र असतांच कैलासवासी झाली. दुसरी कुमाजी
राजे महाडिक यांची कन्या, ती शके १७४५स
न १८२३ इसवी सालीं प्रतार वारल्या वर म
रण पावली.

३ तिसरे पुत्राचें नांव शाहाजीमहाराज आपा-
साहेब यांचा जन्म शके १७२४ सन १८०२ इ
सवी या वर्षी झाला.

---

या प्रमाणें तीन पुत्र होते.

शाहूमहाराज आबासाहेब शके १७३० सन १८०८ इसवी या वर्षी कैलासवासी झाले. त्याचे ना वाची कारकीर्द अकरावर्षे वागली.

नंतर त्यांचे वडील पुत्र प्रतापसिंह महाराज यांस त्याच वेळेस बाजीराव रघुनाथ पेशवे यांनी गादीवर बसवून त्याचे नावें आपण राज्य चालवित होते

# भागनववा.

## कारकीर्दमतापसिंहमहाराज यांची.

हे महाराज व बंधु उभयतां आणि मातोश्री भ से बाजिराव रघुनाथ पेशवे यांची व इंग्लिशाचील दायी होऊन पेशवे पलटनअसतां त्याचे लश्करांतहो ने तेथून त्यांणीं इंग्लिशाशीं धोरण केले.

मग आष्टे मुकाम चे लढायींत महाराज इंग्लि शांस मिळाले. पुढें पेशवे यांज कडे महाराजांचेरा ज्य वहिवाटीस होते, ते इंग्लिशानी घेऊन नें सर्व रा ज्य महाराजाचें असें जाणून त्याचे शौकती करतां वसूली बाराळक्ष रुपयांचा मुलुख नेमून देऊन सा तारा संस्थानचे गादी वर शके १७४० सन १८१८ इ सवी या वर्षी कायम केले.

या खेरीज त्यांचे ताब्यांत लहान मोठे सरंजा मी नेमून दिले; त्यांतील मुख्यत्वें करून; खालीद र्शविले आहेत.

१ पंतप्रतिनिधी यांजकडे कमाल दोन लक्ष आ काराचा मुलुख.

२ अक्कलकोटकर मोसले यांजकडे कमाल तीनल
क्ष आकाराचा मुलुख.
३ पंतसचीव यांजकडे कमाल तीनलक्ष आकारा
चा मुलुख.
४ निंबाळकर परगणें फलटण यांज कडे कदीम
लाख रुपयांचा मुलुख.
५ डफळे परगणें जत व करजगी यांजकडे क
डे कदीम पाऊणलक्षाचा मुलुख.
६ शेरखमिरावाईकर यांजकडे कदीम वीसहजारा
चा मुलुख.

---

या खेरिज मंत्री, शेरात, घाटगें वगैरे लहा
न सरंजामी नेमून दिले होते.

या महाराजांनीं आपले कारकीर्दीत प्रतिनि
धी व अष्टप्रधान व दरकदार केले. ते,—

## पंतप्रतिनिधी.

१ परशुराम त्रिंबक पहिलेच होते.

---

## अष्टप्रधान.

१ पेशवे प्रधान बाजीराव रघुनाथ ब्रह्मवर्तास-

होते; म्हणून तें पद कोणास नदेतां त्याचे ऐवजीं दिवाण असें पद योजून विठ्ठलबल्लाळ महाजनी पुरातन परंपरांचे नौकर; आणि जातीनें फारएप योगाचीं कामें केलेले मरवशाचे म्हणून त्याजला-दिलें. ते मरण पावल्या वर ते सर्व काम त्यांचे वडील चिरंजीव गोविंदराव विठ्ठल यांज कडे सांगितलें त्या जवर सरकारची पूर्ण मेहरबानी होती.

२ पंतअमात्य सर्वोत्तम बाबुराव पहिलेच होते ते मरण पावल्या वर ती पदवी बापुकान्हो फडणीस पुरातन परंपरांचे नौकर असून चतुरसिंग राजा बरोबर खस्त खालेले मरवशाचे होते, त्यांस शके-१७६७ सन १८४५ इसवी या वर्षी देवाज्ञा झाली तों पर्यंत त्यांज कडे ती पदवी होती.

३ पंतसचीव चिमणाजी पंडित होते; ते मरण पावल्या वर त्यांचे दत्तपुत्र रघुनाथराव चिमणाजीहोते

४ सेनापति हें पद प्रथम योडेच दिवस कोणास-दिलें नव्हतें; मग बळवंतराव राजेभोसले सरलश्कर यास देऊन संपूर्ण फौजचें काम कुल अकत्यारीनें दिले त्याज कडील खर्चाचे वगैरे कोणते ही कामात दुसरा दखलगिरी कोणाची नव्हती. ते काम त्याजक

डे महाराज काशीस जाई तोंपर्यंत होते, पुढें सेनापति वारल्या वर त्यांस दत्तपुत्र दिलेले हल्लीं महाराजांचे चिरंजिवा पाशीं सातार मुकामीं आहे.

५ पंतमंत्री जयवंतराव पहिलेच होते, तेमृत पावल्या वर त्यांणीं आपले बंधूचे पुत्र दत्तक घेतलेले रघुनाथराव जयवंत यांस त्या अधिकारावर कायम केलें.

६ पंतसचिव ही पदवी काहीं दिवस कोणासही लीनव्हती, नंतर बळवंतराव मल्हार चिटणीस पुरातन नौकर आणि त्याचे वाडवडिली सरकारची मोठ मोठीं कामें करून उपयोगी पडलेहोते म्हणून त्यास तें पद देऊन महाराज काशीस जाई तोंपर्यंत कायम ठेविलें. व त्याज वर महाराजांची दया फार होती.

७ न्यायाधिश ही पदवी चिंतामण चिटको मा टे सुनीम अदालत यांस शके १७५८ सन १८३६ या वर्षी दिली. ती त्याज कडे तीन वर्षे होती.

८ पंडितराव रघुनाथराव होते; ते मरण पावल्यानंतर त्याचे दत्तपुत्र रामचंद्रराव रघुनाथ यां

स तो अधिकार दिला.

---

## दरकदार.

१ सरलश्करची पदवी प्रथम बळवंतराव भोसले यांस दिली. नंतर त्यांस सेनापति पद दिल्यावरुन श्लश्करी खंडेरावराजे शिर्के यांस दिली. त्यांजवर सरकारची पूर्ण कृपा होती.

२ फडणीशिचा दरक प्रथम कृष्णराव कानडे यांजकडे होता; ते मरण पावल्यावर बापूकान्हो खासगी फडणीस पुरातन नौकर भरंवशाचे आणि सरकारचे उपयोगी पडलेले, असें जाणून त्यांस देऊन खासगीफडणीशी त्यांचें दत्तपुत्र सखाराम बापूजी हे लहानपणापासून हुशारीनें सरकार जवळ वागत होते त्यास दिल्यानंतर बापु कान्होम रण पावल्यावर दौलती कडील फडणीशीही सखाराम बापूजी यांस दिली. त्यांजवर महाराजांची पूर्ण कृपा होती. कारण ते काम करण्यास लायक. विश्वासू, भरंशी महाराजांची खात्री होती.

चिटणीशी बळवंतराव मल्हार यांजकडे; कारणाचें पुरातन वतनी. आणि त्याचे वाडवडिली

मोठीं कामें करून सरकारचे उपयोगी पडलेले असें समजून त्याज कडे चालविली; त्यांज वर महाराज यांची पूर्ण मेहरबानी होती.

४ सेनाकर्ते ही पदवी कांहीं दिवस नव्हती; नंतर दिनकरराव हंबिरराव मोहिते यांस दिली; तीयां ज कडे महाराज काशीस जाई तों होती.

५ बक्षिगिरीचा दरक बळवंतराव रामचंद हे पुरातन पदरचे व तें काम त्याचे वाडवडिली करीत आलेले म्हणून त्यास दिला; त्यांचें पश्चात् त्यांचे चिरंजीव सखाराम बळवंत यांस दिला. त्या उभयतांस सरकारची पूर्ण कृपा होती.

६ राजाज्ञा हें पद कांहीं दिवस कोणास दिलें नव्हतें, मग केसो एशावंत आकरे यांज वर फार लोभ धरून खासगी कारभारी होते, त्यांस दिलें. तें त्यांज कडे खासगी काम मुकत्यारीनें असून फार भरंवसे नें चालत होतें. ती पदवी त्यांज कडे महाराज काशीस जाई तों पर्यंत होती.

७ दप्तरदारीचा दरक पहिल्यानें वासुदेवपंत अभ्यंकर यांस दिला. मग त्यांजवर कांहीं आरोप आल्या वर एशावंतराव गडबोले सरदारयांस दिला

काशीस गेल्या वर रामचंद्रगंगाधर जोशी सरसुभे दार यांस दिला

८ पानशेचा दरक शिवराव पोतनीस पुरातन वडिलोपार्जित भरवशाचे नोकर याज कडे होता

९ शिकशेचा दरक प्रथमतः अमृतराव उपाध्ये यांस दिला तें वारल्या वर सरवाराम वल्लाळ काळे रे पुरातन नोकर यांस दिला:

१० खेरीज अदालत व दप्तर व फौज खात्यांत मो ठ्या योग्यतेचे कामगार लोक पृथक्‌ळ होते.

या महाराजांस स्त्रिया किती होत्या त्यांची व्य वस्था काय झाली त्या विषयीं.

२ रामराव मोहिते भकलुजकर यांच्या बहिणी.

१ वडील स्त्री लक्ष्मीबाई महाराज ही महाराज असतांच सातार मुकामी कैलासवासी झाली त्या जवर फार प्रीति होती; त्यांणीं अंतकाळीं आपली बहिण करावी असें मागून घेतलें.

२ दुसरी स्त्री त्यांची बहिण करून त्यांचे ही नां व लक्ष्मीबाई महाराज ठेविलें त्यांस दोन क न्या झाल्या.

१ एक कन्या साहेब लहानपणी मृत्यु पावली

२ दुसरी गोजरासाहेब यांचें लग्न शके १७५
सन १८३४ इसवी या वर्षी मोठ्या समारंभा
नें झालें त्यास पंचवीस हजार रुपये खर्च
ले त्यास एक पुत्र झाला त्याचें नांव प्रता
पराव गुजर यांस दरमहा पेनशीन एक ह
जार रुपये - व दुसरे सालिना एक हजार
रुपयांचें उत्पन्न आहे ते हल्लीं सातान्या
न आहेत या शिवाय एक कन्या होती ती
फलटणाकर निंबाळकर यांस दिली होती
ती गोजरासाहेब काशीहून येऊन शके
१७७५ सन १८५३ इसवी साली कैलास
वासी झाली.

---

ही राणीसाहेब काशी मुकामीं महाराज अस
ता कैलासवासी झाली.

३ तिसरी स्त्री राजसबाई साहेब महाराज त्यां
सच माईसाहेब म्हणतात.

---

या महाराजांची बुद्धि फार विशाल असून
बोलकेपणा उत्तमप्रकारचा होता आणि धूर्तता

चांगली असून घोड्या वर बसणें व नौथाटी वगैरे क्ष रणयांत मवीणता होती, अंतःकरण सदय असून प दरचे लोकांचा अभिमान फार होता: सर्व लोक हु शार होते: या मुळें राज्याची सधारणूक थोडेचदि वसांत झाली.

या पुढें प्रतापसिंह महाराज यांचें मनांत काही राज्य कारण करावें असें येऊन त्यांणीं इंग्रजसर-कारचे विरुध्द फितूर व दंगा करणया विषयींपुष्क ळ दिवस गुप्त रीतीनें मसलत चालविली होती.

शके १७६० सन १८३८ इसवी चे सुमारास्य तापसिंहराजे आणि त्यांचे कनिष्ठ बंधू शाहाजी उर्फ आपासाहेब महाराज यांचे वैमनस्य पडलें तें योवरी इनकें वाढलें कीं, आपासाहेब महाराज सा तारा सोडून माळा वर तंबू देऊन राहिले त्यांचेम सलतीत बाळाजी नारायण नातू वगैरे मंडळी हो ती.

पुढें प्रतापसिंह राजे यांचे फितुराचे मसल ती विषयीं ही इंग्रज लोकांची खात्री होऊन शेवटी मुंबईहून रिविटकरनेक साहेब मुंबईचे गवरनर कलकत्त्याचे गवरनरजनरल यांचे हुकुमानेस

र्वी मुकत्यारी घेऊन साताऱ्यास आले; त्यांणीं किती एक प्रकारें उपदेशाचा सल्ला महाराजांस देऊन खरे प्रकारें मजकूर सांगितल्यास इंग्रजसरकार माफी करतील असे भावानें महाराज यांज पाशीं दोन तीन वेळां बोलले. तथापि महाराजानीं आग्रहानें आपल्यास कांहीं एक माहित नाहीं; असें साफ सांगितलें; या प्रमाणें साहेबाचे बंगल्यांत साताऱ्यासंबंधी बरीं बोलणीं होऊन महाराज परत आले. पुढें थोडे च वेळांत महाराज यांस पश्चात्ताप होऊन आणखी कांहीं बोलणें आहे, असा साहेबांस निरोप पाठविला. परंतु पुढें साहेबांची भेट न होतां साहेब महाबळेश्वरास निघून गेले.

महाराजानी कबूल केलें नाहीं तरी इंग्रजसरकारची फितुरा विषयीं खात्री झाली होती म्हणून प्रतापसिंह राजे यांस मेहरबान करनेल ओविसनसाहेब रसिदंट सातारा यांणीं शके १७६१ श्रावण वद्य त्रयोदशी गुरुवार सन १८३९ इसवी रोजीं प्रातःकाळीं सदरबाजनां सातार मुकामीं धरून कैद केलें आणि निंबाळकर साताऱ्या नजीक ठेविले.

पुढें तेथून तीन महिन्याचे सुमारें निघून गेल

पसिद्ध राजे हिंदुस्थानांत जाऊन श्रीकाशी क्षेत्रीरा हण्याचें कबूल केलें, त्या वरून त्याला इंग्लिशा सरकारानीं नेऊन काशी क्षेत्रांत ठेविलें.

काशी मुकामीं प्रतापसिंह राजे यांणीं बळवंतराव भोसले सेनापति यांचे चिरंजीव दत्तक घेऊन त्याचें नाव शाहूमहाराज ठेविलें.

हे शाहूमहाराज पुढें प्रतापसिंह राजे मेल्या वर काशीहून येऊन सातान्यास राहिले होते, त्यांज वर सन १८५७ इसवी शके १७७९ चे सुमारास हिंदुस्थानांत दंगा झाला, त्या वेळेस राजेसाहेब यांजला, सातारचे कलेक्टर यांणीं संशया वरून सातान्यातून काढून कराची एथें नेऊन ठेविले

हल्लीं तेथें ते आहेत.

प्रतापसिंह राजे काशीस शके १७६९ आश्विन शुद्ध पंचमी सन १८४७ इसवी या वर्षी कैलासवासी झाले.

नं०
काये सन १८

# भागदहावा.

## कारकीर्द शाहाजीमहाराज आपा साहेब यांची.

या महाराजास शके १७६१ श्रावण वद्य अमुरु वार सन १८३९ इसवी तारीख ४ माहे सपटंबर- रोजीं सातारचे राज्याधिकार इंग्लिश सरकारा नीं कार्इम केलें, आणि सर्व लोकांस जाहिरनामा- प्रसिध्द केला. ( तो असा )

जाहिरनामा— सरकारदौलत मदार कंपिनी इंग्रजबहादुर विद्यमान लफ्टनेंट करनल ओविन साहेब बहादुर रसिडंट सातारा यांस - बंदिगान- अलिनबाब मुस्तताब आनराबल सरजेम्स रिविट करनेक बारोनेट गवरनर साहेब जंजिरे मुंबर्इ यां णीं अकत्यार दिल्या वरून तमामलोकांस महा- र होण्या करतां हा जाहिरनामा मगर केला जातो; सरसन आर्बैनमयातैन व अल्फ

१. बाजीरावसाहेब यांणीं कारण नसतां दुस्मा नी केली, त्याज वरून इंग्लिशसरकारांस जरूर

पडून त्याशीं लढायी केली, तेव्हां आनराबल मि
स्तर एल्फिन्स्तन्साहेब बहादुर पेशाव्या कडील-
सरकेलेले मुलखाचें बंदोबस्ता करणया करतां क
मिशनर होते, यांणीं तारीख ११ माहे फेब्रुवारी स
न १८१८ इसवीचा जाहिरनामा केला. त्यांत बाजी
राव साहेब याशीं कोणते कारणा वरून लढायी क
रणें जरूर जाहलें; तीं कारणें लिहिलीं आहेत;व
त्यांत रवालीं लिहिलें आहे जें;—

महाराज छत्रपति सातारकर हल्लीं बाजिराव
साहेब यांचे कैदेंत आहेत, त्यास सोडवून घेऊन-
मोकलें करून त्यांचे व त्यांचे मंडळीचे शाननशौ क
ती करतां कांहीं राज्य त्याजकडे चालेल, अशी त
जवीज होऊन सातारा किल्ला घेऊन त्या वर महा
राज यांचा झेंडा कायम करून त्याचे तर्फेचे पहि
ले कारभारी यांस आपले कामा वर कायम केले
आहेत, त्यास जो मुलुख महाराज यांज कडे हो
ईल; त्यांत न्याय इनसाफ व हुकुमत व अमल
न करतील, कंपनी सरकारांत मुलुख राहिल; ते
थें कंपनी सरकारचा अमल होईल; वसूल स
रकारांत घेतलाजाईल, परंतु मालमत्ता स र्व

ज्याची त्याज कडे राहिल; कोणाचे वतनास व इ
नामास व वर्षासनास व देवस्थानचे खर्चास व-
खैरातीस व कोणाचे ज्ञातीचे धर्मासि रवलेल नहो-
तां, वाजवी असेल, तसें सरंछित चालेल असें
लिहिलें आहे.

२. आष्ट एथें पेशाव्यांचा मोड होऊन सातारक
र महाराज यांस प्रतिबंधातून मुक्त करून सदर्हू
जाहिरनाम्यांत लिहिल्या प्रमाणें सिंव्हासनारुढ
केलें. व दोस्तीचा तहनामा जाबिता राबिता चा
लविण्या करतां महाराज व इंग्रज बहादुर यांचा
तारीख २५ माहे सपटंबर सन १८१९ इसवीचा
झाला. त्या तहनाम्याचेदुसरेकलमांत महाराज आपण
व आपले फर्जंद व वारिस वकायममुकाम यांचे
तर्फेनें करार केला आहे कीं सरकार इंग्रज बहादु
रयांचे सरकारातून राज्य देत आहेत तें घेऊनस
रकार इंग्रज बहादुर यांचे कल्यांत व मदतींत निरं
तर संतोषानें राहून इंग्रजसरकार बहादुर यांचे
सल्लामसलतीनें हरएक काम करीतजाऊं; असा
करार आहे; आणि पांचवे कलमांत महाराज यां
णीं आपण व आपले फर्जंद व वारिस वकायम

यांचे तर्फेनं करार केला आहे कीयाकरारा प्रमाणें आ
पले कडील राज्याशिवाय दुसरे कोणी सरदार किं
वा जाहगिरदार किंवा वकील वगैरे हर कोणास प
ण पाठविणार नाहीं व त्याशीं जाबसाल ठेवणार नाहीं
असें आहे, व आणखी त्याच कलमांत लिहिलें आ
हें कीं सदरीं लिहिलेले सरदार वगैरे लोक याशीं म
हाराजाचें कामकाज प्रकरणीं तकरार पडल्यास त्यां
चा बंदोबस्त इंग्रज बहादुर सरकार करतील, - पर
करार झाला आहे, त्या मुलकातील लोकांशिवाय बा
हेरचे लोकांशीं लग्नाचें अगर घरगुती काहीं कारण
पडल्यास इंग्रजबहादुर यांचे सरदाराचे मार्फती नें
करीतजातील व त्याच कलमांत शेवटीं असें लि-
हिलें आहे की, हेंच कलम यां तहनाम्या ची शर्त-
आहे यांत महाराजांचे इंग्रज सरकारातून को
हीं तफावत पडल्यास या तहनाम्याने महाराज सर
कारास जो फायदा आहे तो बरबाद होईल, असें-
यांत लिहिलें आहे.

३ सदरहू प्रमाणें करारनामा कायम झालाअ
सतां महाराज यांणीं आपले करारीं वर लक्ष्यन
देविता व इंग्रजीसरकारांतून आपणा वर उदार

पणें मेहरबानी करून कैदेतून सोडवून सिंहासना रूढ केलें, तें मनांत न आणतां किती एक वर्षां पासून तहनाम्याचे पांचवे कलमांतील करार मोडून गुप्त बोलणी चालू ठेविलीं; आणि त्याणीं मोठ मोठे इरादे मनांत आणिले; ते असे की, त्यांत इंग्लिश सरकारचा नाश व्हावा, आणि तहनाम्यास विरुद्ध असे दावे व बोलणीं चालविली. आणि उभय सरकार यांचे दर्म्यान दोस्ती झाली, त्याची तसनस व्हावी, अशी त्यांज कडून वागणूक झाली; असें साफ शाबूद होऊन इंग्लिश सरकाराची खातर जमा झाली.

४ असें असतां महाराज याणीं खराब मसलती लोकांचा सल्ला ऐकून अशीं कृत्यें केलीं असतां ल असें इंग्लिश सरकार यांणीं मानून आपण जी द या करून ती महाराज आपले दिलांत वागवून तेंउ कसान होण्याचे मार्गांत शिरले. तो मार्ग सोडती ल अशी उमेद व इति जारी येऊन इंग्लिश सर कारांतून असें ठरविलें होतें की, महाराज यांणीं क वूल व्हावें की, आम्ही पुढें तहनाम्यांत जस जसें लिहिलें आहे, त्या वरहुकूम अंतःकरणा पासून

स्वच्छतेनें चालू. आणि उभय सरकारचे वांक
पणास जें मुख्यकारण जो कारभारी त्याजला म
सल नीतून काढून राकूं. आणि तद्नाम्यास वि
द्ध जीं कामें त्यांज कडून झालीं, तीं ज्या लोकांचे
जाहिर करण्या वरून गाबिद झाले त्या लोकांच
नाश करणार नाहीं, असें त्यांणीं कबूल केलेंअस
तो जें झालें, तें मनात नठेवितां माफ करावें, असें
ठरविलें होतें.

५ सदरी लिहिल्या प्रमाणें करावें, या हेतूनें ह
नराबल सरजेम्स रिविटे करनेक बारोनेट साहेब
बहादुर गव्हरनर जनिरे मुंबई हे त्यास नबाब
मुस्तताब मे अलाअलकाब अझारुल अशराफ रै
व अनराबल लार्ड अकलंड साहेब बहादुरइंडिय
चे गव्हरनरजनरल यांणीं मुकर्त्यारी दिल्या वरु
न खुद्द जातिनिशीं सातार्‍यास येउन महाराज
यास सांगितलें कीं, आपण आपल्यास अपाय
होण्याचे रीतीनें वागतां, असें त्यांस समजा
लें, आणि जे करार कबूल करून घेऊन जें झा
लें माफ करण्याची इंग्लिश सरकाराची खुषीहे
ती, ते करार महाराज यांस मुखजबानी व लि

ह्न कळविलें; व हे करार कबूल करणें, इतकी-
च नोंड दोस्तीवएकपणा जारी होण्याची, यास्तव ते
करार महाराज यांणी कबूल केले पाहिजेत, अ
सें त्यांस बहुत तऱ्हेनें समजाविलें.

६ महाराज यांची अनेक वेळ बोलणी झाली, व
त्यांस मनन करण्यास पुष्कळ फुरसद होती, व
कबूल नकेलें असता परिणाम काय, हें त्यांस स
ष्ठ सांगितलें असता ही त्यांणीं ते करार कबूल के
ले नाहींत या करतां सदरी तपशील लिहिलाया
रीनाने जो तहनामा झाला त्या तहनाम्या वरम
हाराजानीं इतकी कमनजर ठेविली त्या महारा
जाची पुढें दोस्तीचा शिलशिकचालविणेअशक्य, अ
शी इंग्लिशसरकाराची खातरजमा झाली, त्या व
रून हा जाहिरनामा करून उभय सरकाराची दो
स्ती होती ती बरबाद केली, असें तारीख २५मा-
हे सपटंबर सन १८१९ इसवीचा तहनामा महा
राजाची झाला, त्यांतील पांचवे कलमांत शर्तर
रल्या प्रमाणे अमलांत आणण्याचा इंग्लिशस
रकाराचा इरादा आहे.

७ परंतु आपला फायदा व्हावा, अथवा आ

पला मुलुख मोठा व्हावा, ही इच्छा इंग्लिशास र कारची नाहीं, सबब असें ठरविलें आहे कीं प्रतापसिंह महाराज यांचे बंधू शाहाजीराजे महाराज हे वारस यास सातान्याचे मुलुखाची सरहद्द तारीख पंचवीस माहे सपटंबर सन १८१९ इसवीचे तहनाम्यांत ठरले आहे, त्या प्रमाणे त्या मुलखाचे राज्य त्यास देऊन शाहाजीराजे हे सातान्याचे श्रीमन्महाराज छत्रपति असें जाहिर होण्या करतां हाजा हिरनामा करून सर्वास प्रसिद्ध केलें असें. तरी जे लोक त्याचे मुलखांत राहात आहेत त्यांणीं त्याशीं रुजू राहावें. अशी ताकीद या जाहिरनाम्या वरून असे.

हा जाहिरनामा सात कलमाचा तमामलोकांस मशहूर होण्या करतां प्रगट केला असे.

तारीख ४ माहे सपटंबर सन १८३९ ईसवी मुताबिला छं० २५ माहे मजकूर सरसन ओर्बेन मयातैनव अल्फ मुकाम सातारा.

या महाराजांचे नाव्यांत पूर्वी प्रतापसिंह महाराजांचे कारकीर्दीत दुसरे कलमांत लिहिलेले सर्व जाहगिरदार व सरंजामीलोक दिले.

या महाराजांनीं आपले कारकीर्दीत अष्टप्रधान, प्रतिनिधी व दरकदार वगैरे केले ते :—

## प्रतिनिधी.

१ परशुराम श्रीनिवास पहिलेच होते; त्यांस महाराजानीं आपण असता हिवरेकर याजपै कीं दत्तपुत्र देऊन त्याचें नांव श्रीनिवासराव ठेवून त्याचें लग्न मोठ्या समारंभानें आपले वाड्यांत करून दौलतीस मालक करून ठेविलें; त्यांचे तीर्थरूप कैलासवासी झाल्या वर सरकार कंपनी याणीं महाराजांचे ठरावा प्रमाणें कायम करून ते आपले दौलतीचा उपभोग करीत आहेत.

## अष्टप्रधान

१ पेशवे प्रधान बाजीराव रघुनाथ ब्रह्मवर्तास कायम होते, म्हणून तें पद कोणास न देतां

त्या ऐवजीं कारभारी अशी पदवी योजून आपण गादीवर बसलांच नरहर रघुनाथ पराडकर यांस दिली. नी त्यांज कडे सातम हिने होती, मग त्यांजवर अलोभ होऊन कांहीं दिवस कोणास दिलीना ही पुढें स न १८४३ इसवी या वर्षी एसावंतराव भिंवक फौजदार यांस दिवाणगिरी दिली, नी त्या ज कडे सन १८४५ शके १७६७ श्रावणमा स पर्यंत होती.

२ सेनापति ही पदवी खंडेराव राजे घिर्के सर लश्कर यांस शके १७६५ सन १८४३ याव र्षी दिली.

३ पंतसचीव ही पदवी महाराज गादी वर बस तांच त्या संस्थानचे रघुनाथराव यांचे दत्तपु त्र चिमणाजीरघुनाथ यांस दिली, ते हली कायम असून आपले दौलतीचा उपभोग क रीत आहेत. त्यांस एक औरस पुत्र झाला- आहे; त्यांचे नांव शंकरराव आहे.

४ पंत अमात्य ही पदवी सखाराम बापुजी फ डणीस यांस शके १७६१ सन १८३९ इसवी

या साली दिली ती त्यांज कडे चालत आ
हे.

५ पंतमंत्री रघुनाथराव जयवंत पहिलेचहो
ते ते हल्लीं कायम आहेत, त्यांस दोन औरं
स पुत्र आहेत.

६ पंतसचिव ही पदवी वेणूबाई सचिव यांचेद
त्तक पुत्र रामचंद्र गोपाळ यांस शके १७६१
सन १८३९ इसवी सालीं दिली, त्यांस एक
औरस पुत्र आहे.

७ न्यायाधिश ही पदवी कांही दिवस जोतिभ्रि
बक फौजदार यांज कडे होती, मग ते मृत्यु
पावले.

८ पंडितराव रामचंदराव रघुनाथराव पहिले
च होते ते हल्लीं कायम आहेत.

---

## दरकदार.

१ सरलश्कर ही पदवी खंडेरावराजे शिर्के यां
स पहिलीच होती, त्यांस सेनापति पद दि-
ल्या वर त्यांचे वडील चिरंजीव आबाजी
राजे यांस सरलश्करी दिली, त्यांचे तीर्थरू

प पश्चात सेनापति वारल्या वर त्याचा अधिकार आबाजीराजे यांज कडे इंग्रजानीं काय म केला. ते हल्लीं कायम आहेत.

२ फडणीशीचा दरक सरवाराम बापूजी यांज-कडे पहिलाच होता, ते हल्लीं कायम असून त्यांज कडे खासगी सध्दां दोनी दरक चालतात व त्यांज वर महाराजाचा फार भरंवसा होता.

३ चिटणीशीचा दरक केसो एशावंत फौजदार यांस शके १७६५ सन १८४३ इसवीसाली दिला तो त्या कडे शके १७६९ सन १८४७ इसवी अखेर होता, पुटें वासुदेव कृष्णा महाजनी यांज कडे दिला, तो महाराजांचे पश्चात थोडकेच दिवस चालला.

४ सेनाकर्ते ही सरदारी जानराव भोईटे यांस शके १७६५ सन १८४३ इसवी साली दिली ती त्यांज कडे यावत जीव चालली.

५ बक्षगिरीचा दरक मुधोजी राजे महाडिक यांस शके १७६५ सन १८४३ इसवी सालींदिला, तो त्यांज कडे कायम आहे.

६ राजाज्ञा ही पदवी शके १७६५ सन १८४३ इसवी सालीं बळवंतराव भोसले पंत राजा

ला यांस दिली; हे बळवंतराव भोसले महाराज यांणीं लहानपणापासून वाढविलेला मुलगा हो य याजला दरमहा सातहजार रुपये व काहीं इ नामी उत्पन्न दिलेहोतें, या बळवंतराव भोसल्य सदरमहा पेन्शन ६०० रुपये पावत असतें.

७ शिक्केनिशी सखाराम बल्लाळकान्हेरे यांजक डे पहिले प्रमाणेंच कायम.

८ दप्तरदारी रामचंद्रगंगाधर यांज कडे होती ते मरण पावल्या वर त्यांचे उभयतां चिरंजीवाक डे तें काम शके १७६६ सन १८४४ इसवी या व र्षी सांगितलें.

९ सेनासरखेल पदवी तानाजीराजे शिर्के यां स शके १७६५ सन १८४३ इसवी या वर्षी दि ली; ती त्यांज कडे कायम आहे.

१० पोतनीस रामचंद्र शिवराव होते, ते हल्लीं कायम आहेत.

---

या महाराजास स्त्रिया किती होत्या; आणि त्या कोणाच्या ए विषयीं:—

१ वडील स्त्री गजराबाई महाराज ही मुधोजी

राजे महाडिक यांची बहिण ती महाराज सतां शाके १७५६ सन १८३४ इसवी साली मरण पावली.

२ दुसरी स्त्री सगुणाबाई महाराज भाई साहेब ही तानाजीराजे शिर्के यांची कन्या. ती हल्ली सातान्यास आहे.

३ तिसरी स्त्री जिजाबाई महाराज भाई साहेब ही लक्ष्मणजी राजे शिर्के यांची कन्या, ती शाके १७८३ सन १८६१ साली मयत झाली.

४ चौथी स्त्री सईबाई महाराज बयासाहेब वही की र्तसिंग राजे शिर्के यांची कन्या ही महाराज यांचे पश्चात थोडकेच दिवसांत कैलासवासी झाली.

एणें प्रमाणें होत्या.

या महाराजाचें अंतःकरण दयायुक्त असून औदार्य मोठें होते, श्रीकुलस्वामी जवळ निष्ठा असून धर्मवासना फार होती, हत्ती, घोडे, जवाहिर, का पड, व इमारत यांचा शोक मोठा होता, पदरचे माणसा कडून कारण परत्वें अपराध झालातरी त्याचें नुकसान करण्याची उतावळी नव्हती, भिड

त्तपणा असून धूर्तता फार होती, मुलकातील न्या
य इनसाफ रीती प्रमाणें वक्तशीर करून राज्यका
भार जातीचे अकलेनें चालवून इंग्लिश सरकारा
वी दोस्ती चांगली संपादन केली होती, रयतेस इ
जा नदेता मुलखाची आबादी राखली होती, व फौ
जेचा व कामगाराचा वगैरे पगार दरमहाचे दरम
ा देऊन हुशार लोक ठेवुन सर्व कामांत मोठ्या द
शतेनें अव्यवस्था होऊं दिली नाही.

या महाराजानीं कितीएक मोठीऔदार्याचीं
कृत्यें केलीतीं:—

श्रीकृष्णा, वेण्या नदीस पुल बांधले त्या
स खर्च रुपये ..... २५०००

नवा वाडा बांधला त्यास खर्च रुपये, ..... ५००००

। त्यांतील बिलोरी व किनखापी वगैरे सा
गाना बद्दल रुपये ..... ४००००

ाल मंदिर कुसवा सकट्दां बांधिले त्यास ..... १००००

जाऱ्हामुलाचे लग्नास ..... ७५००

वितेश्वराचे पाण्याचा दुसरा नळ बांधि-
ा त्यास ..... १००००

ंतकाळा पूर्वी दसऱ्याचे दिवशीं पदर
। मंडळीस कापड वांटलें त्यास ..... १००००

या समाणें या महाराजानीं औदार्यपणें ख
र्च केला. व प्रतिवर्षी दानधर्म व कापड वगैरे लोकां
स देहेनगी फार दिली.

या महाराजांस औरस पुत्र नव्हता म्हणूनचि
मणाजी भोसले सडेकर याचे चिरंजीव आबाजी
भोसले यांचे पुत्रास शके १७७० चैत्र शुद्ध द्विती
या सन १८४८ इसवीस आपण गादीवर कायम
असतां सावधपणानें इंग्लिश सरकाराचे मेहरबा
न डाक्तर मरीसाहेब याचे समक्ष दत्तक घेऊन-
त्याचें नांव व्यंकोजी महाराज ठेविलें आहे.

या महाराजांनीं नवीन इनामगांव जमिनीप
रचे जुने नोकर मंडळीस व आपले गुरु संस्थान
चाफळ यास वगैरे प्रतिवर्षीं पंन्नास हजार रुप
याचे मोठ्या उदारपणानें करून दिलें : तें वंशप
रंपरा निरंतर चालण्या साररवें असून त्या लोकां
स फार सरवकारक झालें आहे.

कैलासवासी शाहुमहाराज यांचें वृंदावन-
माहुली एथें आहे व त्या जवळ चौघडा देऊनत्या
चे व पुण्यतिथीचे वगैरे खर्चास सालिना एक ह
जार रुपयाचें उत्पन्न खजिन्यांतून नेमून दिलें

आहे. व पुढे इंग्लिश सरकारांतून चालले आहे; तो मर्य या महाराजांनीं आपले कारकीर्दीत हरएक कारणावरमोठा उदारपणा करून सर्व लोकांस सुख देऊन किर्ती मिळविली.

हे महाराज दत्तपुत्र घेतल्या वर कांहीं अवकाशानें सावध असतां तेच दिवशीं दोन प्रहरी [illegible]

आपासाहेब महाराज वारल्या वर त्यांचे दत्तपुत्र होते; त्यांस इंग्लिश सरकारानें मंजूर केलें नाहीं; तेव्हां सातारचे राज्यधानीचा अधिकार इंग्लिश सरकारच कमिशनर मेहरबान बारल ल भ्रियर साहेब यांणीं सर्व कारभार चालविला होता.

पुढें शके १७८४ सन १८६२ इसवी पर्यंत कमिशनरी अंमल चालून शेवटी इंग्रज सरकारानीं सातारचें राज्य खालसा केलें.

आपासाहेब यांचे दत्तपुत्र श्रीमंत शाहू महाराज हे सातारांत होते, यांजला सन १८५७ शके १७७९ साला[illegible] झाला, त्या वेळेस सरायावरून सातारचे कमिशनर साहेब यांनीं सातारा

...कादून नेले ते हल्ली नगर मुकामी आ...

समाप्त

# भाग अकरावा.

## सातारकर छत्रपति महाराजां

## चे प्रतिनिधी यांचे पदाविषयीं.

### इतिहास.

श्रीमंत शिवाजीमहाराज उभयनि यांणीं रा ज्य काबीज केलें : तेव्हां त्यांचे घरोघर निराजीराव जी हे फार उपयोगी पडलेले होत, म्हणून जेव्हां सन १६७४ शके १५९६ या वर्षी शिवाजीमहारा ज यांस राज्याभिषेक झाला ; तेव्हां त्यांणीं अष्टप्र धान केलें ; त्यांत निराजीरावजी यांस न्यायाधिश केलें.

पुढें त्यांचे चिरंजीव प्रल्हादनिराजी हे महा राजा कडून गोवळकोंडे एथील बादशाहा कडे वकील होते.

शके १६०२ सन १६८० या वर्षी शिवाजीम हाराज मरण पावले ; मागें संभाजीमहाराज ( शिवाजीचे वडीलपुत्र ) यांजला यांगलानीं

धरून नेऊन त्यांचे दुष्टस्वभावानें त्याजला शके-
१६१० सन १६८८ इसवी फालगुन वद्य अमवा
स्या रोजीं पुणेया जवळ तुळापुरीं मोंगलानीं धार
मारिलें.

संभाजीस मोंगलानीं धरून नेल्या वर पाठी
मागें शिवाजी चेधाकटे पुत्र राजाराम महाराज रा
यगडावर होते ते प्रल्हादनिराजी यांचे मसलतीं
नें राज्यकारभार चालवू लागले. परंतु संभाजी
चे कारकीर्दित फार अव्यवस्था होऊन शिवाजी
चे वेळचे सरदार मानकरी चोहोकडे गेले यासुळें
आणि मोंगलाची फौज सर्व इकडे पसरली: आ
णि त्यांणीं संभाजीची स्त्री व पुत्र शिवाजीस्याज
ला पुढें शाहू म्हणूं लागले) यास धरून नेऊनमि
रज व पन्हाळा किल्ला घेतला. तेव्हां इकडे राजा
राम यांचा मोंगला पुढें ठिकाव लागेना.

असें असतां ह्या प्रसंगीं आपले सरदार ज
मा करून त्यांचे विचारें राजाराम महाराज चंदीच
याराकडे शिवाजीचें मावळ होतें तिकडेआपण
जाण्या करितां प्रल्हादनिराजी वगैरे एकवीस म
णयें विश्वासू बरोबर घेऊन तिकडे गेले.

चंदी कडे जाण्या पूर्वी व वाटेनें मल्हादनिराजी यांणीं मोठे श्रम केले; हे फार बुध्दिवान शहाणे व चतुर होते, असें महाराजानीं पाहून चंदीस पोंचून आपली राज्यधानी स्थापून स्वस्थता झाल्या नंतर अष्टप्रधानाहून वरिष्ठ असें नवीन पद (प्रतिनिधी) असें कल्पून तें पद प्रल्हादनिराजी यांस शके १६१४ सन १६९२ चे सुमारास दिलें त्यांचा शिक्का अष्टपैलु खालीं लिहिल्या प्रमाणें आहे.

"श्रीलक्ष्मीनृहरेर्प्रीते ॥ मुद्रा निराजीजन्मनः
राजारामप्रतिनिधे ॥ प्रल्हादस्यविराजते"

मग शके १६१९ सन १६९७ चे सुमारास चंदी वर मुसलमानांनीं हल्ला करून राजारामसाहेब यांस चंदीतून काढून दिलें, ते वेळेस त्या गर्दीत प्रल्हादनिराजी ठार मेले.

नंतर राजारामसाहेब जिंजी कडून गुप्तपणें विशाळगड यांनीं आले, आणि पुढें रामचंद्र आबाजी बहुतकर यांचे मसलतीनें सातान्यास येऊन राज्यधानी केली. तेव्हां शके १६१९ माघ सन १६९७ चे सुमारास तिमाजी रघुनाथ यांस त्यांचें बापाचे आग्रहास्तव प्रतिनिधीपदाचीं व

सें दिलीं, परंतु तेव्हां हे पराक्रमी नाहींत, असें दिसून आलें होतें. या प्रतिनिधीची मुद्रा अशी होती की,-

"राजाराम प्रतिनिधे॥ लक्ष्मीकालप्रसादनः
तिमाजीरघुनाथस्य॥ मुद्राकार्यौ विराजिते"

पुढें शके १६२१ सन १६९९ फालगून वद्य नवमीस राजाराम महाराज सिंहगडावर मृत्यु पावले, त्यांची स्त्री ताराबाईसाहेब यांणी आपला पुत्र शाहे (शिवाजीचे) नांवें राज्यकारभार चालवून आपला मुख्य कारभारी रामचंद्र आबाजी बहुत कर "हुकुमतपन्हा" हा होता.

रामचंद्रपंत हुकुमतपन्हा यांचे कारकून परशराम त्रिंबक किन्हईकर कुळकर्णी यांणीं जेव्हां राजाराम साहेब चंदीकडे गेले तेव्हां मोंगलापासून सातारा, पन्हाळा, परळी, वसंतगड वगैरे किल्ले व मुलुख घेतले; व पुष्कळ फौज जमाकरून किल्लेकोट मुलुख काबीज केले; या मुळें ताराबाई यांणीं तिमाजीरघुनाथ यांस दूर करून परशराम त्रिंबक यांस रामचंद्रपंताचें सांगण्यावरून प्रतिनिधी पद दिलें; या प्रतिनिधीचा शि

का असा आहे कीं,-

"श्री आई आदिपुरुष यमन्न: राजाराम स्वामीरूपानिधी: तस्यपरशुराम भिंबक मतिनिधी"

यांचे कागदाचे शेवटीं "निदेशात्समक्ष" अशीं अक्षरें असून श्री कराजवळ "आई आदिपुरुष" अशीं अक्षरें आहेत.

या महाराजांनीं पत्र लिहिणेंतर वर "राजश्री परशुराम पंडित" असें नांव लिहून शेवटीं हुतकाय लिहिणेसूत्र असा 'लिहिण्याची चाल होती. राजपत्रा वर यांचा शिक्का कोनाड्यांत होतो या हुद्याचें काम राजाचे हुजूरचे दरकदार घेऊन मुलुकाचा बंदोबस्त ठेवावा; व राज्यकारभार पहावा.

मतिनिधी पदाला वस्त्रें वगैरे राजा कडून व्हावयाचीं तीं:-

१ प्रथम भेटी समयीं चादरबादली,
१ पदाचीं वस्त्रें, मंदील एक, जामेवार एक, चा दरबादली एक, किनखाप एक पटका एक
१ शिक्केकटार.

१ शस्त्रें, तलवार एक, ढाल एक.
१ जरीपटका.
१ चौघडा.
१ हत्तीनग नीन.
१ घोडा एक.
१ जवाहिर; शिरपेंच एक; मोत्यांचा तुरा एक, मोत्यांचा चौकडा एक, मोत्यांची कंठी एक, झगा एक.
१ चौरी; सोन्याचे दांडीची.

या प्रमाणें देण्याची चाल होती.

पुढें शके १६२९, सन १७०७ या वर्षी संभाजी चे पुत्र शाहूराजे मोंगलाचे कैदेतून सुटून दक्षिणेसीं आले, त्या वेळेस ताराबाईसाहेब यांणीं सर्व सरदारा पासून शफथा घेतल्या की, आपण ताराबाई व तिचा पुत्र शिवाजी यांचा पक्ष स्वीकारूं, आणि शाहूराजे तोतया आहे. यांज कडेआपण मिळणार नाहीं.

अशी शफथ होऊन मग परशुरामत्रिंबक आणि धनाजीजाधव ताराबाईचे हुकुमानें शाहूराजाचे पराभवास गंगातिरीं शाहूराजेहोते

तिकडे गेले; तेथें जाधवराव सेनाधिपति त्यांस मिळाले; आणि परशुराम पंडीत मतिनिधी पराभव पावले; पुढें शाहूराजे सातान्यास आले; व राज्यकारभार पाहूंलागले; तेव्हां परशुराम त्रिंबक यास धरून कैद केलें; आणि पहिले मतिनिधी-प्रल्हादनिराजी यांचे पुत्र गदाधर व नारायण असे दोघे होते; त्या पैकीं गदाधर यांस मतिनिधीकें लें: त्यांची मुद्रा अशी कीं:-

"श्रीशंकर शाहुछत्रपति कृपानिधी, प्रल्हादसुत गदाधर मतिनिधी"

पुढें परशुराम मतिनिधी हे शाहुछत्रपति यांस शोरवमि-या यांचे मार्फत शरण आल्या वरत्यास पुन्हा ती पदवी दिली: ती शके १६१० सन १७३८ पर्यंत त्याज कडे होती.

इतक्यात त्याचा वडील पुत्र कृष्णाराव यांस ताराबाईनीं कोल्हापुरास संस्थान करून तेथें ठेविले होते; त्याणें काही बंड केलें; यास्तव परशुराम पंडीत हे त्यास अनुकूल असतील असें जाणून यास काढून गदाधर मतिनिधी 'माजी' यांचे बंधू नारायण प्रल्हाद यास मतिनिधीची जागा दिली

त्यांणी ना एक वर्ष चालविली; त्यांचा शिक्का असा होता:-

" श्रीमन शिवक भक्तस्य, शाहू मनिनिधी
र्मम नारायणस्यमुद्देय, प्रल्हाद तनुजन्मे "

या समयीं राजश्री कृष्णारावराजा खटावकरया नांवचा मोंगलाचा एक सरदार होता, त्याणें खान देशांत बंड केलें, म्हणून शाहूराजांनीं परशुरामपंडित यांचा तिसरा पुत्र श्रीनिवासराव यांस तें बंड मोडण्या करतां पाठविलें; तेव्हां त्यांचे तिर्थरूप परशुराम यांणीं त्यास सांगितलें कीं जर तू या वेळे स जय मिळवशील तर माझी सुटका होईल; या वरून त्याणें मोठा पराक्रम केला. त्या उभयतां ची भोंदा जबळ लढाई होऊन श्रीनिवासरावया णें खटावकरास कैद करून आणलें: तेव्हां शाहूराजामसन्न होऊन त्याचे बापास (परशुराम पंडित) कैदे तून मुक्त करून त्यास मतिनिधीची पदवी दिली; ती शके १६३२ सन १७१४ पासून शके १६३८ स न १७१६ इसवी पर्यंत त्यांणीं चालविली; त्यां ची मुद्रा एणे प्रमाणें -

" श्री आई आदिपुरुषः श्रीराजा शाहू छत्रप

नि म्सामी कृपानिधी:, तस्य परशुराम त्रिंबक प्रतिनिधी."

परशुराम पंडित यांस शके १६३८ सन १७१६ या वर्षी देवाज्ञा झाली; मग त्यांचा तिसरा पुत्र श्री निवास परशुराम हे शूर असल्या मुळें त्यांस त्या पदवीची वस्त्रें शाहू महाराज यांणी दिली; यांस श्रीपतराव अथवा राव प्रतिनिधी असें ही म्हणत.

श्री निवास पंडित यांणी शके १६३९ सन १७१७ पासून शके १६६९ सन १७४७ पर्यंत ही पदवी चालविली.

प्रतिनिधीचे वंशांत हे पुरुष मोठे विख्यात व धार्मिक असे होऊन गेले; यांणी दहा लक्ष रुपया च्या जमिनी व गांव मिळून लोकांस इनाम दिले व शाहू महाराजा जवळ हेच मुख्य कारभारी होते यांणी कारभार उत्तमरीतीनें चालविला. यमाजी शिव देव यांचे मुतालिक होते;

श्रीनिवास राव यांणीं कर्नाटकांत निजामा शीं लढाया केल्या; कोकणांतील कांहीं किल्ले लढून घेतले; कोल्हापुरचे राजाशीं लढायी करून जय मिळविला; अशा प्रकारें पराक्रम व धर्म या दोन

स्तुत्य गुणानीं यांणीं आपलीकि तीं चिरकाळ क
रून ठेवली, पुढें जे अधिकारी झाले, त्यांणीं, यांणीं
कैलेला धर्म बुडविला; तथापि अद्यापि बहुत चालू
आहे; यांचा शिक्का बापाच्या मुद्रे प्रमाणेच नाव
मात्र बदलून तयार केलाहोता; यांची पत्नी राधा
बाई "बहिण एश्वदाबाई" ही राजश्री आपाजीरा
व कोल्हेकर देशपांडे यांस दिलीहोती.

यांजला एक मुलगी राजस बाई झाली, ही
कडेगांवकर देशपांडे राजश्री नागोजीराव यांस
दिली होती, यांचे मुख्यत्वें करून राहणें कऱ्हाडा.
स होतें.

परशुराम पंत यांचा बंधु माधवराव यांसद
त्त दिलाहोता; परंतु त्यासच परत घेऊन त्याचें ना
व हैंच (श्री निवास परशुराम) चालविले.

बाजीराव बल्लाळ पेशवे यांचा उत्कर्ष यांचेच
कारकीर्दीत झाला; यांचा काळ शके १६६९ सन
१७४७ या वर्षी झाला. तेव्हां यांचा कनिष्ठबंधू
जगजीवन परशुराम यांस ती पदवी शाहूमहा
राज यांणीं दिली. जगजीवन यांस दादोबा अ
सें ही म्हणत.

पुढें शाहुमहाराज छत्रपति शके १७६१ सन १७४९ मार्गशीर्ष वद्य नृतीयेस कैलासवासी झाले; त्यांज बरोबर त्यांची पत्नी सगुणाबाई ही सती गेली; आणि बाळाजी बाजिराव पेशवे यांणीं राजमंडळ तोडून टाकिलें; या कामांत दादोबा हे हर्कत करूंलागले; व त्यांणीं व त्यांचे मुतालिकयानें "सागोळे" घेतलें, तेव्हां भाऊसाहेब यांणीं त्या उभयतांस धरून किल्हईच्या किल्ल्यांत टाकिलें; पुढें दोनवर्षांनीं सर्व बंदोबस्त झाल्या वर सोडलें; ते पुढें शके १६७३ सन १७५१ या वर्षीं मरण पावले; त्यांच्या स्त्रिया मैनाबाई व सुंदाबाई यास विटेगांव अन्नवस्त्रा करतां देऊन तेथें ठेविल्या होत्या.

जगजीवन पंडीत मेल्या वर कृष्णाजी परशुराम यांचा नातू श्रीनिवास गंगाधर हा वडील घराण्यांतील झणून शके १६७३ सन १७५१ या वर्षीं मरणराजे यांणीं श्रीनिवास यांस पदाचा अधिकार दिला व वस्त्रें ही दिलीं त्यांणीं शके १६८४ सन १७६२ पर्यंत ती पदवी चालविली यांस मानराव असें ही झणत.

पुढें पानपतचे लढायींत सदाशिवराव भाउ पेशवे पडले, व बाळाजीपंतनाना पेशवे हे क्षयरोगानें पर्वतीस मरण पावले;

मग माधवराव बल्लाळ लहान, या मुळें सर्व कारभार राघोबा दादा यांज कडे आला, तेव्हांत्यां चे कृपेंनील नारोशंकर राजेबहादर यांस त्यांणीं मनिनिधी पदाचीं वस्त्रें महाराजा कडून देवविलीं आणि भवानराव यांस काढून टाकिलें, ही पदवी राजेबहादर यांणीं एक वर्ष भोगली.

नारोशंकर यांणीं राजश्री गोपाळराव मिर जकर यांशीं लढून मिरज घेतली, तेव्हां भवानरा व व गोपाळराव हे बंड करीत करीत हैदराबादस गेले, त्यांचे बरोबर गमाजीयमाजी मुताली क होते, हे "निजामाचे दिवाण राजश्री विठ्ठल सुंदर यांचे व्याही" या मुळें त्यांणीं त्यांचा पक्षध रून फौजे सह पेशव्या बरोबर ते लढण्यास आ ले, राक्षस भुवना वर यांची व त्यांची लढायी हो न पेशव्यानीं त्यांचा पराभव केला, परंतु मिर जकर व भवानराव यांची समजूत करून त्यांस प रत आणलें, आणि त्यास (भवानराव यांस) पु

ह्मा मतिनिधी ही पदवी दिली. पुढें पेशवे सरकारचा आग्रह पडला कीं प्रतिनिधीनीं पुण्यास राहावें; ती गोष्ट भवानराव यांणी केली नाहीं; ह्मणून कृष्णराव यांचा दुसरा नातू भगवंतराव त्रिंबकयांस प्रतिनिधीचीं वस्त्रें देऊन पुण्यांत ठेविले पुढें भवानराव राजी झाल्या वरून शके १६९० सन १७६८ या वर्षी पुन्हा भवानराव यांस पदवी वस्त्रे दिली, आणि भगवंतराव यांज कडे खानापूर व गौरे जाहागिर ठेवली, भवानराव व भगवंतरावया उभयतांच्या नेहमी खानापूर भांती लढाया होत या मुळें पेशव्यानीं त्यांस कांहीं जहागिर देऊन निराळेंच ठेविलें.

भगवंतराव शके १६९७ सन १७७५ या सालीं मरण पावले, त्यांच्या स्त्रिया, राजसबाई व सकवार बाई यांस दहा हजार रुपये नेमणूक करून विटें एथें ठेविल्या.

सदरहू प्रमाणें भवानराव यांणीं शके १६९० सन १७६८ पासून पदवीचा निर्वेधपणें उपभोग केला, पुढें नारायणराव पेशवे यांस राघोबादादानीं ठार मारलें, तेव्हां हे नानाफडणवीस

यांस मिळाले, या कारणा मुळें त्यांचे बस्तान चांगलें बसलें.

पुढें हे तारीख ३१ आगष्ट सन १७७७ इ. के १६९९ या वर्षी मरण पावले, तेव्हां त्यांच्यामागे या यमुनाबाई व काशीबाई अशा दोन होत्या त्या पैकीं काशीबाई ही मतार वारले, त्याचदि वशी प्रसूत होऊन तिला पुत्र झाला, त्या पु त्राचें नाव परशुराम पंडित असें ठेविलें; आ णि त्याजला महाराजांनी वस्त्रें पाववून दिलीं

त्या वेळेस नानाफडणीसानीं कृष्णारावजो शी सातारकर यांस कारभारी नेमून बंदोबस्त ठेविला

हे परशुराम पंडित खडर्याचे लढायींत हो ते; पुढें नानाफडणवीस यांची कारकीर्द सरली व कारभारी ठरले, आणि खासेप्रतिनिधी मु कल्यार झाले; इकडे पुण्यास बाजिराव गादी वर आले.

परशुरामपंडित हे फार दुरवृत निघाले; यां नें आईशीं व बायकोशीं फार वैर पडलें; रमाने बाई हिजला जवळ ठेऊन रामोशीलोक चो करीस ठेविले होते; मुलखात दंगेदरवडे घाल

ण्यास आरंभ केला. आईनें व तिचे कारभारी बळवंतराव फडणीस याणीं बहूत उपाय केले परंतु त्यांचे नें व्यसन जाईना. मांग फार प्यावी मुलुख लुटून पैसा काढावा. वाटा माराव्या. मा सांचे नाकांत व कानांत दारू घालून माण सें मारावीं. अशीं दुष्टकर्मे चालविली. हलक्या मागासें जवळ असून गवई व तमासगीर या लोकांत सर्व काळ बसावें, त्यांच्या स्त्रिया लग्न मी बाई व रमाबाई ह्या पळून जाऊन विठ्ठलाच्या गडा वर राहिल्या. शेवटीं बाजीरावप्रधानया जकडे आईनें बोभाट नेल्यावर बाजीगणेश गोरवले यास बंदोबस्ता करतां नेमिले: त्यां फौजे सध्दां जाऊन मस्करेस परशुराम पंडी त याशीं लढायी केली; तींत पंडीत यांचा हात तुटून त्यांस गोरवले यांणीं कैद करून पुण्य स आणून ठेविलें.

पुढें त्यांची नाटकशाळा "रमातेलीण" णें दंगा करून वासोटा किल्ला लढविला. वटीं तिला ही कैद करून पुण्यांत आणून

विलें. तेव्हां प्रतिनिधीचा सर्व मुलुख जप्त झा
ला, पैकीं म्हसवड वगैरे गोरवले यांस दिला व
काहीं पेशवे सरकारांत घेतला. या प्रमाणें रा
के १७२९ सन १८०७ यात झालें.

प्रतिनिधी कडे तीन हजार स्वाराचें परक हो
तें. यांज कडे पुष्कळ किल्ले होते. सर्व मिळून अ
ठरा लक्षांचा मुलूरव होता, "हल्लीचा सगळा सा
तारा जिल्हा हा पंतप्रतिनिधी यांज कडे होता"
दरमहालांत शेंकडा निमे असे प्रतिनिधी घे-
त असत. किनीएक महाल होते त्यांत प्रतिनि-
धीचे हिश्शास जिल्हेबाब असें नाव आहे. बा
की राहिलें त्यास हुजूरमामला ही नांवें अद्या
प चालत आहेत.

## प्रतिनिधी कडील मुख्य किल्ल्या
## ची नांवें.

| | | |
|---|---|---|
| १ व्याघ्र गड. | १ सुंदरगड. | १ मनापगड. |
| १ नांदगिरी (कल्याणगड | १ मकरंदगड. | १ महिपतगड |
| १ वसंतगड. | १ भूषणगड. | १ वर्धन गड. |
| | १ गहनगड. | १ सज्जन गड. |

| | | |
|---|---|---|
| १ अजळामनमो | १ मोरगिरी(गु | १ जंगली जय- |
| १ हनगड. | णवंतगड) | गड. |
| १ महिमानगड | १ गंभिरगड. | १ महिमदनगड |
| १ मचिंद्रगड. | १ वारुगड. | १ सूपेणा गड. |
| १ अवचितगड | १ वहिरवगड. | |
| १ संतोषगड. | १ मंगळगड. | |

## प्रतिनिधीकडे महालहो-तैंते.

| | | |
|---|---|---|
| १ कर्यात विटें. | १ कर्यात निम | १ रुमा वाई. |
| १ रुमा सातारा | सोळ. | १ प्रांत खटाव. |
| १ रुमा कऱ्हाड | १ हवेली विजा | तर्फ किन्हई. |
| १ कर्यात भोंद. | पूर. | १ रुळी, बुंदेलखं |
| १ तर्फ कोळें. | १ कर्यात कासे | डांत. |
| १ कर्यात भालव | गांव.. | १ तर्फ वारुणा. |
| णी. | १ रुमाजावली | १ कर्यात आव |
| १ कर्यात नाजरें | १ नरसिंहगड. | पडी. |
| १ बागेवाडी. | १ कर्यात वेलापूर | १ खानापूर. |

या शिवाय उत्तर हिंदुस्थानांतकाहीं गांव होतं

पुढें सन १८१२ शके १७३४ यांत बाजीराव प्र
धान याणीं असें ठरविलें कीं, प्रतिनिधीनी परत
कऱ्हा डास जावें, आणि त्यास दोनलक्षाचा मु
लुख माच द्यावा, मग वाईटसाईट गांव देऊन
भरती केली, ती अशी:-

१५ कऱ्हाड पैकीं चौदागांव व अम्मल.
१५ कर्यात औंद पैकीं चौदागाव व अम्मल
१ बाबती विजापूर पैकीं.

---

इलक्याचा वसूल हल्लीं साठसत्तर हजार रु
पये येत आहे.

या प्रमाणें सरंजाम मिळाल्या वर प्रतिनिधी
पुन्हां परत कऱ्हाडास गेले, परंतु त्याचे वृत्ती
ची सुधारणा नहोतां, तसाच घोळ चाललाहोता, पुढें सन १८१८ शके १७३९।४० सालीं
पेशव्याचे राज्य बुडालें, तेव्हां प्रतिनिधी यां
स सातारचे छत्रपति यांचे निसबती कडे नेमू
नदिले, तेव्हां पासून त्या पुरुषाची गडबड रा
हिली, व इंग्लिश सरकाराचे धाकानें गरीबी
नें वागत असत, तथापि मरे पावेतों त्यांणीं

स्त्रियांची भेट घेतली नाहीं.

तारीख १० माहे मे सन १८४८ शके १७७० वैशाख शुद्ध अष्टमी या वर्षी परशराम पंडीत मरण पावले. तेव्हां त्यांचे भाऊ बंदा पैकीं एक मुलगा दत्त दिला. तो छत्रपति व इंग्लिश सरकारानें मान्य केला; आणि यांजलाशा हाजीराजे आपासाहेब यांणीं पदाचीं वस्त्रें पाठवून दिलीं. त्याचें नांव श्रीनिवास पंडीत हे हल्लीं गादीवर आहेत.

यांचे कारकीर्दित कांहीं दुअमली गाव होते ते सरकारांत घेतले. आणि मुबदला दिलेया खेरिज कांहीं लिहिण्या जोगें झालें नाहीं. यांस स्त्रिया दोन आहेत.

श्रीनिवास पंडित यांजला दोन पुत्ररत्नें आहेत; त्यांत एक पुत्राचें वय सुमारें सहावर्षांचे आहे; या वरून त्या पुत्राचा जन्म शके १७७९।८० सन १८५७ या वर्षी असावा. याचा व्रतबंध सालमजकुरीं झाला. ९ सन १८६४ शके १७८५ फालगून मासीं.

दुसरा धाकटा एक मुलगा आहे; त्यांचा

जन्म शके १७८३ या वर्षी झाला. असावा. या खेरिज यांजला एक मुलगी आहे.

या प्रमाणें यांजला संतति व संपत्ति अनुकूल आहे, यांचे पिढीजाद भवानीदेवीचा उछाह करण्याचा प्रघात आहे, हा उछाह अश्विनमासीं होत असतो.

सन १८६२ इसवी शके १७८४ या वर्षी श्रीमंत श्रीनिवास पंडित यास "जेव्हां प्रसंग पडेल तेव्हां त्यांणीं व त्याचे दौलत चालविणारे संतलीस दत्त घेण्याची परवानगी आहे म्हणून" कलकत्त्याचे गवरनरजनरल व्हॉयस्राय लॉर्ड क्यानिंग यांणीं सनद पाठविली, ती आदरपूर्वक प्रतिनिधी साहेबानीं स्विकारली.

श्रीनिवास पंडीत सुशील आणि सदाचार संपन्न आहेत.

यांस सर्व शक्तिमान् जो इश्वर यांचे इ छेनें पुत्र रत्नें आहेत, व दौलत मान झाली आहे, यांणीं आपले पुत्रास उत्तम विद्याभ्यास व निती प्रवीण करावें, कीं त्यांजला विद्ये-

ं हल्लींचे राज्य करते यांज पासून मोठा
धिकार प्राप्त होईल; आणि ते प्रजेचें पालण
थान्याय करतील.

# समाप्त.

# भागबारावा.

## सातारचे छत्रपति महाराजयांचे मुख्यप्रधान पेशवे, (अष्टप्रधानांतील पहिले.) यांचा संक्षिप्त इतिहास.

श्रीमंत शिवाजीमहाराज छत्रपति यांणीं मराठी राज्याची स्थापना केली तेव्हां प्रथम मावळे लोक व मराठेलोक व मानकरी वगैरे पुष्कळ चांगलीं माणसें जमवून मुलुख व किल्ले काबीज केले. त्यांत शके १५७८ सन १६५६ इसवीचे सुमारास कोयनानदीचे कांठीं जो शिवाजीनीं मुलुख घेतला होता त्याचे संरक्षणा साठीं "त्या वेळेस शिवाजीचे लश्करांत त्याचे प्रभुत्वाचा-कारकून श्यामराजनिळकंठ रांजेकर या नावाचा होता, त्यास पेशवे पद देऊन फौजेची सरदारी दिली." आणि ठेविलें.

नंतर शके १५८० सन १६५८ चे सुमारास कोकणपट्टी घेण्या करतां शिवाजीनी शामराज पंत पेशवे यांस पाठविलें त्यांज बरोबर फ जे खान हाणून मोंगलांचा सरदार होता त्याणें लढायी करून पेशव्यांचा पराभव केला.

हें वर्तमान ऐकून शिवाजीचे लश्करांत मोरो त्रिंबक पिंगळे फार चतुर व शूर होते त्यांजलाच शिवे पदाचा अधिकार देऊन शामराज पंत याज कडून तें पद काढलें मोरोपंत यांस शिवाजीनीं पायदळाचा सरदार केलाहोता

शके १५८४ सन १६६२ ईसवीस पायदळा चे सरदार पिंगळे याणीं जुनराचे उत्तरेकडील कितीएक मुलुख घेतला.

शके १५८९ सन १६६७ ईसवी सालीं शिवा जी दिल्लीस गेले तेव्हां पाठीमागें मुलकाचा स र्व बंदोबस्त ठेवण्यास मोरोत्रिंबक पिंगळे पे श वे व आनाजी दत्तो व आबाजी सोनदेव यांस मु ख्य ठेविले होते

शके १५९० सन १६६८ इसवीचे सुमारास शिवाजीनी काहीं नव कायदे करून मुलकाचा

व फौजेचा बदोबस्त केला नंतर मोरोपंत पिंगळे पेशवे यांणी सर्व चौकडी करावी असें ठरविलें.

मग शके १५९१ सन १६६९ चे सुमारास औरंगजेब बादशाहा कडून दक्षिणेंत मोहबतखान मोठी फौज घेऊन आले त्याचा पराजय मानाजी राव गुजर व मोरोत्रिंबक पिंगळे पेशवे यांणी केला.

पुढें शके १५९६ सन १६७४ या वर्षी शिवाजी महाराजास राज्याभिषेक झाला तेव्हां अष्टप्रधानाची नांवें संस्कृत भाषेत ठेविलीं, त्यांत पेशवे यास मुख्य प्रधान असें नांव दिलें.

या नंतर शके १६०२ सन १६८० या वर्षी शिवाजी महाराज कैलासवासी झाले. पाठीमागें आनाजी दत्तो सचीव व मोरोत्रिंबक पिंगळे या उभयतांचे परस्पर वैमनस्य आलें, नंतर संभाजी महाराज तक्ताधिपति झाल्या वर त्यांणीं आपला मुख्य कारभारी कलुसा (कनुजा ब्राह्मण होता.) त्यास केलें आणि मोरोत्रिंबक पिंगळे यांस कैदेंत ठेविलें.

शके १६३० सन १७०८ इसवी या वर्षी शाहू महाराज तक्काधिपति झाले, तेव्हां त्यांणीं मोरो त्रिंबक यांचे चिरंजीव बहिरो मोरेश्वर यांस प्र धान केलें.

धनाजीजाधव सेनापति यांचे पदरीं बाळाजी विश्वनाथभट चौलप्रांतांतील श्रीवर्धन गांवचेरा हणारे हे कारकुनीचे कामा वर होते. त्यांजवरजा धवराव यांची मर्जी असून ते कामकाजांत वि श्वासू व फार हुशार होते.

धनाजीजाधव वारणा नदीचे काठीं आजारी होऊन मृत्यु पावले, तेव्हां त्याचें पद त्यांचे चिरंजी व चंद्रसेनरावजाधव यांस शाहूमहाराजानीं दि लें. परंतु अधिकार बाळाजिविश्वनाथ संभा ळू लागले: या मुळें चंद्रसेनराव बाळाजिविश्वना थ यांचा द्वेष करूंलागले.

शके १६३० सन १७०८ ईसवीचे सुमारा स शाहूराजानें आपले फौजेच्या दोन टोळ्या केल्या; एक, बहिरोपंत पिंगळे पेशवे प्रधानयां ज बरोबर देऊन त्यांस कोकण परगणेयांत कल्या णांत रक्षण करण्यास सांगितलें; आणि

दुसरी तोळी बाळाजिविश्वनाथ ( सेनापतिजा धव यांचे कारकून ) यांज बरोबर देऊन शंभूम हादेव डोंगरा कडे मोंगला कडील कृष्णाव रा जा खटावकर बंड करून उपद्रव करीत होता त्यांचे बंदोबस्तास पाठविलें, त्यांज बरोबर प्र रामत्रिंबक प्रतिनिधी यांचा तिसरा पुत्र भी पतराव हाही होता.

या दोनी लढ्याचे अधिकाऱ्यापेकीं बाळा जिविश्वनाथ यांणीं मोठा पराक्रम करून कृष्ण रावराजा धरून आणला, व बंदोबस्त केला. व बहिरोपंत पिंगळे पेशवे यांणीं आंगरे यांजबरो बर लढाई केली; त्या लढायींत आंगरे याणीपे शवे यांस धरून कैदेंत ठेविलें.

नंतर आंगरे यांचे पराभवासाठीं बाळाजि विश्वनाथ यांस शाहूराजाने पाठविलें, तेव्हां त्यांणीं कोकणांत जाउन आंगरे याशीं तह क रून बहिरोपंत पिंगळे पेशवे यांस सोडवून आ णलें.

या प्रकारें जय मिळवून बाळाजिविश्वना थ आले; तेव्हां शके १६३० सन १७०८ यावर्षी

त्यांजला पेशवे ( मुख्य प्रधान ) पदाचा अधिकार शाहुराजानें दिला, आणि बहिरो मोरेश्वर यांज कडून अधिकार काढला, तेव्हां ते आपले घरीं बसले, त्यांज कडे प्रतापगड एथील देवीचे संस्थानचें काम मात्र होतें, तें अद्याप त्यांचे वंशा कडे आहे.

बाळाजिविश्वनाथ यांस पेशवेपणाचा अधिकार दिला, तेव्हां आवाजी पुरंदरे मुतालिक व रामचंद्रपंत भानु फडणवीस हुजुरून नेमून दिले.

मग मोंगलाचा सरदार "बाजीम" पुण्यास आलाहोता, त्यांचा बाळाजिविश्वनाथ यांणीं पराभव करून पुणें परगणा घेतला तेव्हा पासून बाळाजि विश्वनाथ यांचे प्राबल्य फार वृध्दिस पावलें.

पेशवे याणीं सर्व फौजेचा व मुलकाचा बंदोबस्त करावा, दुसरे प्रधान व दरकदार यांस घेऊन कारभार करावा. असें या पेशव्यांचें (मुख्यप्रधानाचे) महाराज सरकारान काम आहे.

राजपत्रावर पेशवे यांची निशाणी "कोनाड्यां त शिक्का व चिकट बंदावर मोर्तबें होत असत.

महाराजानीं पेशवे यांस पत्र लिहिणें, तर मथम "राजश्री बाळाजि विश्वनाथ पंडित" असें लिहून शेवटीं "बहुत काय लिहिणें सूज्ञ असा" असें लिहिण्याची चाल होती.

पेशवे यांस महाराजा कडुन पदाधिकारा चीं वस्त्रें व जवाहिर व नग वगैरे द्यावयाचे ते,

१ प्रथम भेटीसमयीं चादर . .

पदाचीं वस्त्रें.

१ मंदील, १ चादर बादली.
१ जामेवार १ किनखाप.
१ पटका.

एकूण पांच, मिळावयाची.

१ शिकेकटार.
१ शस्त्रें; तलवार, एक; ढाल एक.
१ जरीपटका.
१ चौघडा
१ हत्ती नग तीन.

१ घोडा एक.
१ जवाहिर, दागिने पांच.
१ शिरपेंच.
१ झगा.
१ कंठी मोत्याची.
१ तुरा मोत्यांचा.
१ चौ कडा मोत्यांचा.

---

१ चौरी सोन्याचे दांडीची.
१ कलमदान.

---

या प्रमाणें देण्याची चालहोती

बाळाजि विश्वनाथ याणें च पुढें त्याचे वंशज यांणीं मोठ मोठे पराक्रम करून फार विख्यात झाले, च त्याचे पदरीं "शिंदे" होळकर, गायक वाड, भोसले, असे मोठे सरदार उदयास आले आणि स्वतंत्र राज्य स्थापिलें. त्या सरदारा सह पेशव्याचा इतिहास तारीख वार छापला तर स्वतंत्र मोठें एक पुस्तक होईल, आणि तसा इतिहास (मराठे याचें बखरेंत) आहेच, तितकी स

र्व हा फकत या लहानमे पुस्तकांत घेण्याचा
इरादा नाहीं आणि जरूर व सवड ही नाहीं; अ
गदीं रक्षिस रीतानें प्रधान यांचे कारकीर्दीत
मुख्य गोष्टी काय काय घडल्या, इतक्याचें व
र्तमान या पुस्तकांत घेऊन, पुढें बाळाजिवि-
श्वनाथ यांचे कारकीर्दी पासून लिहिलें आहे

## कारकीर्द बाळाजिविश्वनाथपे-
## शवे (मुख्यप्रधान) यांची.

बाळाजिविश्वनाथ यांस पेशवेपदवी दि
ल्या वर यांचे मित्र त्या वेळेस धनाजिसेना
पति खांजवळ कारकुनीचे कामा वर होते;
त्यांजला पेशवे यांची मुतालकी दिली. व रा
मचंद्रपंत यांस फडणिशी दिली. हे दोन द
रु हुजूरून नेमिले. — पेशवे यांणीं मोठ मो
ठ पराक्रम केले, त्याचा विस्तार आहे, त्यांत मु
ख्यकारण एक असें आहे कीं, त्यांणीं फौजेसह
दिल्लीस जाऊन पातशाहा कडून शाहू करतां द
क्षण देशांतील स्वराज्य, चौथाई वसरदेशमुखी

च्या वगैरे सनदा घेऊन आले तो प्रकार विस्तार पूर्वक शाहूमहाराजाचे कारकीर्दीत लिहिला च आहे.

पुढें कांहीं दिवसानीं बाळाजि विश्वनाथ यांस शके १६४२ सन १७२० ईसवी या वर्षी देवाज्ञा झाली. तो पर्यंत त्यांची कारकीर्द सहा वर्षे वागली त्यांस दोन पुत्र होते, त्यांत वडील बाजीराव आणि धाकटे चिमणाजी आपा होते.

# कारकीर्द दुसरी
# बाजिरावबल्लाळ पेशवे
# वे यांची.

बाजिराव बल्लाळ यांस शाहूमहाराजानी शके १६४२ सन १७२० या वर्षी पेशवेपणाची पदवी दिली.

या बाजीराव पेशव्यानीं मोठ मोठया लढाया करून फार पराक्रम केला; त्यांतून एक लढाई बडोद्यासवळ त्रिंबकराव दाभाडे सेनापतियांशीं करून त्यांस ठार मारून जय मिळविला; व आणखी त्यांणीं नबाबसरकाराशीं दोन लढाया करून त्याज पासून पाहिजे तसा करार करून घेतला; आणि फौजेसह हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून खंडण्या घेतल्या.

दिल्लीच्या बादशाहा पासून गुजराथ आणि माळवा या दोन प्रांतांनील सरदेशमुखी व चौथाई संपादन केली; व निजामउल्मुलुख याचा असा पराभवकेलाकीत्याजला माळवा प्रांत सोडून देणें प्राप्त झालें.

या पेशव्याचें कारकीर्दीत होळकर, शिंदे, गायकवाड हे तिघे सरदार उत्कर्ष पावले; व पर सोजी भोसले यांचे वंशातील रघोजी भोसले यास सेनासाहेब सुभा ही पदवी दिली. व वराड प्रांतील नागपूर संस्थान दिलें

बाजीराव बल्लाळ यांचे धाकटे बंधू चिमणाजी आपा हे फार शूर असून त्यांणीं आपले बंधूस लढायीचे वगैरे कामांत बहुत मदत देऊन फार उपयोगी पडले होते; व पोर्तुगाल देशाचे लोकांशीं कांच्या स्वाधीन साष्टी बेट होतें, तें त्या लोकांशीं

युध्द करून घेतलें, या मुळें चिमणाजीआपा यांची फार कीर्ती झाली, ते चिमाजीआपा बा जिराव यांचे पश्चात् शके १६६३ सन १७४१ या वर्षी मृत्यु पावले. त्यांस एक पुत्र होता, त्या चें नांव स दाशिव चिमणाजी होतें.

बाजीराव पेशवे मोठे शूर असून युध्दाचे का मांत फार कुशल व रूपानें फार उत्तम होते, त्यास पुत्र तीन होते. त्यांत वडील बाळाजिबा जीराव त्यांस लोक नानासाहेब ह्मणत होते दुसरे रघुनाथबाजी, तिसरे, जनार्दन बाबा- होते,ते, लहानपणीच मृत्यु पावले;

बाजिराव बल्लाळ यांस शके १६६३ सन १७४० या वर्षी देवाज्ञा झाली, तों पर्यंत त्या ची कारकीर्द वीस वर्षे वागली.

---

## कारकीर्दतिसरी.

## बाळाजिबाजिराव उर्फ नाना साहेब पेशवे यांची.

बाळाजिबाजीराव पेशवे यांस शके १६६३

सन १७४० इसवी या वर्षी पेशवे पदवी शाहूमहाराज याणीं दिली.

पुढें शके १७६१ सन १७४९ इसवीस शाहूमहाराज मरण पावले, तेव्हां रामराजे सातारचे गादी वर बसले. त्या वेळेस पेशवे-याणीं राजमंडळ तोडून सर्व राज्यकारभार आपण करूं लागले.

या पेशव्याचे कारकीर्दीत फोजेचें काम बाजिराव बल्लाळ यांचे धाकटे बंधु रघुनाथराव यांज कडे होतें, आणि राज्यकीय संपूर्ण काम त्यांचे चुलत बंधु सदाशिव चिमणाजी उर्फ भाऊ साहेब यांज कडे होते.

या पेशव्याची राज्यकीयकामांत फारच बराई होती. यांचे कारकीर्दित सदाशिवराव व चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब यांणीं मुलकाचा बंदोबस्त करण्यास रामचंद्र बाबा शेणवी या सं नेमलें होतें, त्यांणीं तो बंदोबस्त उत्तम प्रकारचा ठेविलाहोता, तो असा कीं, शिवाजी महाराज यांचे पश्चात् जी अव्यवस्था झाली होती, ती मोडून टाकून सुधारणुक चांगले प्रकारें केली.

यांचे कारकीर्दीत हिंदुस्थानांत तीनस्वा-

-या मोठ्या झाल्या. त्यांत दोन स्वाऱ्या रघुनाथ राव यांणीं केल्या. त्यांतून दुसरे स्वारीचे वेळेस पं जाब एथें जाऊन गीलच्या सरदार घालवून दे ऊन आपला अमल बसविला. आणि वसूल क रण्यास शिंदे व होळकर यांज कडील लोक दे विले;

तिसरी स्वारी अहमदशाहा अबदाली यां ज वर बाळाजिबाजीराव यांचे पुत्र विश्वासरा व व चुलतबंधु सदाशिवराव चिमणाजीयाउ मयतानीं केली; तेव्हां त्याणी आपले बरोबरहो ळकर व शिंदे व गायकवाड वगैरे पुष्कळ स रदार नेलेहोते; त्या वेळेस एकंदर फौजपंचाव नहजार स्वार व दोनशें तोफा व पायदळ पंध राहजार व बाजारबुणगें दोनलक्ष या प्रमाणें जमाव होता; तो थाट असा होता की, अवरंग जेब बादशाहाचे कारकीर्दी पासून असा क धी ही कोणी पाहिला नाहीं. त्यांचे शाबूची ही अशी च फौज होती. परंतु पायदळ कांहीं अधिक व स्वार कांहीं कमी होते; ही लढायी सोनपतपान पतची म्हणोन प्रख्यात आहे, ही लढायी रा के १६८३ सन १७६१ या वर्षी झाली; त्या वे ळेस पेशव्याचे फौजेंत धान्यादि सामुग्रीचा तोटा पडल्या मुळें त्या लढायींत पेशव्यांचा मो

ड होउन सुमारें दोन लक्ष माणसें मेली, विश्व
सराव पेशवे यांस असाध्य जखम लागून पडले
हें वर्तमान भाऊसाहेब यांस कळतांच हत्ती वरून
घोड्यां वर बसून लढायींत शिरले, ते पुन्हां दृष्टी
स पडलेनाहींत; गोविंदपंत बुंदेले व गणपतरा
व मेहेंदळे हे रणभूमीवर ठार मारले गेले, जन
कोजी शिंदे व पेशव्यांचे पायदळाचा सरदार इ
माईमरवान गारदी या दोघांस शत्रूनीं धरून ने
ऊन ठार मारले; मेल्हारराव होळकर व दमाजी
गायकवाड व विठ्ठल शिवदेव विंचूरकर व राजे
बहादर व नानाफडणवीस हे पळून माघारे आले
त्या लढायींत जे लोक मेले, त्यांच्या शोकानें सं
पूर्ण दक्षिणदेश व्यापून गेला; शत्रू, गिलच्या
पांणीं क्रूरत्व असें केलें कीं, जीं माणसें पळणीत
सांपडलीं, त्यांतून बायका व मुलें खेरिज करूनस
र्वांस मारून टांकलें, आणि बायकांस बटकीवमु
लांस गुलाम करून ठेविलें

या लढायीचें दुःखकारक वर्तमान बाळाजि
बाजीराव पेशवे यांणीं ऐकल्या वर फार दुःखणा-
त झालेहोते. यांचे कारकीर्दीत मराठीराज्याचा

उत्कर्ष झाला होता, त्यांचा या लहानपणीं फार नाश झाला; त्यांची पूर्व स्थिति होण्यास फार दिवस लागले.

या पेशाव्यास दोन पुत्र होते; त्यांत वडील ल माधवराव बल्लाळ आणि धाकटे नारायण राव बल्लाळ

बाळाजि बाजीराव पेशवे सन १७६१ शके १६८३ या वर्षी मरण पावले. त्यांची कारकी र्द एकवीस वर्षे वागली.

## कारकीर्द ४ थी.

## माधवराव बल्लाळ पेशवे यांची.

या माधवराव बल्लाळ पेशवे यांस शके १६८३ सन १७६१ इसवी वर्षी पेशवेपदाचा अधिकार रामराजे महाराज याणीं दिला.

या पेशाव्याचें धैर्य आणि खरेपणा हे दोन गुण मोठे होते. त्यांणीं रयतेस पीडा देणा व वाईट आचरणाने वागणारे लोकांस शास न करून गरीबलोकांचें संरक्षण चांगलें के

लें. आणि राज्यकारभार जानीचे भकलेनें य थास्थित चालविला होता.

या पेशाव्याचें शूरत्व आणि राज्य करणे विषयीं कुशालत्व फार होते. आणि यांचे चु लते रघुनाथराव दादा हे फार शूर होते, परंतु राज्यकीय कामांत अगदीं उपयोगी नव्हते; व पेशावाईची गादी आपणास प्राप्त व्हावी, अ शी यांची इच्छा फार होती, या मुळें त्यांचें भा णि माधवराव याचें फार वैमनस्य पडुन रा घोबा दादास कैद करून ठेविलें होतें.

या पेशाव्याचे कारकीर्दीत कारभारी स वा राम बापू वगैरे होते; त्यांतून पुढें बाळा- जी जनार्दन भानू उर्फ नाना फडणीस हे फा र प्र[illegible]

या माधवराव बल्लाळ पेशाव्यास क्षयरो ग लागून थेऊर गांवीं शके १६९४ सन १७७२ या वर्षी मरण पावले; त्यांस औरस पुत्र नव्ह ता. यांचे मरण काळीं शिंदे, होळकर, गायक वाड वगैरे सर्व सरदार एकंदर कमाल आकार दहा कोटी रुपयांचा मुलूख होता; व वसूल सा॥ कोटी रुपयांचा मुलुख होता.

# कारकीर्द पांचवी.

# नारायणरावबल्लाळपेशवे

# यांची.

या नारायणरावास शके १६९४ सन १७७२ इसवीस त्यांचे बंधु मरण पावल्या वर पेशवेपद वीचीं वस्त्रें रामराजेमहाराज याचे हातून झालीं

यांस वस्त्रें झालीं, तेव्हां सरकारांतून बजाबा पुरंदरे दिवाण व बाळाजिजनार्दन उर्फ नानाफडणवीस हे दोन दरकदार होते. ते कायम केले.

या पेशव्यानीं अधिकार आठ महिने केला. म ग त्याचे चुलते राघोबादादा यानीं मारेकरी गार्दी याचे हातून त्याजला ठार मारविलें. आणि आ पण पेशवाईचे गादीवर बसले. त्यास ही साता-र्‍या हून वस्त्रें झालीं, त्या वेळेस संपूर्ण कारभा-री लोकांच्या मनांत संशय उत्पन्न होऊन त्यास गादी वरून काढून टाकण्याचा यत्न केला.

# कारकीर्द सहावी.

# माधवराव नारायण उर्फ सवाई माध वराव पेशवे यांची.

या पेशव्याचे तीर्थरूप नारायणराव होते

ब मरण पावले, तेव्हां त्यांचे वय अठरा वर्षांचें होतें, त्यांची स्त्री गंगाबाई गरोदर होती. ती कार भारी लोकांनीं पुरंदर किल्ल्या वर नेउन ठेविली- होती ती तेथें प्रसूत होऊन पुत्र झाला, त्याचेंना व सवाई माधवराव ठेविलें.

मग त्या मुलास चाळीसावे दिवशीं साता- ऱ्याहून रामराजे महाराज याज पासून वस्त्रें आ णून पेशवाईचे गादीवर स्थापिलें आणि संपूर्ण राज्याचा कारभार आपण नानाफडणवीस करू लागले.

पुढें राघोबादादा यांणीं आपल्यास अनुकू ल करून घेण्याविषयीं इंग्लिश लोकां कडे जाऊ न पुष्कळ यत्न केला. परंतु साध्य झाला नाहींनं तर कोपरगांवी जाऊन राहिले; त्यांस दोन पुत्र होतें;

मग शके १७०६ सन १७८४ या वर्षी रा घोबा दादास कोपरगावीं देवाज्ञा झाली. त्यांचे दो न पुत्रांपैकीं वडील बाजिराव, आणि धाकटे चि- माजी आपा, व तिसरे अमृतराव साहेब नामें दत्त पुत्र होते.

नानाफडणीस कारभार करीत होते. त्या वेळेस त्यांचे हातारवाली हरिपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन मिरजकर हे दोघे फौजचेमुख्य सरदार असून हरएक कामात मोठी मदत देत होते.

या पेशव्याचे कारकीर्दीत मोठ्या लढाया तीन झाल्या, त्यांत प्रथम मोरोबादादा फडणवीस याणें राघोबादादास पेशवाईची गादीमिळण्या साठीं मुंबईहून इंग्लिशांस बोलाविले. त्यांची व पेशव्यांची लढायी तीन वर्षे चालली होती; परंतु शेवटीं इंग्लिशांचा पराभव होऊन माघारे आले, पुढें सल्ला झाला.

दुसरी लढायी शके १७१४ सन १७९२ इं. चे सुमारास महादजि शिंदे यांणीं उत्तर हिंदुस्थानांत फार मोठी करून दिल्ली कडे गुलाम कादर व हैदर बरखत यांचा पराभव करून त्यांस ठार मारलें, आणि दिल्लीचा पातशाहा शाहा अलम यास पुन्हा गादीवर बसविलें.

ही लढायी बरेच दिवस चालली होती आणि शिंदे यास पेशव्याकडून होलकर व अलि

बाहदर मदत करण्या करतां फौज घेऊन ति कडे गेले होते.

या लढायीचा शेवट वर लिहिल्या प्रमा णें झाल्या वर शाहा अलम बादशाहा याणें माधवराव नारायण प्रधान यांस मुतालकीची वस्त्रें व नालकी व सन्मान व खलिता असेव दुसरे किनी एक सामान शिंदे याज बरो ब र देऊन पाठविलें.

हें घेऊन शिंदे पुण्यास आल्या वर रा जराजे महाराज यांची आज्ञा आणून मग मुतालकीचीं वस्त्रें व नालकी वगैरे दिल्लीहून आलेलीं मोठा दरबार करून तीं माधवरा व नारायण यांणीं घेतलीं.

या माधवराव नारायणास दिल्लीहून बादशाहा कडून पत्र आलें, त्यांत किला ब लिहिला होता, तो असा;-

( या मध्यें मोठे अक्षरानें लिहिले ले शब्द फारशी भाषेचे आहेत, व त्यांज वरी-ल आरिक अक्षरानें लिहिलेले शब्द त्यां चें मराठींत भाषांतर होय.

मानकरी परंतु वजिरा सारखे. आणि संपत्ती.
अमारत. व अयाल
पदाधिकार से ना. आणि. ऐश्वर्य.
त. मर्त्तबात हषमत व बौकत
अधिकारी व स्थान सार मिश्रता. चिन्ह
मंजिलत. जुबदय विफके. षान.
डौल संपत्ति इछिक. अतिउत्तम. कल्या
दौलत. खाह. उमदय खें.
ण. विचारकरणारे. नाहीं. संशय. वाद
र. अंदषानें. बिला. इषतिबाह. कस
विणार. विश्वास विश्वास चिन्ह.
रूल. इक्तिदार. अकिदत. दिसार.
दुधारी तलवार नग्न. रणभूमी. शोय
सईफे मसलुले मैदान. षुजात
माला शिकल केलेला म्हणजे सोज्वळ. रण
रुमदे. मसकुले. मिज
दन. श्रेष्ठता. मरवसा आसमतात
मार. जलादत मदार. असनाके
लक्षणें. मिश्रता. नानाप्रकारचे कृपा.
अवताफ. मोहोबत. अन्याये. अलता

पात्र. कृपा. छाया. वेष्ठित. कृपा.
मवरदे. इनायत. जिल्हे. मषमूल. भवातिफे
उत्तम.
न भिल्
स्वतंत्र कामगार देश. अतिवरिष्ठ अधिकारी
पकिले. मुलक. अमिरुल.
मानकरी. सर्व मानकरी वजिरा सारखे. स्वतंत्रका
उमरा. मुख-
मगार सर्व देश. विश्वासचे सर्वकामें संपत्ति
तारूल मुमालिक. मदारुल. मोहम. सलतन
अतिउत्तम. सर्वकामगारस्तंभरूप. राज्य.
उमदय. आराकिने. खिल्लाफत
मित्र. स्नेहभाव सिध्दिस नेणारा. सेना. अधिप-
पोर. वफादार. सिद्दह शिला.
स दैववान् जिवलग. मित्र स
सआदतमंद. बजान्ययवंद. फरजंदे
निश्चित केवल सरकारचे. उपायसूचक
खासुल खास. मेल्लाजदेह. महारा
धाधिराज पंडित परधान सवाई माधवरा
महापराक्रमी. सेवक. नांव आहे
नारायण बहादुर. शिल्हिय. सहाअन्न
सिंहासनाधिश्वा योध्दा.
पादशाहे गाजी.

# याचें मराठींत सरळ भाषांतर.

---

मानकरीपणा व संपत्तीचे अधिकारी मे
ना व संपत्तीचें स्थान, मित्रतेचे चिन्हानें चि-
न्हीतांतील केवळसार, राज्यअभिष्टचिंतक. नि:
संशयपणें कल्याण इच्छकांतील अतिउत्तम वि
श्वास वृध्दिकारक, भरंवशाचे चिन्ह आहे ज्या-
स, रणभूमींतील केवळ नग्न तलवार रणकंदना
तील महाशूरत्वाचे केवळ तीक्ष्ण धारेचा भाला
च. महाश्रेष्ठ, परम विश्वासू स्नेह भावाचे फल
स्वरूपाचा आसमंतात भाग, नानाप्रकारचें कृपा
पात्र. सर्व कृपा उतरण्याचें स्थान. कृपेचे छाये
नें जें वेष्ठित अतिसर्वोत्तम.

देशासंबधीं स्वतंत्र काम चालविणार स
र्व अमिराचे अमिर म्हणजे सर्व अधिकाऱ्यांचे प्र
मुख अधिकारी सर्व देशाचा स्वसत्तात्मकपणें
कारभार चालविणारे, दौलतीचे सर्वकामाचा
भरवसा आहे ज्यावर, राज्याधारांचे केवळ स्तंभ
च अशा सर्व कारभारी मंडळीतील अति सर्वो
त्तम स्नेहभाव सिद्धिस नेणारा सूत्रमित्र, सेना
ति सर्वेसर्वा केवळ जिवलग सरकारचे केवळ
सूचिन्हित पुत्र च, उपाय सूचक असे जे महा
राजाधिराज सवाई माधव राव पंडित प्रधान
महा यशस्वी हे गोरा अलम पातशाहा महा

योध्दा यांचे सेवक

असें अलकाबाचें पत्र व पोषाख वगैरे आले ने,—

## पोषाख.

१ दस्तार शिरबस्ता
१ निम अस्तनी.
१ चिरा.
१ कंबर बंद
१ दुशाला.
१ जामा.
१ चार कुबा.
१ शाकबंद.
१ दुमठा.

## नगावगैरे

१ समशेर
१ कलमदान.
२ मोर्च्यले
१ घोडा.
१ पालखी झालदार
१ ढाल. ( शीदर )
१ शिकेदऊत.
१ हत्ती.
१ नालकी.

## किल्ला मरातब.

१ अलमं मयहाती.
२ दुमल मयहती.
१ मरातब मयहती.
२ शागमय हती
१ माहिमयहती

# जवाहिरदागिने.

१ मोत्याची माळ पदक
१ शिरपेंच
१ झगा
१ कलगि तरा गिरी.

महादजि शिंदे यांस किताब "राजेमह
राज" महादजी शिंदे "मदारुलमोहम" ( स
कामांत श्रेष्ठ मरवशाचे ) या प्रमाणें-व
व जवाहिर हत्ती, घोडा, काहीं मरातिब
लकी, पालखी या प्रमाणें त्यांस हो नि
दिले.

या प्रमाणें दिल्लीहून आले; तेव्हां व
लिहिल्या प्रमाणें मोठा समारंभ करून पे
व्यानीं घेतले; मग पेशव्याचे आज्ञेनें महा
जी शिंदे यांणीं वस्त्रें व नालकी पेउन ना
कीत बसून ते आपले डेऱ्यांत गेले. या प्र
णें पुणें मुकामीं झालें

तिसरी लढायी शके १७१७ सन १७९५ इंग्रजी या वर्षी पेशवे याणी फौजेचा मोठा जमाव करून निजाम अल्ली हैदराबादचा नबाब याशीं केली, ती खडर्याचे मुकामी होऊन त्या लढायींत निजामसरकारचा पराभव झाला, आणि पेशवे यांस मोठा जय प्राप्त होऊन निजाम सरकारा पासून खंडणी बद्दल त्यांचे राज्यांतील कांही मुलुख लावून घेतला, आणि-त्याचा कारभारी मशारील मुलुख यांस आणून न घुण्यांस कैदेंत ठेविले. या लढायीची मोठी कीर्ति सर्व लोकांस खडर्याची स्वारी या नावानें महशूर आहे.

खेरिज हैदर अल्ली यांचा पुत्र टीपूसुलतान यांशीं पेशव्याचा कलह चालू होता, परंतु शेवट कांहीं झाला नाहीं.

या पेशव्याचे कारकीर्दित राज्याचा बंदोबस्त नानाफडणीस याणीं आपले शाहाणपणानें चांगली अकलेचीं माणसें (फडके वगैरे) या सारखीं मदतीस हमेशा घेऊन फार चांगला ठेविला होता.

परराज्यांतील बातमी आपणास फार स त्वर समजावी, आणि आपली बातमी अगदीं फुटूनये; अशी तजवीज राखली होती; न्याय इन्साफ उत्तमरीतीनें होत असून जरब बेबिली होती; व मुलुख ही आबाद ठेऊन रयत बद्द फर्ईल नव्हती; दरबारांत अमर्यादेचा स र्ग न [illegible] सलतीचें बळ अगदीं कमी दिसून आलें ना हीं, इत्यादि कारणा वरून या कारकीर्दीचा फारच लौकिक झाला. या नानाफडणीसा सा रखा कुशल व राज्य चालविणया विषयी स र्व हिंदुस्थानांत दुसरा कोणी पुरुष नव्हता, असें लोक म्हणत होते.

सवाई माधवराव नारायण पेशवे शके १७१७ सन १७९५ या वर्षी अश्विन मासी दसरा झाल्या वर पुणें एथें शनवारचे वाड्या त तिसरे मजल्या वरून उडी टाकून मां डी मोडून दोन दिवसांनीं म्हणजे अश्वि न शुद्ध पौर्णिमा रोजी मृत्यु पावले

त्यांची कारकीर्द बेचीस वर्षे वागली. त्यास एक परसपुत्र नव्हता.

## कारकीर्दसातवी.

## चिमणाजी माधव पेशवे यांची.

सवाई माधवराव पेशवे मरण पावल्यार पेशवाईचे अधिकारावर चिमणाजी मा धव असें नांव करून बाबुराव फडके व परशुराम भाऊ मिळकर याणीं काम चालविलें, ती कारकीर्द थोडे महिने वागली.

## कारकीर्दआठवी.

## बाजीरावरघुनाथ पेशवे यांची.

या पेशाव्यास शके १७१८ सन १७९६ इस वी या वर्षी अधिकार प्राप्त होऊन वस्त्रें धारण करी हूं महाराज आबासाहेब यांणीं दिलीं.

नंतर त्याणीं आपले कारभाराचें काम ना ना फडणीस यास सांगून पुढें थोडकेच दिवसां त त्यांस दौलतराव शिंदे यांजकडून कैद क रवून नगरचे किल्ल्यांत ठेविलें. नंतर आणखी बं दोबस्त करून नानाफडणीस शके १७२२ सन १८०० इसवी या वर्षी मरण पावले, तेव्हां (या नाना बद्दल खरेपणा व शहाणपणा गेला, असें सर्व लोक म्हणूं लागले.)

या पेशाव्यानीं आपणास गादी वर बस विण्या बद्दल शिंदे यांस दोन कोटी रुपये देऊं के ले ते द्यावयास जवळ शिल्लक नवते, म्हणून पु णेयांतील मोठे लोकांस मारहाण करून लूट क ल्या सारखें फार द्रव्य नेलें.

नंतर शके १७२४ सन १८०२ या वर्षी य शवंतराव होळकर फौजनिशी पुणेयास ये ऊन पेशाव्याचे फौजेचा पराभव केला, तेव्हां बाजिराव पळून प्रथम रायगडीं जाऊन मग ते थून वसईस जाऊन राहिले.

तेव्हां होळकर याणी पुणें शाहर लुटून लो कांचे हाल करून पुष्कळ द्रव्य हरण केले.

मग अमृतराव साहेब शके १७२४ सन १८०२ याच वर्षी जुन्नराहून येऊन पुण्या न जीक भाबुडर्यास राहून राज्यकारभार चालविला, त्यांचे चिरंजीव विनायकराव यांस सा त्याहून आबासाहेब धाकटे शाहूमहाराज पांज कडून चतुर सिंग राजे याणीं वस्त्रें देवविलीं. नंतर बाजिराव वसईहून माघारे येण्यापूर्वी अमृतराव साहेब चिरंजिवा सध्दां इंग्लिशांचे बाहेदारीनें काशी कडे चित्रकोटस-जाऊन राहिले, त्यांस सालिना आठलक्ष रुपये खर्चास पावत होते, त्याणीं जातांना घाटगे माशीक वगैरे पुष्कळ गाव लुटले.

मग बाजिराव यांणीं वसई मुकामींइंग्रजांशीं तह करून अनुकूळता करून घेऊन पुण्यास येऊन अधिकार चालवूं लागले.

नंतर इंग्लिशांशीं तह ठरविल्या प्रमाणें चालावें, असें बाजिराव यांचे मनांत हो तें; पुढें गायकवाड यांचा वकील गंगाधर

शास्त्री परवर्धन हा इंग्लिशांस सरकारचे बाहेदारीनें राहिली खंडणी देण्याचें बोलण्यास आलाहोता; त्यास पंढरीमुकामी त्रिंबकजी डेंगळेयास सांगून मारेकरी यांचे हातून शके १७३७ सन १८१५ या वर्षी ठार मारलें.

पुढें डेंगळ्यास इंग्रजाचे हवालीं केलें, त्यांणीं त्यांस किल्ल्या वर नेऊन ठेविलें, तेथून तो पळाला; परंतु पुन्हा धरून मरे पर्यंत कैदेंत ठेविलाहोता.

पुढें बाजिराव यांणीं चोरून फौज ठेऊन इंग्लिशांचा नाश करण्याचें मनांत आणून शके १७३९ सन १८१८ इसवी या वर्षी कार्तिकमासीं इंग्लिशांशीं लढायी चालू केली, ते ठिकाणीं पेशव्यांचे मुख्य सरदार बापू गोखले हे ते, ही लढायी बारा दिवस चालून तेरावे दिवशीं बाजिराव यांचे फौजेचा पराभव होऊन पळणीस आरंभ झाला.

मग पळतां पळतां आष्टे मुकामीं एक लढायी होऊन त्यांत बापूगोखले मारलेगेले त्या वेळेस तेथें पेशव्याचे लष्करांत सातारचेम

हाराज होते ; ते इंग्लिशास मिळाले.

नंतर बाजिराव पळून गेले ; ते शके १७४० सन १८१८ या वर्षी इंग्लिशाचे सरदार मालकम साहेब यांस भेटले ; त्याणीं तह करून पेशवे यांजला ब्रह्मवर्त एथें भागिरथीचे काठीं ठेऊन त्यांजला प्रतिवर्षी आठलक्ष रुपये पेनशान केलें ; ते बाजिराव अलिकडे सहा वर्षे पांच सात वर्षे पलिकडे कैलासवासी झाले ; त्यां चे वंशास इंग्लिश सरकारांतून नेमणूक वगैरे कांहीं पावत नाहीं.

बाजिराव यांचा दत्त पुत्र धोंडोपंत नाना याणें बाजिराव यांचे पश्चात सन १८५७ । ५८ शके १७७९ या वर्षी उत्तर हिंदुस्थानांत मोठें बंड केलें होतें ; परंतु तें इंग्लिश सरकारानें मोडून धोंडोपंत नाना यांचा अगदीं पराभव केला.

समाप्त.

# सातारकर महाराज यांचे करनीस (पंतसचीव;अष्ट प्रधानांतील दुसरे) यां चा इतिहास.

## भाग तेरावा.

श्रीमंत शिवाजी महाराज छत्रपति यांणीं शके १५९६ सन १६७४ इसवींत राज्या भिषेक करून घेऊन राक चालविला, तेव्हां अष्ट प्रधान केले; त्यांत आनाजी दत्तो करनवीस(सचीव)पदाचा अधिकार दिला; हे आनाजी दत्तो शिवाजी महाराजाचे लष्करांत, मोठे योग्य तेस आलेले व सर्व कामें काजें केलेले; आणि उपयोगी पडलेले असे होते.

पुढें शके १६०२ सन १६८० इसवीस शिवाजी महाराज मरण पावले, तेव्हां त्या चे वडिल पुत्र संभाजी महाराज यांस प्रति

बंधात ठेऊन धाकटे चिरंजीव राजाराम म हाराज यांस राज्याचे गादी वर स्थापण्याचे मसलतींत मुख्य हे होते.

पुढें संभाजीमहाराज प्रतापगडा व र येऊन राज्यकारभार आपण करूं लाग ले; तेव्हां आनाजि दत्तो सचीव हे राजारा म महाराज यांचे पक्षाचे म्हणून त्यांजला- गाके १६०२ सन १६८० इसवी या वर्षी के द केलें.

पुढें आनाजी दत्तो सचीव याणें रा जाराम महाराजां कडुन मोंगलां कडे कांहीं राज्य कारण केलें; अैसा आरोप ठेवून त्यां स प्रतापगड़ा वर ठार मारलें.

पुढें संभाजी महाराज यांचे कारकी र्दित रामचंद्र निळकंठ म्हणून कोणी सु रनवीस (सचीव पदाचा) कारभार चाल वीत असे;

परंतु पुढें तो (रामचंद्र निळकंठ) त्याच कारकीर्दित संभाजी महाराज यां चे वाईट वर्तणुकी मुळें आपलें पद सोडू न गेला.

पुढें राजाराम महाराज कर्नाटक प्रांती जिं
जीकडे गेले; तेव्हां त्याणीं तेथें अष्टप्रधान के
ले, त्यांत शके १६१२ सन १६९० या वर्षी रा
के राजी मल्हार यांस सचीवप दाचा अधिका
र दिला, पुढें जिंजीस मोंगलाचा वेढा पड
ला तेव्हां शंकराजी मल्हार आपला अधिका
र टाकून काद्दीस निघून गेले.

( पुढें जे सचीव झाले, त्यांचे वंश
हल्लीं अधिकारावर आहेत, त्यांचे
घराण्याचा इतिहास खालीं लि
हिण्यांत येत आहे )

---

पुण्याचे नैर्ऋत्य दिशेस आठकोसांव
र मांगदरी ह्मणून गांव आहे, तेथील राह
णार मुकुंदमल्हार यांचे चिरंजीव नारोमुकुं
द हे कारकुनीचा धंदा करून होते.

नारोमुकुंद हे श्रीमंत शिवाजी महारा
ज यांचे लष्करांत सुमारें शके १५८५ सन १६
७३ इसवींत चाकरी धरून लहा
न से कारकुनीवर राहिले.

त्या नंतर शके १५७० सन १६४८ या
वर्षी शिवाजीनीं तोरण किल्ला घेतला, तेव्हां

यांज बरोबर नारो मुकुंद हे असून त्यांणीं पु
ष्कळ उपयोग केला, त्या वेळेस त्या मोरपंडि
ल्या वर सबनिशीचा दरक असामी* शिवा-
जी राजानीं त्यास दिली.

शके १५९९ सन १६७७ इसवीचेसुमा
रें मोरप किल्ल्याचा हिरोब घेऊन शिवाजी
महाराज यांचे लश्करांत प्रतापगड मुकामीं
नारोमुकुंद गेले, त्यांज बरोबर त्यांचे चिरंजी
व शंकराजी नारायण होते.

शंकराजी नारायण यांजला नेच वेळेस
मोरो त्रिंबक पेशवे (मुख्यप्रधान) यांणींआ
पले जवळ ठेऊन कामकाज सांगूंलागले ते
व्हा पासून ते फौजेचे आणि मसलतीचे-
कामांत प्रवीण झाले

पुढें त्याच संधीस मांगदरी मुकामीं-

---

* सबनिशीचा दरक म्हणजे किल्ल्या संबंधी सर्व हिशोब ठेविणें, व त्यांजवर धान्यादि सामुग्री व दारूगो ळा इत्यादि युध्द सामान ठेवण्याची देख रेख ठेविणें असें या दरकाचें काम आहे.

शामगट महाशब्दे यांची कन्या एसूबाई यां
ज बराबर शंकराजी नारायण यांचा शरिर सं
बंध झाला.

शके १६०८ सन १६८६ चे सुमारास शं
कराजी नारायण यांणीं रामचंद्र आबाजी ब
हुतकर "हुकुमत पन्हा" यांचे लश्करांत मोठे
हुद्याचीं व जोखिवेचीं कामें केलीं; आणि प्रसि
द्धीस आले, त्यांत मुख्यत्वें करून धनगरलो
क व मावळेलोक यांज वर त्याची प्रीतिहोती.
आणि त्या लोकां बरोबर नेहेमी शिकारीस
जावे; मावळी मुलुख व चोरवाटा पाहाव्या, अ
सें करीत असत.

शके १६१० सन १६८८ या वर्षी शिवाजी
महाराज यांचे जेष्ठ चिरंजीव संभाजी महा
राज यांस मोंगलानीं धरून नेलें; आणि ति
कडे त्यांचा वाईट परिणाम झाला, ते क्षो
शिवाजीचे कनिष्ठ पुत्र राजाराम महाराज
रायगडा वर होते, ते राज्यकारभार चालवू
लागले. परंतु संभाजीचे कारकीर्दीत फार अ
व्यवस्था होऊन शिवाजीचे वेळचे मानकरी

व सरदार चोहोंकडे गेले, या मुळें आणि मों
गलाची फौज सर्व इकडे पसरली, व त्यांणी सं
भाजीची स्त्री व पुत्र (शिवाजी) "याचेंच नांव
पुढें शाहू पडलें" यांस धरून नेऊन मिरज
व पन्हाळा किल्ला घेतला. तेव्हां इकडे राजा-
राम याच्यानें धीर धरवेना, (राजाराम जर ते
व्हां इकडे राहता. तर त्याला मोंगलांनीं धरलें
असतें.)

असे प्रसंगीं आपले सर्व सरदार जमा
करून त्यांचे विचारें राजाराम महाराज चंदीचं
जाउराकडे जींजीस जाण्या करतां प्रल्हादनि
राजी वगैरे एकवीस माणसें विश्वासूक बरोब
र घेऊन तिकडे गेले.

राजारामम्महाराज चंदीकडे गेले: तेव्हां
त्याणीं इकडे विशाळगड व रांगणा वगैरेकि
ल्ले व मुलखाचा व शिबंदीचा बंदोबस्त कर
ण्यास रामचंद्रआबाजी बहुतकर हुकुमतपन्हा
सांस व आणखी विश्वांसू कांहीं लोकांस सां
गितलें.

रामचंद्र आबाजी यांणी शिवाजीमहारा

ज यांचे वेळचे मानकरी व मराठे सरदार वगै रे जमवून मोंगलांचे लश्कराच्या टोळ्या मारा व्या, रसदा लुटाव्या, किल्ले घ्यावे, असा क्रम चालविला.

जे जे लोक इकडे पराक्रम करीत, तेंस व वर्तमान चंदीकडे कळून महाराजा कडून त्यांस बक्षिसें, पदाधिकार व किताब येत अ शी चाल पडली, या मुळें पुष्कळ शिपायीभू र माणा परते श्रम करीत.

त्या रामचंद्र पंताचे लश्करांत शंकराजी नारायण यांणीं सह्याद्रि बांधोरी मावळ मुल्ह्या त राहून धनगर, मावळे, कंक, मालुसरे वगैरे लोक व त्यांचे सरदार "शिवाजीचे वेळचे" ज मवून मोंगलाच्या फौजा माराव्या, रसदा लु टाव्या, छापे घालावे, आणि किल्ले व मुलुख घ्यावे, असें करूंलागले.

शके १६१४ सन १६९२ इसवी यावर्षी शंकराजी नारायण यांणीं एके दिवशीं रात्रीं रा जगड किल्ल्या पाशीं आपले मावळे लोकांसह ये ऊन किल्लयास घोरपड लावून माळ लाविली,

आणि आपण पुढें होऊन मावळे लोकां सह किल्ल्या वर चढून मोंगली फौजे वर छापा घा लून किल्ला घेतला.

या वेळेस खर्चा साठीं रामचंद्र आबाजी बहुतकर याणें थाई परगण्याचा सुभा शंक राजी नारायण यांस देऊन व त्याचे पराक्रमा वें वर्तमान चंद्री कडे महाराजास कळून निक डून शंकराजी नारायण यांस "मदारुल् मो हम" ह्मणजे सर्व कामात श्रेष्ठ मरवशाचे असा किताब व वस्त्रें आलीं.

पुढें दिवसें दिवस शंकराजी नाराय ण याणें पुष्कळ फौज जमा केली, त्याचें रा हणें बहुत करून सह्याद्रि घाटमाथ्या वर असू न राजीं स्वाऱ्या करून छापे घालावे, किल्ले घ्या वे असें ते करीत होते; त्यांणीं शके १६१५ सन १६९३ चे सुमारास व त्याचे पुढे तोरणा व रोहिडा व दुसरे पुष्कळ किल्ले व मुलुख मोंगला पासून घेतले आणि पुढें मोठे विख्या त झाले, व त्याणीं मोंगलाचे फौजेचा फार- चाडा केला.

राजाराममहाराज कर्नाटकांत गेल्याचे पाठी मागें रामचंद्र आबाजी बहुकर, शंकराजी नारायण, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, परशराम त्रिंबक यांणीं या प्रांतीं पुष्कळ फौज जमा करून आणि पराक्रमानें व मसलतीनें मोगली फौज मारून लुटून त्यांज पासून बहुत क किल्ले व मुलुख सोडविले; हें वर्तमान नेहेमी महाराजांस कळवित असत.

निकडे जिंजीचे मुकामी राजाराम महाराज पोंचल्यावर त्यांणीं आपले वडिलाचे जाहागीत अष्टप्रधान जमवून राज्य करूं लागले; तिकडे औरंगजेबाचा सर दार जुलफिकार खान याणें चंदीस वेढा घालून राजाराममहाराज यांस चंदीतून काढून दिलें; तेव्हां तेथून गुप्तपणें निघून विशाळगड प्रांतीं आले.

विशाळगडु मातांत रामराजे महाराज यांस मराठी फौज अनुकुळ झाली. आणि मग रामचंद्र आबाजी बहुतकर यांचे व शंकराजी नारायण पंतसचीव यांचे मसलतीनें महाराज साताऱ्यास आले.

त्या वेळस म्हणजे शके १६१९ सन १६९७ इसवी या वर्षी शंकराजी नारायण यास महाराजांनी (यांणीं फार पराक्रम केला; व मोंगला पासून किल्ले व मुलुख सोडविले म्हणून) अष्टप्रधांनातील सचीव पदाचा अधिकार दिला.

शके १६१९ सन १६९७ या वर्षी पदाचा अधिकार देऊन खालीं लिहिले प्रांत व किल्ले शंकराजी नारायण यांज कडे दिले.

---

## प्रांत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रांत जुन्नर. | १ | चौल प्रांत. |
| १ | पुणें. | १ | राजपुरी. |
| १ | कडेवळीत. | १ | कर्ड. |
| १ | इंदापूर. | १ | पौड खोरे. |

## किल्ले व त्यासबंधीं मुलुख.

१ रुद्रधागड (भोरपकिल्ला) १ तोरणा (प्रचंडगड)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पुरंदर | १ | मृगगड. |
| १ | वर्धनगड | १ | कावेरी गड. |
| १ | मनमोहनगड | १ | रोहिडा उर्फ वि |
| १ | राजगड | | चित्र गड. |
| १ | सिंहगड कोंडणा. | १ | घनगड. |

---

एणें प्रमाणें मांत व किल्ले दिले आणि सर्व दक्षिण व कर्नाटक व कोकण एथें महाराज यांचें स्वराज्य व मोंगलाई मुलकात सहोत्रे बाबेचा अम्मल बतनी करून दिला, या सहा ह्याचे सर्व मिळून महाल अदमासें पाचशेंपन्नास तालुके आहेत, व या सहोत्र्याची जमा अदमासें दीड लक्ष कमाल होती.

या शिवाय कांहीं फूट इनाम व इसाफत गांव व रोहिडखोरें याचें देशपांडे पण अंसें दिलें.

या सर्वांची वहिवाट आपले कामगार व जन शंकराजी नारायण यांणी चालविली, व आपण बहुत करून सिंहगड, राजगड, रोहिडा या वर राहात असत.

यां प्रमाणें होऊन पुढें शके १६२१ सन १६९९ इसवी या वर्षी फालगून वद्य न वमीस सिद्धगडा वर राजाराम महाराज मृ त्यु पावले ; त्याचे पुत्र शिवाजी महाराज हे अधिकारी करून ते लहान ( दहावर्षांचे ) झ ण्यून राजाराम यांची स्त्री ताराबाई यांणीं राज्य कारभार कराव्या ; असें ठरलें ; तेव्हां ही मसलत करणारे व राज्य कारभार चालविणारे झाले ते :-

१ रामचंद्र आबाजी बहुतकर "हुकुम त पन्हा."

१ शंकराजी नारायण.

१ धनाजि जाधव सेनापति.

---

या तिघांचे विचारें सर्व राज्य कारभार ताराबाई करीत असत ; या तिघानीं फौजेचा व मुलकाचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा ठेवि ला होता.

शंकराजी नारायण याजला पदाधिका र प्राप्त झाला ; तेव्हां त्याचे नांवचा शिक्का चा लू लागला ; त्यांत त्याचे नांवचीं अक्षरें फार

ले ली आहेत, तोच शिक्का आज पर्यंत त्यांचे वंशाज चालवित आहेंत.

महाराजांचे पदरीं सचीवाचें मुख्य काम म्हटलें म्हणजे दप्तर संभाळणें, व सनदांची बारनिशी ठेवणें, असें आहे. आणि महाराज सरकारातून कोणास सनद पत्र करून दिले तर त्याज वर "रुजुस्कर नवीस" "स्करु शुद्द बार" अशीं अक्षरें सचिवाचीं असत. व महाराजानीं यांसप्र लिहिणें; तर वर राजश्री शंकराजी पंडीत" असें नांव लिहून खोवटीं "बहुत काय लिहिणें सूज्ञ असा" असें लिहिण्याची चालहोती

महाराज सरकारानून सचिव पदाचीं व स्रे झालीं; व पुढें दर एक पुरुषाचे वेळेस वस्त्रें झालीं तरी महाराजां कडून वस्त्रें व जवाहिर वगैरे खालीं लिहिल्या प्रमाणें देण्याची चाल होती.

## वस्त्रें.

१ प्रथम भेटी समयीं चादर छडीदार

१ पदाची वस्त्रें; मंदील एक; चादर छडीदार एक; किनखाप एक, पटका एक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिके कटार. | | |
| १ | शाल्वें, ढाल, | एक | तलवार एक. |
| १ | चौघडा. | १ | हत्ती नग एक. |
| १ | घोडा एक | १ | जवाहिर, चौकडा- |
| १ | चवरी रुप्याचे दांडीची. | | मोत्याचा एक. कंठी मोत्यांची एक |
| १ | कलमदान ताडीचें. | | तुरा मोत्यांचा एक शिरपेंच. |

या प्रमाणें देण्याची चाल होती; आणि सचिवानीं भेटीचे वेळेस महाराजांस कांहीं मोहरा नजर कराव्या लागत, ( बहुधां पंधरा मोहरा नजर घाव्या लागत.)

शके १६२९ सन १७०७ या वर्षी मोंगलांचे कैदेंतून सुटून संभाजीचे पुत्र शिवाजी ( शाहू ) इ- आलेतेमयम गंगातीरीं आले, हें वर्तमान ताराबाईस समजलें, त्यांणीं अष्टप्रधान व सरदार जमा करून एक पंगती भोजनाचा बेत केला; व दुधमाता वर हात ठेऊन सर्वांपासून क्रिया घेतली कीं, सर्वांनीं ताराबाई व तिचापुत्रयांचा पक्ष स्वीकारावा

आणि शाहू महाराज आलेले, तोतया घे-
ऊन यांजला कोणी मिळूं नये.

ही शपथ केल्या वर पुढें कित्येकांनीं
शाहू महाराजा विषयीं चौकशी केली, तों हेशा
हू महाराज संभाजी महाराज यांचे पुत्र खरे
अशी खात्री झाली.

त्या वेळेस ताराबाई यांचे हुकुमानें से-
नापति व प्रतिनिधी हे गंगातीरीं शाहुराजाचे
परामवा निमित्य गेले; त्या पैकीं सेनापति शा
हूमहाराजांस मिळाले; आणि प्रतिनिधी परा-
भव पावले; मग शाहूमहाराज निघून गुणा
स आले; तेथून जेजुरीस गेले.

जेजुरीहून शाहूराजे यांणीं शंकराजी ना
रायण यांस भेटीस येण्या विषयीं पत्र पा
ठविलें, तें पत्र पावल्या वर शंकराजी नारा-
यण यांणीं विचार केला कीं, ताराबाई साहेब
यांज पाशीं शपथ वाहिली आहे; जावे, हें बरो
बर नाहीं; आणि नजातां युध्द करावें; तर शा
हूमहाराज धनी; यांज बरोबर युध्द करणें
हें फार अनुचित कर्म होते; या साठीं कांहीं वि-

चार कराव, म्हणून रायगडास जाऊन साहि-
ले; आणि पत्राचें उत्तर कांहीं पाठविलें नाहीं.
नंतर प्रतिनिधी शिवाय बहुत करून स-
र्व सरदार व मुत्सदी शाहू राजास मिळाले, व
त्यांणीं कितीएक किल्ले घेऊन सातारा किल्ला
घेतला.

पुढें शाहूराजानी पुन्हां पत्र व कांहीं फौ-
ज शंकराजी नारायण यांस आणण्यास पा-
ठविली; हें वर्तमान शंकराजी नारायण यां-
स कळलें; तेव्हां ते चांगले बंदोबस्ताचे कि
ल्ल्या वर होते; व त्यांज कडे फौज व युंध्द सा-
मुग्री असतां ही त्याणें इमानानें नीती साठीं
आणि सत्या करतां राजगड किल्ल्या वरून-
निघून भोरा पासून चार कोसां वर आंबवडे-
मुकामीं अतुर सन्यास घेऊन शके १६२९
सन १७०७ या रोजीं कांहीं वीष खाऊन देह
ठेविला.

शंकराजी नारायण यांस वय कुमारेंपं
चेचाळीस अगर शेचाळीस वर्षांचें असावें व
यांजला दोन औरस पुत्र व दत्तक पुत्र एक अ

से होते ; त्या पैकीं जनार्दन शंकर लहानपणींच मरण पावले, म्हणून महादजी शंकर स्वगोत्री दत्तक घेतले होते, त्या जवर पुढें नारोशंकर औरस पुत्र झाले ; ते नारो शंकर शंकराजी नारायण मरण पावले ; तेव्हां दोन वर्षांचे वयाचे होते.

या प्रमाणें शंकराजी नारायण मरण पावल्याचें वर्तमान रा॥ हूंराजे यांणीं चंदनचे मुकामीं ऐकिलें, तेव्हां त्यांची नीति व गुण ऐकून स्वदाश्चर्य वाटलें, आणि त्यांची राजभक्ति व स्वदक्षता आणि पराक्रम यांज कडे शाहूराजा नें लक्ष्य पुरविलें, तेव्हां नारोशंकर दोन वर्षांचे वयाचे असतां त्याजला सचिवपदाचा अधिकार देऊन वस्त्रें पाठविलीं. ही गोष्ट शके १६२९ सन १७०७ माघ महिन्यांत घडली.

या नारोशंकराचे राहणें बहुत करून रोहिडे किल्ल्या वर व त्या नजीक वरोडीं व नेरें या गावीं असे.

शके १६४२ सन १७२० च्या सुमारास दमाजी थोरात याणें बाळाजि विश्वनाथ यांस व यांचे दोन चिरंजीव व मुतालिक या सह कैदेंत ठेविलें होते, ते शाहूराजाने दंड करून सोडविले) त्याचा पराभव करण्या विषयीं शाहूमहाराजानीं आज्ञा पाठविली. त्याजवरून दमाजि थोरात व नारोशंकर यांचे युध्द होऊन थोरात याणें नारोशंकर सचीव यांस व त्यांचे मुतालिक यांस हिंगणगांवचे किल्ल्यांत धरून कैदेंत ठेविलें.

मग त्या दमाजीथोरानाचा पराजय करण्या करतां शाहूमहाराजानीं पुन्हां बाळाजि-विश्वनाथ यांज बरोबर मोठी फौज देऊन पाठविलें, त्यांज कडे नारोशंकर सचीव यांची मातुश्री एसूबाई यांणीं राज्यकारण केलें, त्याजवरून बाळाजिविश्वनाथ यांणीं मसलत केलीकीं जर या वेळेस याशीं युध्द केलें तर थोरात नारोशंकराचा घात करील या साठीं युक्तीनें व मसलतीनें तहा सारखें बोलणें लावून अगोदर सचीवाची व त्यांचे मुतालिकाची सुटका करून घेतली. व मग बा-

बाजि विश्वनाथ यांणीं त्या थोरातांचा लढा यी करून पराभव केला.

या उपकारा बद्दल नारोशंकर व त्यांची मातुश्री एसूबाई यांणी बाळाजि विश्वनाथ या स पुणें परगणा व पुरंदर किल्ला व त्या संबधी मुलुख दिला, व तें बाळाजिविश्वनाथ याणें शाहु राजा कडून आपणा कडे करून घेतलें

नारोशंकर सचीव शके १६५९ जेष्ठ, सन १७३७ मार्च महिन्यांत मरण पावले, तेव्हां शंकराजी नारायण यांचे दत्त पुत्र महादजी शंकर यांचें पुत्र चिमणाजी महादेव हे बहु त करून महाराजा जवळ असत, त्याजला च चिमणाजी नारायण असें नाव ठेवून शके १६५९ सन १७३७ या वर्षी महाराज याणीं सचिव पदाचा अधिकार व वस्त्रें दिलीं

या चिमणाजी नारायणाचें लग्न शा मजी हरि शिरवळकर यांचे कन्ये बरोबर झाले, त्याजला तीन औरस पुत्र झाले.

चिमणाजी नारायण यांणीं शके १६६३ सन १७४० या वर्षी देशपांडे कुलकर्णी तालु

के वेल्लुंड खोरें यांचे निमें वतन चवदाशेंपन्ना स रुपये देऊन आपल्यास वंशापरंपरेनें राघो अनंत यांज पासून खरेदी घेतलें.

हे चिमणाजी नारायण यांणीं आपलें र हाण्याचें गांव भोर पुण्या पासून दक्षिणेस बारा कोस (जेथें परमेश्वर कृपेनें अद्यापि त्यां चा वंश करवानें आणि नीतीनें राज्य करीत-आहे;) तें ठिकाण केलें.

भोरास राहण्याचें कारण असें असावे; कीं पूर्वी वरोडी एथें राहात असत; तेथील वाडा पाच सेधीस जळाला, तेव्हां भोर गांव निरानदी चे काठीं चांगला पाहून तेथें आपली मुख्य रा ज्य धानी केली.

शाहू महाराज यांचे पश्चात राजाराम म हाराज यांचा नातु रामराजे यांची कारकीर्द झा ली; तेव्हां ताराबाई साहेब व रामराजे यांस कां ही नेमणुकी दारवल खर्चास ठरवून राजमंडळ तोडिलें, आणि सर्व कारभार पंतप्रधान करूं लागले; त्यांणीं ताराबाई साहेब यांची आज्ञा झाल्याचें निमित्य करून सिद्दगड व त्या संबं-

धीं मुलुख मागूं लागले; परंतु चिमणाजी नारा यण व यांचे पुत्र सदाशिव चिमणाजी हे युध्द करूं लागले; म्हणून त्यांजला तुंग व तिकोना हे दोन किल्ले व आणखीं त्या संबंधीं मुलुख पेश वे यांणीं देऊन सिंध्दगड किल्ला घेतला.

ही गोष्ट शके १६७४ सन १७५२ इसवी-स झाली.

पुढें शके १६७९ सन १७५७ इसवी या वर्षीं चिमणाजी नारायण हे मृत्यु पावले, त्यां चें थडगें मोर एथें मुरलीधराचे देवालया न जीक वाडया पुढें चौकांत आहे.

चिमणाजी नारायण यांस पुत्र तीन हो ते; पहिले सदाशिवराव, दुसरे आनंदराव; आणि तिसरे रघुनाथराव असे होते.

या त्रिवर्ग बंधू पैकीं सदाशिवराव चि मणाजी आणि आनंदराव चिमणाजी यांजला पुत्र नाहीं. रघुनाथराव यांचा शरिर संबंध राम चंद्र शामराज शिरवळकर यांचे कन्ये बरोबर झाला होता; त्यांस एक पुत्र, त्याचें नांव शंकरराव व

या त्रिवर्ग बंधू पैकी सदाशिवराव चिमणाजी यांस ताराबाई साहेब यांणीं रामराजे यांचे कारकीर्दीत शके १६८० सन १७५८ या वर्षी पदाचीं वस्त्रें दिलीं. हे बहुत करून पुण्यास व कांहीं दिवस सातान्यांत होते.

आनंदराव चिमणाजी कांहीं दिवस तुंग व तिकोना या किल्ल्या वर होते; ते शके १६९८ सन १७७६ इसवी या वर्षी कैलासवासी झाले.

नंतर सदाशिवराव चिमणाजी सचीव शके १७०९ सन १७८७ ज्येष्ठ वद्य पंचमीस मरण पावल्या वर सचिवपदाचीं वस्त्रें धाकटे शाहूमहाराज यांणीं श्रावण शुद्ध द्वादशी शके सत्रा शे नऊ सन १७८७ या वर्षी रघुनाथराव यांस दिलीं.

यांचे कारकीर्दीत विशेष लिहिण्यासारख्या गोष्टी झाल्या नाहींत, मात्र यांचे कारकीर्दीत त्या वेळेस वैमनस्यें फार होतीं, परंतु कांहीं ग्रंथांत घेण्या सारखी गोष्ट घडली नाही. यांचे कारकीर्दीत पिलखान्याचे खर्चा-

बद्दल कांहीं अम्मल महाराज सरकारांत गेलाच सावा.

पुढें रघुनाथराव शके १७१३ आषाढ शुद्ध दशमी सन १७९१ या वर्षी कैलासवासी झाले. त्यांचे औरस पुत्र शंकरराव यांस धाकटे शाहू महाराज यांणीं शके १७१३ सन १७९१ इसवी श्रावणमासीं सचिवपदाचा अधिकार व वस्त्रें दिलीं.

शंकरराव रघुनाथ सचीव यांचा शारिरसंबंध सखारामभगवंत बोकील (पेशाव्यांचे कारभारी) याचे मुली बरोबर झाला.

हें लग्न मोठ्या समारंभानें वाई एथें झालें; दुसरें लग्न रामशास्त्री याचें कन्ये बरोबर; आणि तिसरें लग्न विश्वासराव भांबेकर यांचे कन्ये बरोबर झालें. अशा तीन स्त्रिया होत्या त्या पैकीं पहिल्या दोघी कैलासवासी झाल्या; आणि भांबेकर यांची कन्या राधाबाई ही हल्लीं आहेत. या तिहींतून कोणास पुत्र झाला नाही.

शंकरराव हे आपले कारकीर्दीत कांहीं

बरेच दिवस जेजुरीस होते, तेथें त्यांचे कारभारी-बाजिराव मोरेश्वर होते; त्यांणीं शके १७१९ सन १७९७ इसवीचे सुमारें बाळाजिजनार्दन (नाना-फडणीस) यांस कांहीं गैरवाका मजकूर समजावून गर्दी केली, आणि धरलें. हें वर्तमान सचिवांचे पक्षपाति महादजिशिंदे यांस पुणें मुकामीं कळविलें त्या वरून शिंदे यांणीं सचिवास पुण्यास नेऊन त्यांचा चांगले प्रकारें मान राखिला.

शंकररावसाहेब शके १७२० सन १७९८ इसवी या वर्षी चैत्रवद्य द्वादशीचे दिवशीं मरण पावले. त्यांस औरस पुत्र नाहीं, म्हणून मूळपुरुष शंकराजीनारायण यांचे चुलते विठ्ठल मुकुंद यांचे वंशा पैकीं काशीमोरेश्वर यांचे चिरंजीव दत्तक घेतले व त्यांचें नांव चिमणाजी शंकर असें ठेविलें यांजला शके १७२० सन १७९८ इसवी या वर्षी पंतप्रधान यांणीं पुष्कळ नजर घेऊन धाकटे शाहुमहाराज यांज कडून चिमणाजी शंकर यांस सचीवपदाचा अधिकार व वस्त्रें देवविलीं या चिमणाजी शंकरास दोन स्त्रिया होत्या. पहिली, भवानीबाई; आपाजीपंत राजउपा

धै यांची कन्या आणि दुसरी लक्ष्मीबाई ना
सो लिंबाजी महादेवकर यांची कन्या :
यांत पहिलीस बाईसाहेब आणि दुसरी-
स काकी साहेब असें म्हणत असत.

यांसला राज्याधिकार प्राप्त झाल्या वरु
हें कित्येक दिवसांनीं यांची मातुश्री राधाबाई
यांचें आणि या सरकारचें वैमनस्य वाढत गे-
ढत पुढें फारच वाढलें ; त्याचा शेवट परिणाम
इतका जहाला कीं राघाबाई साहेब यांणीं आ-
पाजिराव निंबाळकर वाठारकर यांज कडे कि
तुर चालविला.

ते आपाजिराव निंबाळकर वाठारकर शि
रे यांचे पक्षीं पोटें घातलेले व फौजबंद होते
त्यांचे कर्ज चिमणाजी शंकर दत्त घेतले या
वेळेस पेशवे यांस नजर देण्या साठीं पुष्कळ
घेतलें होतें, त्या कर्जाचे निमित्त्यानें कर्ज वसूल
करण्या साठीं म्हणून त्या आपाजिराव निंबा
कर वाठारकर यानें पुष्कळ आरबलोक मोर
एथें पाठविले.

त्या आरब लोकांनीं निंबाळकरयांनक

असे राधाबाई यांचा फितुर होता, त्या मसल
ती वरून चिमणाजी शंकर यांस माघ शुद्ध ष
ष्ठी शके १७३५ सन १८१३ या दिवशीं मोरा
स कैद करून मोठे बंदोबस्तांत ठेविलें.

त्या वेळेस इंग्लिश सरकारांतून पेशवे स
रकारांत खरसदजी शेट मोधी वकिलीस होता,
आणि तो आपाजि निंबाळकराचा मित्र होत्या
ज कडे राधाबाई यांचे राज्यकारण होतें; म्हणू
न बाजिराव रघुनाथ प्रधान यांस चिमणाजी
शंकर यांचे चाली विषयीं नानानरहेचे गैरवा-
का मजकूर समजवावे, आणि निंबाळकर वा
ठारकर यांमींच कारभार करावा असें तिकडे
चालविलें.

इकडे चिमणाजी शंकर यांजला वरचा
वे प्रतिपक्षी यांला आणि रयतेस निंबाळक
र यांचे आरबांनी व बाई कडील मंडळी
में जो भास केला आणि जुलूम केला, तें लि
हिलें आणि सविस्तर केलें तर ग्रंथ फार मो
ठा पाहिजे

चिमणाजी शंकर यांचे तर्फे मंडळीनीं-

पुण्यास पधान पांजे कडे पुष्कळ उद्योग केला रंगो मोरेश्वर वकील व जनार्दन नारायण शिवा पूरकर वगैरे पुष्कळ लोकांनीं यत्न केला ; तो-मोधी जिवंत होता ; तों पर्यंत चाललो नाहीं ; तरी लौकरच कांहीं राज्यकीय प्रसंगात् त्या मोधीनें वीष खाऊन प्राण दिला; तेव्हां बाजिराव रघुनाथ पधान यांजला अनुकूळ करून घेऊन निंबाळक रांचे कैदेंतून सुटून पुण्यास गेले ; व आपाजिराव निंबाळकर यांस पुणें मुकामीं कैद केलें. चिमणाजी शंकर शके १७३६ फालगून सन १८१४ या वर्षी सुटून पुण्यास गेले.

पुण्यास जाण्या पूर्वी बाजिराव रघुनाथ पेशवे ( मुख्यपधान ) यांणीं जनार्दन नारायण देशपांडे यांचे मार्फत निंबाळकराचे आरबास देण्यास कांहीं ऐवज ही दिला होता.

चिमणाजी शंकर पुण्यास पोंचल्या वर त्यांचा बाजिराव पधान यांणीं मोठा सन्मान केला ; आणि सर्व पकारें बंदोबस्त केला होता ; तेव्हां पासून लढाया अखेर बहुत करून पुण्या सच चिमणाजी शंकर पंडित पंतसचीव हे ग

मराठी ग्रंथ संग्रहालय
जपे.

हात असत

हें वर संक्षिप्त लिहिलें आहे, परंतु निं बाळकराचा बैदा पुष्कळ दिवस होता, आणि मोठा झाला असून तो "लिंबाळकरी" या नावा नें प्रसिद्ध आहे; जर सविस्तर लिहिला तर फा र होईल.

पुढें राधाबाई यांस रोहिडे किल्ल्या वरकां ही दिवस ठेविली होती.

नंतर शके १७३९।४० सन १८१८ या- वर्षी बाजिराव प्रधान पळाले, तेव्हां त्यांज व रोवर चिमणाजी शंकर ही पंढरपुरा नजीक "टें भुर्णी जवळ" एथपर्यंत होते; इकडे इंग्लिश सरकारचे कमिशनर लार्ड एल्फिन्स्तन् सा हेब सिंहगडा वर होते; त्याणीं तुंग व तिको ना वगैरे मुलुख जप्त केला; आणि इकडून- गेलेले वकिलास सांगितलें कीं जर पंत आठ दि- वसांत भेटतील तर त्यांचा मुलुख त्यांचे ह वालीं होईल.

हें वर्तमान "लिहून लोकर येण्या विष- यीं "वकिलानें पत्र लिहिलें, तें टेंभुर्णीस पोंचलें

तेथें त्यांणीं बाजिराव यांचा युक्तिनें निरोप घेऊन सिद्दगडास आले आणि साहेबास भेटले. साहेबांस भेटले तेव्हां एल्फिन्स्तन् साहेब व बाळाजि नारायण नातू होते. तेथें साहेब यांणीं सांगितलें कीं आपण आपल्या स्थानांत जावे, मोंगलाईतील खेरिज करून दायी अखेर चालत आल्या प्रमाणें सर्व प्रमाण चालेल. असें बोलणें होऊन त्या वेळेस तेथें अक्षरा कलमाचा तह ठरविला.

या तहा मुळें सन्धिघाच्या मोंगलाईतील सवोन्या अमल कमारें ५०००० । ६०००० पन्नास साठ हजार रुपयांचा गेला. हें नुकसान झालें, परंतु असें युद्ध व धामधुमीचे प्रसंगीं असा तह करणें जरूर पडलें असावें, यांत संशय नाही.

हा तह झाल्या वर त्रिंमणाजी भांकर मोगास येऊन राहिले.

पुढें इंग्रजी झाल्या वर राधाबाई यांणीं सातान्यास मलाप्पसिंह महाराज यांस कैदे फिर्याद केली. याजवरून सातार मुकामीं महारा

न व ग्राटसाहेब रसिदर यांणीं ठराव करून बाईस उपजीविका करणया करतां दरमहा १६०० रूपये पर्यंत नेमणूक करून दिली.

ती बाई आज पर्यंत जिवंत असू न बाई माहुली वगैरे क्षेत्रांत कालक्षेप करीत आहे.

यांणीं श्रीमहायात्रा ही केली. आतां त्यां ची बहुत करून सर्व खटपट राहून त्यांणीं स्वा मे संध्या सत्कर्मानें कालक्षेप चालविला आहे हें त्यांचे वृध्दावस्थेस योग्य आहे.

पुढें चिमणाजी शंकर यांची शके सत्रा शें एकुण पन्नास सन १८२७ इसवी या वर्षी प्रकृति फार बिघडली; आणि त्यांजला औ रस पुत्र नव्हता; म्हणून त्यांणीं आपले प हिले घरचे सापत्न बंधू वामनराव यांस दत्त क घेऊन त्यांचें नांव रघुनाथराव ठेविलें.

शके १७४९ सन १८२७ कार्तिक व द्य चतुर्थी या दिवशीं चिमणाजी शंकर मर ण पावले.

रघुनाथ चिमणाजी (रावसाहेब) या

वद्य एकादशी या दिवशीं प्रतापसिंह महाराज-
यांणीं ४०००० चाळीस हजार रुपये नजर घेऊन
व पंधरा हजार रुपये पिलखान्या बद्दल दरसाल घे
ण्याचे ठरवून दस्तकास कायम केलें, आणि वरलें
दिलीं.

रावसाहेब यांचें लग्न गंगाबाई साहेब
वाजि व्यंकटेश यांची नात यांज बरोबर दस्तक
होण्या पूर्वीच झालें होतें.

या गंगाबाई साहेब यांस आई साहेब अ
सें म्हणत असत

यांचे कारकीर्दीत सन १८२९ शके सत्राशें
एकावन्न या वर्षी नागोटणें, अष्ठमी, शिमहाल,
हवेली, असरें आणि अतोणें एथील दुअमली-
गांव व तालुके सरमोबदला करून घेतले; हा उ
बला टाण्याचे इंग्लिश सरकारचे कलेकटर यांज
बरोबर झाला. त्यांत सरसगड (पालीचा किल्ला)
सचीव यांज कडे आला.

यांचे कारकीर्दीत बहुत करून शके स-
त्राशें सत्तावन्न सन १८३५ पर्यंत यांची मातोश्री

भवानी बाई हीच कारभार करीत होती, त्या का ळांत मुकत्यारी नसल्या मुळें रावसाहेब यांणीं चांगले करवानेंव राज्योप भोगानें काळ कारला असें म्हणावत नाहीं.

शके १७५२ सन १८३० इसवी या वर्षी- रावसाहेब यांस एक पुत्र झाला होता, तो लहा नपणींच त्याच वर्षी कार्तिक मासीं मरण पा वला.

रघुनाथ रावसाहेब यांचा आणि त्यांचीमा तुश्री भवानी साहेब यांचा तंटा वाढून शेवटीं- त्याचा निकाल प्रतापसिंह राजे आणि रसिद ट साहेब यांणीं तारिख १५ अक्टोबर सन १८३५ शके १७५७ साली करून बाईसाहेबांस नेम णूक ठरवून दिलीं, तेव्हां पासून ती बाई सा ताऱ्यास राहून कालक्षेप करीत असत, ती शा के १७७६ फालगुन शुद्ध प्रतिपदा शसन १८५४ रोजीं स्वर्गस्थ झाली.

पुढें शके १७५८ माघ मासीं सन १८३६ इसवी या वर्षीं रावसाहेब यांची प्रकृति फारबि घडली, म्हणून त्याणीं आपलें पहिले घरचा सा

पत्न बंधूचा पुत्र बळवंतराव यांस दत्तक घेऊन पुत्र केले; त्यांचें नांव चिमणाजी पंडित-असें ठेविलें.

पुढें रघुनाथराव साहेब शके १७५८ सन १८३६ इसवी माघ शुद्ध तृतीया रोजीं कैलासवासी झाले; त्या पुढें त्यांची मातुश्री लक्षुमबाई काकी साहेब माघ शुद्ध चतुर्दशी शके १७५८ या रोजी मरण पावली.

गंगाबाई साहेब ही सध्यां विचारीपोक्त असून फार संभावित होती यांजला शके १७६२ सन १८४० या वर्षी माघ वद्य तृतियेस देवाज्ञा झाली.

---

# कारकीर्द
# चिमणाजी रघुनाथ पंतसचीव यांची.

---

## चिमणाजी रघुनाथ यांस दत्त घेतल्याव

र यांजला सन १८३८ शके १७६० या वर्षीक
लकत्ता सरकारचे हुकमानें मुंबई सरकारानें
दत्तक मंजूर केलें, आणि सन १८३९ शके स
भाशें एकसष्ट या वर्षी श्रीमंत छत्रपति शाहा
जी राजे ( आपा साहेब महाराज ) यांणीं वस्त्रें
आणि अधिकार दिला.

सन १८३९ शके १७६१ साल्यांत पंना
पसिद्ध राजे आणि शाहाजीराजे यांचें वैमन
स्य येऊन प्रतापसिद्ध राजा वर फितुराचा आ
रोप आला, तेव्हां शाहाजी उर्फ आपा साहेब म
हाराज सातान्या नजीक माळा वर राहिले, त्यां
ज कडे चौकी पाहन्यास व बंदोबस्तास माणसें
शिपायी व सामान वगैरे पुष्कळ चांगली तज
वीज चिमणाजी रघुनाथ यांची मालुश्री व कार
भारी यांणीं ठेवली. त्या जवर पुढें प्रतापसि-
द्ध राजे हिंदुस्थानांत गेले, आणि शाहाजीरा
जे ( आपा साहेब ) सातारचे गादी वर बसले
तेव्हां त्यांणीं सचिवाचा उपकार पाहून " चि
माणाजी रघुनाथ यांस दत्तक कायम केलें, ते
व्हां १५०० हजार रुपये नवीन घेण्याचे प्र-

तापसिंह राजे यांणीं ठरविले होतें, ते रुपये घे
ण्याचें माफ केलें.

शके १७६२ सन १८४० इसवीस राहा
जी राजे याणीं चिमणाजी पंडीत यांस चौघडा
[illegible]

चिमणाजी पंडीत यांस नाना साहेब ह्म
णतात, हे नाना साहेब हल्लीं आहेत, यांस द
त्तक घेतले; तेव्हा हे लहान, ह्मणून कारभार चा
लविण्यास मातुश्री गंगाबाई यांणीं कारभारी
नेमिले, आणि ते इंग्लिश सरकारानीं पसंत
केले; त्यांचीं नांवें.

१ दामोदर मोरेश्वर यांस आन्या असें ह्म
णत.

२ व्यंकाजी रंगनाथ. ( दादा फडणीस )

३ सदाशिव राव खंडेराव. ( + + + बजा
बानाना शिंदकर )

---

असे कारभारी नेमिले, या पुढें या कीं
सन १८४० शके १७६२ सालात दामोदर मोरे
श्वर हक्क झाले. त्यांचे जागेवर रामचंद्र कांही

( रामजी आपा ) यांस नेमिलें.

भिवर्गी कारभारी यांणीं शके १७७५ सन १८५३ पर्यंत कारभार केला.

चिमणाजी पंडीत नानासाहेब दौलती चा कारभार चालविण्यास योग्य व पोक्त व पाचे झाल्या वर इंग्लिश सरकारातून मुंबई सर्कीचे हुकुमानें सातारचे कमिशनर मेहरबान राईस्स वोगलवी साहेब यांणीं शके १७७४ फाल्गुन शुध्द अयोदशी सन १८५२ तारीख २२ मार्च रोजीं चिमणाजी पंडीत यांस आपले दौलतीचा कारभार स्वतंत्रपणें पाहण्याची मुक्त्यारी दिली. या मुकत्यारीचें पत्र सरकारास-माहुली मुकामीं पोचलें.

चिमणाजी पंडित यांचे लग्न शके १७६६ जैष्ठ शुध्द सप्तमी सन १८४४ इसवी सालांत-मल्हारराव आंबेकर यांचे कन्ये बरोबर मोर मुकामीं मोठ्या समारंभानें झालें; त्या बाईचें नांव ( वज्रचुडे मंडित सौभाग्यवती सरस्वती बाई ) यांस माईसाहेब म्हणतात.

चिमणाजी पंडीत याज बरोबर शके १७६२

सन १८४० इसवी सालांत सातारकर महाराज यांचे मुलकांतील दु अमली सवोत्रे अम्मलां चा अमलांतील अंमल काढून परस्पर अंम ल मोबदला झाला.

पुढें शके १७७६ सन १८५४ इसवी- चैत्र शुद्ध प्रतिपदेचे दिवशीं रुमुहुर्ता वर चि मणाजी पंडीत यांस पुत्र रत्न झालें, यांचें नांव शंकरराव ठेविलें आहे.

शंकरराव साहेबांस रावसाहेब असें ह णतात, यांचें पहिलें लग्न माघ शुध्द नवमी शके १७८३ सन १८६१ या वर्षी माधवराव वि ठ्ठल विचुरकर यांचे कन्ये बरोबर थोर मुका मी झालें,

हा लग्न समारंभ थोर मुकामीं फार मो ठा, आणि मौजेचा झाला. या समारंभास पंडि त प्रतिनिधी, फलटणकर, इफळे जहागिरदा र असे पुष्कळ सरदार व मानकरी व ग्रा- स्थी पंडित गुणीजन आले होते,

या लग्नास सुमारें एक लक्ष रुपयांहून अधिक खर्च झाला, लग्न झाल्या वर विंचूर

कर परत गेले ; त्याज बरोबर लग्न झालेली नवरी ही असून त्या नवरे मुलीच्या वारेने महा मारीचा वारवा होऊन विंचुर मुकामीं फाल्गु न शुद्ध ३ शके १७८३ म्हणजे लग्न झा ल्या वर पंचवीस दिवसांचे आंत त्या बाई स देवाज्ञा झाली. लग्न समारंभ हौसेनें व मो ठा झाला, दोन्ही सरदार व्याही यांजला- आनंद झाला, इतक्यांत अकस्मात असेंज हाल्या मुळें त्यांस आणि लोकांस किती दु:ख झालें असेल ; ते वाचणारांनीं ध्यानांत आणावें मी उगाच दु:खाची चर्चिक लिहून ग्रंथ वाढवित नाहीं.

पुढे रावसाहेब यांचे दुसरें लग्न कृष्णरा व विठ्ठल विंचुरकर यांचे कन्ये बरोबर माघशु द्ध ४ शके १७८४ सन १८६२ सालांत झालें. हा लग्न समारंभ नसरापूर मुकामीं मो रा पासून चारकोसा वर झाला. या बाईचें नांव सौभाग्यवति शिऊ बाई साहेब असें ठेविलें आ हे ; ह्या बाई लग्नात ३॥ वर्षांच्या असून हल्लीं कुमारें ४॥ वर्षांच्या आहेत ; हा जोडा फार उ

त्तम आहे.

या पूर्वोक्त दोनी लग्नांत सचीव पंडित आणि विचूरकर या दोनी सरकारचे मध्यस्तीं त बापुजी पांडुरंग पाटणकर व विष्णू गोपाळ भिडे हे होते.

मग शके १७८४ सन १८६२ इसवीस "सचीव पंडीत व यांचे वंशास आपले राज्या वर अधिकारी करण्यास जेव्हां औरस नसेल तेव्हां दत्त घेण्यास परवानगी आहे; आणि ही परवानगी निरंतर राहील;" म्हणून मदार राणी सरकारचे मंजुरीची सनद मदार लार्ड क्यानिंग साहेब व्हॉयसराय व क लकत्त्याचे गवरनर जनरल यांणीं पाठवि ली ती मुंबई सरकारांतून सातारचे कलेक्ट र मेहरबान जॉर्ज इनविरारिटी साहेब यां चे मार्फत मोहास येऊन पोंचली; ती सन द पोंचल्या वर ही सनद राज्याचा हटपा याचे होय. ईश्वर इछेनें आपल्यास और स वंश आहे, आणि पुढें ही होईल; परं तु काला तरानें कारण पडल्यास ही सनद उ

पकारक होईल म्हणून ही सनद घेण्या कर
तां नाना साहेब पंडीत यांणीं सभा करून
त्या समेंत गवरनरजनरल व राणी सरकार
यांचे आभार मानून सनद घेतली.

(हल्लीं या सरकारचे ताब्यांत किल्ले
व मुलुख आहे तो :)

रोहिडा (विचित्रगड, राजगड, रुधा
गड भारपचा किल्ला, तोरणा (प्रचंडगड),
चिंडगड, सरसगड, कठीणगड.

इतके तालुके व किल्ले आहेत; शिवा
य वतनी देशापांडे व कुळकर्णीपिण रोहिड
खोऱ्यांत व वेळवंड खोऱ्यांत आहे: या शि
वाय इनाम गांव व इसाफत गांव व शेऱ्या आ
हेत; यांचें उत्पन्न कमाल तीन लक्षरुपयांचे
आहे; या खेरिज मोंगलाईत गेलेला सवोत्रा
खेरीज बाकी सवोत्रा हल्लीं सुमारें पन्नास सा
हजाराचें उत्पन्न आहे. या उत्पन्नांत कि
ल्ले व गडकरी वगैरे यांच्या दुमाले नेमणुका
वगैरे पुष्कळ खर्च जाऊन खजिन्यांत सु
मारें दीड लक्ष रुपये येतात; इतका खर्च हु

जूर आहे; वर्षांतून बारापंधरा हजार रुपये पर्यंत नइमारत खर्च व दहा हजार रुपये पर्यंत देहेनगी खर्च होतो.

या इलाख्यांत मजा रुमारें बांरालक्ष पर्यंत आहे.

या सचिवाचे वंश परंपरेने यांचे राजधानींत मोर एथें श्रीरामनवमीचा उछाह चे भमासीं मोठ्या समारंभानें होत असतो.

चिमणाजी पंडित नानासाहेब यांणीं आपले कारकीर्दित आपले राज्यधानींत मोर एथें सडका रस्ते व निरानदीस घाट धरण वगैरे लोकोपयोगी खुष्कव कारखाने व इमारती केल्या. व रस्त्यांतून रात्रीचे दिवे वगैरे भोगत लावण्याची चाल केली. यांणीं भांबवडीचा बाग म्हणून मोरा पासून एक कोशावरज व मंदीर बाग उत्तम मजेचा बांधला आहे. अशी यांनीं अनेक चांगलीं कृत्यें केलीं.

चिमणाजी पंडित लहान होते; तेव्हांदो लतीचा कारभार चालविण्यास कारभारी नेमिले होते; त्यांज कडून दौलती चे जमाखर्चाची

हिशोब दरसाल इंग्लिश सरकारांत जात हो ता.

पुढें चिमणाजी रघुनाथ यांस मुकत्यारी आली; तेव्हा त्यांज पासून त्या दौलतीस क र्ज आहे; वगैरे कारणानें हिशोब द्यावा लाग त होता; परंतु आतां दौलतीस कर्ज नाहीं; व कारभारी यांज प्रमाणें हिशोब देणें जरूर नाहीं; असें समजून त्यांणीं मुंबई सरकारा रास लिहून काम चालविलें.

या गोष्टीचा मुंबई सरकारांनीं योग्य न्या यानें विचार करून शके १७८५ सन १८६३ इसवी साला पासून हिशोब घेण्याचें कार ण नाहीं; म्हणून सातारचे कलेकटर साहे ब बहादुर यांस हुकूम दिला.

ही गोष्ट मुंबई सरकारानें न्याया प्रमा णें केली; या कारणानें नामदार सरबारडर - फियर साहेब मुंबईचे गवरनर यांचे पत सा हेब फार आभारी आहेत.

चिमणाजी पंडीत सचीव यांणीं आपले स्वांत न्यायाची रीत उत्तम प्रकारची ठे वि

ली आहे. स्वतःसर्व कामें नियमानें वेळचे वे ळेस पाहतात; आणि ते फार चतुर विद्वान् आणि हुशार आहेत; या मुळें अनेक रीतीनें सुधारणा होऊन रयतेस सुख आहे.

पांजला ईश्वर इच्छेनें चिरंजीव आहेत व त्यांची बुध्दि फार चांगली आहे; म्हणून चिमणाजी पंडित यांणीं आपलें अवश्य क र्तव्य जें (चिरंजीवास उत्तम विद्याभ्यास क रविणें; व नीति मर्यादा करणें;) ही गोष्ट क रण्यास अन्न अमालिक वेळेस विसरूं नये ही प्रार्थना आहे.

समाप्त.

# सातारचे छत्रपतीमहाराज यांचे अष्ट प्रधानांतील मुजुमदार (पंतअमात्य) यांचे वंशाचा इतिहास.

बाळकृष्णपंत हणमंते व सोनोपंत म्हणून शिवाजीमहाराज यांचे बाप शाहाजी भोसले याजपाशीं-कारकून होते.

शके १५४८ सन १६२६ इसवी सालीं शाहाजीची स्त्री जिजाबाई गरोदार होती तिजला शिवनेरीचे किल्ल्या वर ठेवून शाहाजी विजापुरास गेले तेव्हां त्या बाईपाशीं बाळकृष्णपंत आणि सोनोपंत यांस ठेविलें होते.

शिवनेरीकिल्ल्या वर शिवाजीमहाराजांचा जन्म झाल्या पासून ते मोठे होवुन राज्यकारणाच्या मसलतीक रूं लागले तेथपर्यंत बाळकृष्णपंत व सोनोपंत त्याज पाशींच होते.

शके १५६३ सन १६४१ चे सुमारास प्रथम बाळकृष्णपंत हणमंते यांस शिवाजीमहाराज यांणीं मुजूमदार ही पदवी दिली.

शके १५६६ सन १६४४ चे वर्षी शिवाजीमहाराजानीं कोकणांत तळे, घोसाळे हे किल्ले घेतले त्यांजबरोबर सो

मोपंताचा मुलगा निळोसोनदेव होता त्याणें फार मर दुमी केली व पुरंदर किल्ला घेतला म्हणून शिवाजीनीं शके १५६९ सन १६४७ इसवीचे सुमारास बाळकृष्णपं त यांज करून मुजूमदारीचा दरक्क काढून तें पद नि ळोसोनदेव उर्फ आबाजीसोनदेव यांस दिलें.

शके १५८८ सन १६६६ इसवीचे सुमारास शिवा जीमहाराज दिल्लीस गेले तेव्हां मागें रायगीं कावीज के ले मुलखाचें बंदोबस्तास जे तीन मुख्य कारभारी होते त्यांत निळोसोनदेव हे होते.

शके १५९६ सन १६७४ इसवी साली राज्याभिषे क झाला तेव्हां अष्टप्रधानांनीं जांवें फारशी भाषेंत होतीं तीं संस्कृतभाषेंत रचिलीं यात मुजूमदार या स पंतअमात्य असें नांव दिलें आणि हें पद निळो पंत यांचे वडील पुत्र रामचंद्रपंत यांस दिलें.

पंतअमात्य यांचे राजमंडलांत असें काम होतें कीं दप्तरचे लिहिणें व सर्वकारखान्याची एक बेजीवि स्वराज्यांतील जमाखर्चाची चौकशी करावी असें हो तें आणि राजपत्राचर लेखनालंकार व शिरसुद्ध व तारीख इतकीं लिहिणें होत होतीं महाराजा कडून पंतअमात्य यांस पत्र लिहिणेंनें वर राजश्री नाव

लिहून पंडीत असें लिहून द्यावयीं बहुतकाय लिहि णें सुज्ञ असा असें लिहिण्याची चाल होती.

आमात्यपदाचीं वस्त्रें झालीं व पुढें नवीं वस्त्रें झालीं तेव्हां महाराजा कडून वस्त्रें व जवाहीर खालीं लिहिल्याप्रमाणें देण्याची चाल होती.

## वस्त्रें.

१ अष्टम सेरीसमयीं चादरछडीदार.

१ पदाचीं वस्त्रें मंदील, चादरछडीदार, जामेवार, किनखाप, पटका

---

१ शिकेकटार.

१ वस्त्रें, तलवार, ढाल

१ हत्ती, घोडा.

१ जवाहीर दागिने चार- शिरपेच, कंठीमोत्याची. चौकडामोत्याचा, तुरामोत्यांचा.

१ चौरी रुप्याचे दांडीची.

१ कलमदान ताडीचें.

---

या प्रमाणें देण्याची चाल होती आणि आमात्य यांणीं महाराजास भेटीचे वेळेस कोहीं मोहरा नजर

कराव्यालागत. ( बहुतकरून पंधरामोहरा नजर या व्यालागत.)

संभाजीमहाराज यांचे कारकीर्दित शके १६०२स न १६८० पासून शके १६१० सन १६८८ पर्यंत त्यांचे दुष्टस्वभावामुळें रामचंद्रनिळो हे बहुतकरून घरीच होते तथापि पदाची कांहीं उलटापालट झालीनाहीं.

शके १६१० सन १६८८ चे सालीं राजाराममहाराज कर्नाटकप्रांतांत गेले त्यांचे कबिले( स्त्रिया विग्रा लगाडावर होत्या त्यांजला महाराजाकडे जलमार्गा मे मोठें युक्तीनें पोंचविल्या व महाराज तिकडे असतां रामचंद्रपंत यांणीं पुष्कळ फौज जमवून विग्रा लगाड व रांगणा किल्ले वगैरे मावळांतील शिवाजी महाराज यांचा मुलुख मोंगलाचे हातात गेलेला सोडवून घेण्यांत पराक्रम केला.

शके १६१४ सन १६९२ सालीं रामचंद्र निळकंठ यांस चंदीहून राजाराममहाराज यांणीं हुकुमतपन्हा असा किताब पाठविला.

चंदीचंदावरा कडे राजाराममहाराज गेले त्यांज बरोबर जनार्दन नारायण हणमंते सुमंत हे होते त्यांणीं फार उपयोग केला म्हणून शके १६१४ सन १६९२

चे साली राजारामम्हाराज यांणीं निकडे अष्टप्रधा न नेमिले त्यांत जनार्दननारायण यांस आमात्यपद दिलें.

शके १६१९ सन १६९७ इसवीचे सुमारास रा जारामम्हाराज विशाळगडास आले तेव्हां चंदीक डे असतां रामचंद्र निळकंठ यांणीं इकडे मावळ व कोकणांत पराक्रम केला म्हणून त्यांजकडे आमा त्यपद कायम ठेवून जनार्दनपंत हणमंते यांस दु सरा अधिकार दिला.

शके १६२१ सन १६९९ इसवीचे सुमारें राजारा मम्हाराज वारल्यानंतर त्यांचे मागें त्यांची स्त्री ता राबाई ही आपला मुलगा अज्ञान शिवाजी यांचे ना वें राज्यकारभार चालवूं लागली तेव्हां त्याजपाशीं रा मचंद्र निळकंठ होते. शके १७२९ सन १७०७ इसवी या वर्षी शाहुम्हाराज मोंगलाचे कैदेंतून सुटून द क्षिणेंत आले तेव्हां ताराबाईशीं इमान गुंतल्या मुळें रामचंद्रनिळकंठ त्यांजबरोबर गेले नंतर राजाराम महाराज यांचें दुसरे पुत्र संभाजी यांणीं करवीरा क डे आपली राजधानी केली तिकडे रामचंद्रपंत राहि ले.

इकडे शाहुमहाराज दक्षणेंत आले तेव्हां त्यांज पाशीकर गदाधरभट जाशीकर म्हणून होता त्याणें वा देनें फार मदत केली व सहाय्य केलें म्हणून शाहुम हाराजानीं शके १६२९ सन १७०७ इसवी सालीं त्यां जला आमात्य पदवी दिली.

शके १६३० सन १७०८ चे सुमारास बाळकृष्णपं त व जनार्दनपंत हणमंते यांचे बंधु आबुराव शाहु महाराजास येउन भेटले तेव्हां ते पुरातन बहुचार असें जाणून त्यास आमात्य पदवी गदाधर यांजकडी ल काढून शाहुमहाराजानीं दिली.

शके १६६१ सन १७३९ इसवीचे सुमारास आबुरा व मयत झाले त्याचे बंधु [illegible] बाबुराव यां स शाहुमहाराजानीं आमात्यपदाची वस्त्रं दिलीं.

शाहुमहाराज मेल्या वर शके १६७२ सन १७५० इसवी सालीं सातान्याचे नजीक सांगोल्या चे मुक्कामीं रामराजानीं अष्टप्रधान [illegible] जीराव यां जकडून आमात्यपद काढून रामचंद्रपंत आबडकर यां च पुत्र भगवंतराव यांजला श्रीपतराव प्रतीनि धी यांचे रदबदलीमुळें दिलें.

शके १७०० सन १७७८ इसवी नंतर शाहुमहाराज

+ यासच शिवरामभट म्हणत

जांचे कारकीर्दीस शिवरामपंत यांचे नातु सर्वोत्तम बाबुराव यांजला धाकटे शाहु महाराजानीं आमात्यपद दिलें.

प्रतापसिंह महाराजाचे वेळेस शके १७५१ सन १८२९ इसवी सालीं सर्वोत्तम बाबुराव सातार्‍यास राजसेवेंत होते त्यांजकडे जमिनी व मोकासे वगैरे दाहा हजार रुपयांचें उत्पन्न व पांचहजार रुपये पेनशन इंग्रजसरकारांतून या प्रमाणें चालत होतें.

सर्वोत्तमबाबुराव यांजला औरसपुत्र नसल्या मुळें त्यांणीं भिकराव भास्कर नंदगांवकर यांचा पुत्र बाबा यांस दत्तक घेतलें ते बाबा सर्वोत्तम असतांनाच मेले. पुढें सर्वोत्तमबाबुराव मरणपावल्या नंतर प्रतापसिंहमहाराजानीं आमात्यपदवी बापुकान्हे फडणवीस यांस दिली त्यांची माहिती खालीं लिहिल्यांत येतआहे.

गोपाळ महादेव खांडेकर हे शिवाजी व संभाजी महाराज यांजपाशीं होते त्यांचे पुत्र धोंडोगोपाळ यांस शाहुमहाराजानीं फडणवीशीचा दरक दिला तो वारल्यावर रामराजे यांचे कारकीर्दीत कान्होधोंडदेव यांजकडून पेशव्यानीं फडणवीशीचा दरक का

ढून आपले तर्फे दुसरे कामगार ठेविले.

धाकटे शाहु महाराजा कडून बाजिरावसाहेब भा
न यांजकडे महाराजांचे नेमणुके बद्दल वगैरे ठराव क
रून घेण्यास चतरसिंगराजेभोसले गेले त्यांजबरोबर
बापुकान्हो हे होते ते स्वदेशीं आठ व हिंदुस्थानांत स
हा मिळून चौदावर्षे होते नंतर चतरसिंगराजा व
रोबर बाजिरावाचे हुकुमानें त्रिंबकजी डेंगळे यांणीं
नाशिकचे नजीक भाळेगावमुकामीं कैद करून जुन्नरा
नजीक जिवधन किल्ल्यावर कैदेंत ठेविलें.

शके १७३९ सन १८१७ सालांत इंग्रजी अम्मल
झाल्यावर ते कैदेंतून सुटून सातान्यास आले तेव्हा
त्यांजला खासगी कडील फडणीवीशीचें काम प्रताप
सिंह महाराज यांणीं सांगितलें नंतर ते पुण्यास म
हाराजसरकारचे नोकरलोक व आप्त यांचे लढाई अ
रेर चालत आलेले सरंजाम चालण्या बद्दल त्या स
नदा आणण्यास मेहरबान एल्फिन्स्तनसाहेब ब
हादुर यांजकडे प्रतापसिंहमहाराजानीं पाठविलें.

शके १७३९ सन १८१७ चे सुमारें मेहेरबान ग्रां
टसाहेबबहादुर यांणीं कृष्णारावकाने यांस सात
न्यास फडणवीशीचे कामावर ठेविलें नंतर शके १७४९

सन १८२७ इसवी सालीं कृष्णाराव मेल्या वर बापू
कान्हो यांस प्रतापसिंहमहाराजानीं दौलतीकडील
फडणावीशी सांगितली

शके १७५३ सन १८३१ सालीं बापूकान्हो यांस
आमात्यपद प्रतापसिंहमहाराजानीं दिलें ते बापुका
न्हो शके १७५९ सन १८३७ इसवीचे सुमारें मरणपा
वले त्यांचे बंधूचे पुत्र त्यांणीं दत्तक घेतले त्याचें ना
व सखारामबापूजी त्यांजकडे फडणावीशीचा दरक
कायम असून पुढें शके १७६६ सन १८४४ इसवीता
रीख २० अक्टोबर रोजीं त्यांस आपासाहेबमहाराज
यांणीं आमात्यपद दिलें त्यांजकडे आमात्यपदाचेसं
बंधानें कांहीं नवीन उसन्न दिलेंनाहीं. परंतु फडणी
वीशी बद्दल त्यांस दरमहा ५०० रुपये व एक इनाम
गाव आणि सुमारें ५०० रुपयांची इनामजमीन इत-
कें चालत होतें.

सातारचें राज्य इंग्रजसरकारांत आल्यानंतर मु
बई इलाख्यास जे याहिंदुस्थानचे पुरे माहितगार आ
णि सातारचे राज्यांतील लोकाविषयीं ज्यांस पुरीमा-
हिती आहे व यादेशांतील बडेलोकांचा कलवलाबा-
जगणारे आमदारसरवा रर लफीयरसाहेब हे गव्हर

नर होउन आले त्यांणीं सखारामबापुजी यांची हुशा
री, प्रमाणिकपणा व राजनिष्ठपणा जाणून त्याचे घरा
ण्यास कांहीं इनामीउत्पन्न करून देण्याविषयीं बंगा-
लासरकारचे मार्फत महाराणीसरकारास लिहिलें इ
तके संधींत शके १७८४ सन १८६२ ईसवी तारीख १०
जूनरोजीं सखारामबापुजी स्वर्गस्त झाले.

नंबर ४ तारीख १६ जानेवारी सन १८६३ इसवी
चा महाराणीसरकारचा ठराव हिंदुस्थानचे सेक्रटा
रीसाहेब सरचार्लसउड यांचे मार्फत बंगालसरकारां
त येउन त्याजवरून सातारचे कलेक्टरसाहेब मा
र्फत मौजे चिंचणेर तालुके सातारा हा गांव दोनहु
जाराचे दरसाल उत्पन्नाचा शके १७८५ सन १८६३
इसवी सालीं सखाराम बापुजी यांचे वंशास मिळाला
सखारामबापुजी यांस नारायणराव, माधवराव, गो
विंदराव आणि केशवराव असे चार पुत्र आहेत.

समाप्त.

# सातारचे छत्रपति महाराज यांचे अष्टप्रधा नांतील मंत्री (पाचनीस) यांचे वंशाचा- इतिहास.

शके १५६६ सन १६४४ इसवीस शिवाजीमहाराज यांणीं कोकणांत तळें, घोसाळें हे किल्ले घेत ले तेव्हां त्याज बरोबर गंगुमंगाजी म्हणून होता तो हुशार व शूर होता म्हणून शिवाजीचा त्याजवर लो भ असे.

शके १५६९ सन १६४७ इसवीस शिवाजीमहाराजानीं अष्टप्रधानाचीं नांवें फारशीभाषेंत ठेविलीं तेव्हां गंगुमंगाजी यांस पाचनीस हें पद दिलें.

नंतर शके १५८५ सन १६६४ इसवीचे सुमारास गंगुमंगाजी याजवर गैरमर्जी झाल्यामुळें त्याजकडून पाचनीशीचें पद काढून रत्नाजीभ्रिमल्ल म्हणून पागेकडे कारकून होता तो फार हुशार होता म्हणून त्यांस पाचनिशी सांगितली.

रत्नाजी भ्रिमल्ल याजकडे पाई पासून कोल्हापुरप यंत मुलखाची मामलत सांगितली होती.

शके १५९६ सन १६७४ इसवीस राज्याभिषेका

चे वेळेस अष्टप्रधानाचीं नावें संस्कृतभाषेंत ठेविलीं त्यांत धाकनीस यांस मंत्री असें नाव व पद दिलें ते व्हां दत्तोत्रिमळ मंत्री होते.

मंत्रीयांचे राजमंडळात असें काम होतें कीं मुदब खाची तर्तुद राखावी, आमंत्रण करावे व मसलतींत असावे. आणि राजपत्रावर समत, मंत्री व बार अशींनि शाणें करावीं. राजाकडून मंत्री यांस पत्र लिहिणें तें व र राजश्री (नाव लिहून) पंडित असें लिहून शेवटीं बहु त काय लिहिणें सुज्ञ असा. असें लिहिण्याची चाल हो ती.

मंत्रीपदास वस्त्रें देणें तीं खालीं लिहिल्याप्र माणें देत होते.

वस्त्रें.

१ प्रथम मेरीचे वेळेस चादरछडीदार.
१ पदाचीं वस्त्रें - मंदील, चादरछडीदार, जामेवार खिनखाप, पटका
१ शिकेकटार.
१ तलवार, ढाल.
१ हत्ती, घोडा.
१ जवाहिर - शिरपेच. चौकडामोत्याचा, कंठीमो-

त्याची , नुरामोत्याचा.
१ चौरी रुप्याचे दांडीची.

या प्रमाणें देण्याची चाल होती; आणि मंत्री यांणीं महाराजांस भेटीचे वेळेस कांहीं मोहरा नजर करा-व्याच्यागत. ( बहुतकरून दाहा मोहरा नजर कराव्या लागत. )

शके १६२९ सन १७०७ इसवीस शाहुमहाराज दक्षणेंत आले त्यांजला जेजुरीचे मुकामीं दत्ताजीभिमज जाउन मिळाले; तेव्हां महाराजानीं त्यांस पंजाजी ही पदवी दिली. आणि मंत्रीपदाचा अधिकार रामचंद्र भिंबक पुंडे यांस दिला.

शके १६३५ सन १७१३ चे सुमारें चंद्रसेनजाधव रावसेनापति शाहुमहाराजाशीं बिघडून मोंगलाईंत गेले तेव्हां त्याचे पदरीं नारोरामशेणवी म्हणून बालेघाटचे वगैरे मामलेकरीतहोते ते शाहुमहाराजास येऊन न भेटले तेव्हां शाहुमहाराजानीं त्यास ( रामचंद्रपंत पुंडे ) यांस काढून मंत्रीपदाचा अधिकार दिला.

कोकणप्रांतांत रत्नागिरीजिल्ह्यांतील मालवण ता लुक्यांत सावंताचे वाडीनजीक कोचरें म्हणून गांव आ

हे तेथील कुलकर्णी व त्या गांवचे राहाणारे रामजो णपंत यांचे पुत्र नारोराम हे शके १६२९ सन १७०७ चे सुमारास जाधवराव यांजपाशीं येउन राहिले ना रोराव यांस दुसरे दोन बंधु नरहर व भास्कर असे होते.

पालेघाटचे मामले व कांहीं सरदेशमुखीची मु स्तेगिरी याप्रमाणें शाहुमहाराजानीं नारोराम यांज कडे सांगितलें यास सुमारें २०००रुपयांचे उत्पन्नदि लें तें पुढें तपशिलवार लिहिण्यांत येईल.

या प्रमाणें पदाचा अधिकार मिळाल्यावर नारोरा म आपले बंधुसह सातारजिल्ह्यांत बागणी म्हणून गा व आहे तेथें राहूंलागले त्यांजला बागणी हा गांव इ नाम असून तो हल्लीं नारोराम यांचे बंधू भास्कर यांचे वंशा कडे चालत आहे.

शके १६७० सन १७४८ सालीं नारोराम मरण पावले; तेव्हां त्यांचे बंधू नरहर यांचा पुत्र घनःशाम या स घनःशाम नारायण असें नांव देवून त्यांस शाहुमहा राजानीं मंत्रीपदाचीं वस्त्रें दिलीं. त्यांजकडे सरदेशमु खीचें गांव व कांहीं फुटगांव मोंगलाईतील वगैरे उ त्पन्न देवून दिलें व अजाहून सरदेशमुखसुता-

लीक असा एक दुसरा अधिकार घनःश्याम यांचा चु लतबंधु भिवकरावभास्कर यांस दिला.

राके १७१३ सन १७९१ चे सुमारें प्रधान यांचे का रभारी हरिपंतफडके यांणीं भागणी हा गांव मंत्री यां जकडून घेउन (नारोराम मूळपुरुष) यांचे सर्वेबंधु भास्कर यांचा पणतू विठलभास्कर यांस दिला; आ णि सरदेशमुखीची वहिवाट बहुतकरून मंत्री यांज- कडील कादली.

नंतर धाकटेरामराजे यांचे कारकीर्दीत घनःश्या मराव मरण पावले त्यांचे पुत्र रघुनाथघनःश्याम यां स मंत्रीपदाचीं वस्त्रें दिलीं हे रघुनाथराव सातारइला ख्यांत सातार्‍याचे दक्षणेस वीसकोशावर इसलामपू र म्हणून गांव आहे तेथें मंत्री यांचे गणें होतें त्या गा वांत येउन राहिले.

रघुनाथराव यांचे बंधु नारायणघनःश्याम यांचा व त्यांचा तंटा चालल्या वरून पंतप्रधान यांचे कारभारी हरिपंतफडके यांणीं मंत्री यांचे उत्पन्नातून नारायण राव यांस दरसाल ८००० चें उत्पन्न नेमून दिलें तें नारायणराव सातारइलाख्यांत मौजे कोपरडें म्हणू न गांव आहे त्या लगत तुकाईचे वाडीस राहिले त्यां

चा वंश हल्लीं तेथें आहे.

शके १७२२ सन १८०० चे सुमारें बाजीरावप्रधान यांचे कारभारी बाळोजी कुंजीर यांणीं मंत्रीकडील इसलामपूरचेठाणें घेतलें; हल्लीं तेथें मंत्रीं सुरवबत्तुसाररवे आहेत.

भाकटेशाहुमहाराज यांचे कारकीर्दिस रघुनाथराव वारले त्यांचे पुत्र जैवंतराव व बचाजीराव. यांतून जैवंतराव यांस मंत्रीपदाचीं वस्त्रें शाहुमहाराजांनीं दिलीं

शके १७५१ सन १८२९ इसवीस मलापसिद्धमहाराजाचे कारकीर्दिस जैवंतराव मंत्री होते आणि त्यांजकडे उत्पन्न चालत होतें ते.

२५०० परगणें नर्सेराबाद मांत खानदेश एथील बाबती.

१००० वेरुळ मानीं तीन गांव आहेत.

७००० मौजे शेलगाव वेरारखानापूर.

१७०० खानदेशामातील कसबे धडेल व मौजे नांद गांव वगैरे गांवीं मोकासा.

२८०० नगरजिल्ह्यांत तालुके राहुरी. एकवीस व गैरे एथील बाबती.

२५०० मौजे आसनगाव तालुके सातारा व मौजे को
ळें तालुके कऱ्हाड.

१००० सातारइलाख्यांत फिरकोळ कांहीं जमिनी व
फोरेगांव आणि वाईनालुक्यांत नाडगौंडीपणा
चे वतन आहे.

---

या प्रमाणें उत्पन्न चालत होतें ते बहुत करून हल्लीं
चालत आहे.

जैवंतराव यांस पुत्र नसल्या मुळें त्यांणीं आपले
बंधु बचाजी यांचा पुत्र रघुनाथराव (बचाजी यांस एक
पुत्र रघुनाथ होता.) शके १७५१ सन १८२९ चें सुमारें द
त्तक घेतला.

प्रतापसिंह महाराज याचे कारकीर्दीस जैवंतराव म
रण पावल्यानंतर रघुनाथराव यांजकडे मंत्रीपदाचा अ
धिकार कायम होता.

ते रघुनाथराव हल्लीं कायम असून त्यांचें वयसु
मारें साठवर्षांचें आहे त्यांजला आनंदराव उमर वर्षे
व माधवराव उमर वर्षे २० असे दोन पुत्र आहेत.

या प्रमाणें वंश आहे.

# सातारचे छत्रपतिमहाराज यांचे मुख्य धानांतील सरनौबत (सेनापति) यांचे वंशाचा इतिहास.

---

शिवाजीमहाराजांस अभिषेक होण्यापूर्वी सरनौबत असा अधिकार फारशीभाषेंतील नावानें होता तोच संस्कृतभाषेंत राज्याभिषेकाचे वेळेस सेनापति हे पून झाला. सेनापति या पदाचा अधिकार मुख्य धानांतील पांचवा आहे. आणि फौज जमा करून पर राजाची लढायी करायी. व फौजेची तयारी व देखरेख ठेवायी असें सेनापतीचें काम आहे.

(सेनापतिपदाचीं वस्त्रें खालीं लिहिल्याप्रमा णें देण्याचीं चाल होती.)

## वस्त्रें.

१ प्रथम भेटीसमयीं चादरछडीदार.

१ पदाचीं वस्त्रें - मंदील, चादर, जामेवार, शिं
पाप, पटका.

१ शेलेकदार.

१ शस्त्रें - तलवार, ढाल.
१ जरिपटका.
१ चौघडा
१ हत्ती, घोडा
१ जवाहिर, शिरपेच, मोत्याचा तुरा, चौकडा मो
त्याचा, कंठी मोत्याची, जेहेगा.
१ चौरी सोन्याचे दांडीची.

---

या प्रमाणे देण्याची चाल होती.

सेनापति ही पदवी कोणते राजानीं कोणास दि
ली याची माहिती.—

शिवाजीचे लष्करांत मोठे मोठे शूर व लढाया
करणारे असे सरदार शिवाजीमहाराजांचे लोकांनी
च पुरुष होते. ह्मणून सन १६५३ सन १६५१
इसवीस शिवाजीमहाराजांनीं आपले फौजे
चा एक अधिकारी करून त्यास सरनोबत असें ना
व दिलें. आणि ही पदवी सध्यां माणकोजी दाताइ
तास दिली.

माणकोजी मेल्या वर शके १५८९ सन १६६७
इसवीचे सुमारें नेताजीपालकर यास सरनोबत ही

पदवी दिली.

शके १५८० सन १६५८ इसवीचे सुमारास अफसुलखान यास मतापगडाकिल्यावर शिवाजीमहाराजांनीं मारलें तेव्हां नेताजीपालकर याणें मोंगली फौजेचा लढाया करून फार नाश केला.

शके १५८४ शके १६६२ इसवीचे सुमारास नेताजीपालकर याणें शिवाजीमहाराज यांचा कांहीं हुकूम अमान्य केल्यामुळें राजगडाकिल्याचा सरनोबत मतापराव गुजर यास सरनोबत ही पदवी दिली. हा मतापराव शिवाजीनीं मोंगलीफौजेबरोबर ज्या ज्या लढाया केल्या त्यांत अमून मोठा यशस्वी व शूर असे त्याणें आपले कृत्यावरून दाखविलें. व शिवाजीबरोबर नो दिल्लीकडे गेलाहोता.

शके १५९३ सन १६७१ इसवीचे सुमारास रणमस्तखान व बहलोळखान यांजबरोबर पन्हाळ्यांतांत मतापरावसरनोबत यांची लढाई होऊन त्यांत मताप राव यांसजेजलेचा गोळा लागून ठार झाला. त्याप्रता परावार्चें लष्करांत धांडपरगण्याचा देशमुख हासाजी राव मोहिते म्हणून दुसरा एक सरदार होता त्याणें र णमस्तखानवबहलोळखान यांचा अगदी पराभव के

ला म्हणून त्या हासाजीस शिवाजीनीं हंबीरराव म्ह सा किताब देऊन सरनोबत ही पदवी दिली. त्याह साजीचे लष्करांत संताजीघोरपडे धनाजीजाधव, व्यं कोजीखांडेकर व बकाजीफरजंद हे मोठे पराक्रमीहो ते म्हणून त्यांस जुमलेदारी (पैजचे भागाचा अधिकार) दिला.

शके १५९६ सन १६७४ इसवी सालीं शिवाजी महाराजास राज्याभिषेक झाला तेव्हां हासाजीरावमो हिते हंबीरराव हेच सेनापति होते.

शिवाजीचे मरणानंतर शके १६०५ सन १६८३ इसवीचे सुमारें संभाजीमहाराजांचें पराभव करतां- मोंगलीफौज रुष्णातिरीं वाई एथें आली तेथें लढाई होउन त्यांत हासाजीराव मरण पावला.

संभाजीस मोंगलानीं धरून नेल्यावर राजाराम कर्नाटकांत चंदीकडे गेले तेव्हां त्यांजबरोबर महादजी नाईकपानसबळ, संताजीघोरपडे, धनाजीजाधव आ णि खंडेराव दाभाडे हे शिवाजीचे वेळेचे लष्करी सरदा र होते.

शके १६१४ सन १६९२ इसवी सालीं चंदीचे मु कामीं माहादजीनाईक पानसबळ यांस राजारामम्हा

राजयांणीं सेनापति हें पद दिलें तो थोडेच महिन्यां त मेला म्हणून सेनापति हा अधिकार संताजीघोर पडे यांस दिला. त्याणें आपसांत दुसरे सरदाराबरो बर लढायी करून अमर्यादा केली म्हणून त्यास ध रून मारला आणि सेनापति ही पदवी राजाराम महा राज यांणीं धनाजीजाधवराव यास दिली.

धनाजीजाधवराव याणें औरंगजेब यांचे सरदा राबरोबर मोठ्या लढाया करून तो राजाराम महा राज यांजबरोबर दक्षणप्रांतांत आला.

शके १६२९ सन १७०७ चे सुमारें शाहुमहारा ज दिल्लीहून आले. तेव्हां धनाजीहा ताराबाईकडू न शाहुमहाराजांचे परामर्षास गेला. पुण्याचे न जीक खेडकडूसगांवा वर लढाई होउन शाहुमहाराज स्वराज्य अधिकारी असें ठरवून संना पति त्यांस जाउन मिळाले तेथें शाहुमहाराज यांणीं त्यांचा सन्मान करून सेनापतिप- दाचीं वस्त्रें दिलीं.

सेनापतीचे लष्करांत त्याचे पदरीं एक फारफू न भालाजी विश्वनाथ भट (हेच पुढें प्रधान झाले.) हे होते व त्यांजकडे ५००० स्वाराची सरदारी होती.

शके १६३२ सन १७१० चे सुमारास धनाजी जाध व मरण पावल्या नंतर शाहु महाराजानीं धनाजीचा पुत्र चंद्रसेन यास सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. परंतु त्या पदाचा कारभार बहुतकरून बाळाजिविश्वनाथ हे चालवीत असत, यामुळें त्यांचे व चंद्रसेन यां चें मानसिक वांकडें आलें होतें.

शके १६३३ सन १७११ चे सुमारास मोंगलाईंतील सावती व चौथाईचा अम्मल बसविण्यास शाहु महाराजानीं चंद्रसेन सेनापति यांस पाठविलें ते ठाणें त्याजबरोबर बाळाजिविश्वनाथ होते, एके दिवशीं त्याचे लष्करांत पदाजी राउत यांचा व बाळाजिविश्वनाथ यांचे पदकांतील कारकून व्यासराव यांचा हरणाचे शिकारी वरून हत्तका तंटा पाडला कीं, त्या मुळें चंद्रसेन व बाळाजीविश्वनाथ यांचे अंतराय वाकडें येउन बाळाजिविश्वनाथ यांचा पक्ष शाहु महाराज तो शरण आल्या वरून त्याणीं घरला म्हणून चंद्रसेन शाहु महाराजा बरोबर उघड लढायी करण्यास तयार झाला आणि फिरोजखान नवाब यांजपाशीं मोंगलाईंत सरदारी धरून तेथून लढायी करण्यास आला; तेव्हां बाळाजिविश्वनाथ यास शाहु म

हाराजानीं सेनाकर्ते हें पद देउन चंद्रसेन यांजवर लढायीस पाठविला त्याणें चंद्रसेन यांचा अगदीं पराभवकेलाम्हणूनतोपरतमोंगलाईंत जाउन राहिला.

नंतर शके १६३४ सन १७१२ चे सुमारें जाधवराव यांचे घराण्यांतील संताजीजाधवराव यास आणून त्यास सेनापतिपद दिलें तें थोडकेच दिवसांत त्याजकडून काढून मानाजिंग मोरे यास सेनापति केलें तें पद सुमारें ७।८ महिने त्याजकडे होतें.

बाळाजि विश्वनाथ प्रधान यांणीं काठेवाड वगुजराथप्रांतांत अम्मल बसविला तेव्हां त्याजबरोबर खंडेराव दाभाडे हे असून त्यांणीं पुष्कळ मदत व शिपायगिरी केली म्हणून शके १६३५ सन १७१३ याचर्षी शाहु महाराजानीं खंडेराव यांस सेनापतिपदाचा अधिकार दिला.

पूर्वी शिवाजीमहाराजानीं राज्यव्यवस्था केली तेव्हां वैदिक व पंडित ब्राम्हण यांस श्रावणमासीं दक्षणा देण्याचें चालूकेलेंहोतें ती दक्षणा व कोटलिंगों-श्रावणमहिन्यांत दाभाडे यांणीं करावीं असें सांगून शाहुमहाराजानीं त्यांजकडून तळेगाव एथें चालूकरविलें.

दामाडे सेनापति यांजकडे गुजराथ अमदाबा द काठेवाड एथील मामले शाहुमहाराजानीं शके १६३५ सन १७१३ चे सुमारास सांगितले.

प्रधान यांचे लष्करांत दमाजी गायकवाड यांणीं दिल्लीस महमदशाह यांजवरोबर लढाई झाली त्यांत पराक्रम केला म्हणून शाहुमहाराजानीं दमाजीस समशेरबहादर हा किताब देउन सेनापतीकडील कामगार शके १६४० सन १७१८ चे सुमारें दिला.

शके १६४१ सन १७१९ चे सुमारें खंडेरावदादा डे धारले त्यांचे पुत्र त्रिंबकराव यांस शाहुमहाराजां नीं सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं.

शके १६४७ सन १७२५ इसवी सालीं खंडेराव-यांस फत्तेसिंगभोसले यांजवरावर कर्नाटकांत स्वा डणी घेण्यास पाठविलें.

शके १६५१ सन १७२९ चे सुमारास बुंदीवालेरा जे यांचे मातुश्रीतील तंटा मिटविण्यास हिंदुस्था नांत बाजीरावबल्लाळ प्रधान गेले होते त्यांजबरोबर त्रिं बकराव सेनापति होता, त्याणें किलेजखान मोंग ल यांसीं मिळून बाजिरावाचे नाशाविषयीं मसलत केली यामुळें त्रिंबकराव आणि बाजीरावप्रधान

यांची लढायी होउन त्यांत भिंवकराव ठार मेला.

शके १६५१ सन १७२९ इसवी सालापासून सेनापति यांजकडे श्रावणमासचीजीदक्षणाहोत होती ती पुणे मुक्कामीं प्रधान हे शाहुमहाराज यांचे आज्ञेवरून न देउंलागले.

भिंवकराव मेल्यामुळें त्याची आई उमाबाईला फार दुःख झालें तेव्हां शाहुमहाराजानीं तिजला सा न्यास आणून बाजिरावबल्लाळप्रधान यांचे सम जुतीनें भिंवकराव यांचा पुत्र एशावंतराव दाभाडे यां स सं शके १६५३ सन १७३१ सालीं सेनापतिपदाचा अ धिकार दिला. तो एशावंतजी दुर्व्यसनीं झाल्या मुळें गुजराथ व काठेवाड वगैरे भांताचा अम्मल गायकवा ड यांजकडे शाहुमहाराजानीं दिला.

शके १६७२ सन १७५० इसवी सालीं रामराजे यां चे कारकीर्दीत बाल्हाजि बाजिरावप्रधान यांजबरोबर एशावंतराव दाभाडे यांणीं सातारकिल्ल्या नजीक लढा मशी लढायी केली त्यांत एशावंतराव यास प्रधान यां णीं धरून तळेगांवास पोचविला..

चंद्रसेनजाधव मोंगलाईंत गेला म्हणून पूर्वी सांगितलें आहे त्याचा पुत्र रामचंद्रजाधवराव हा नि

जाम अल्लीरखान प्रधान याजवर लढाईस करतां चालून आला त्यांजबरोबर होता तो मोंगलाईतून निघून प्रधानास येउन मिळाला. पुढें निजाम अल्लीचा पराभव करून जाधवराव व माधवराव बल्लाळ प्रधान पुण्यास आले आणि प्रधान यांणीं शके १६८५ सन १७६३ इसवीसालीं रामराजाकडून सेनापतीपदाचीं वस्त्रें रामचंद्र राव यास आणूनदिलीं. पुढें रामचंद्रराव हा गुजराथप्रांत मागूंलागला तो नदिल्यामुळें पुन्हा मोंगलाईंत परतगेला.

शके १६८७ सन १७६५ इसवीचे सुमारास माधवराव बल्लाल प्रधान कर्नाटकांत गेले तेव्हां शिवाजीचे वेळेस संताजी घोरपडे म्हणून सरदार होता हे वर सांगितलें आहे त्याचा पुत्र मुरारराव घोरपडे याणें मदतीस येउन प्रधान यास मोठे सहाय्य केलें म्हणून सातारचे रामराजे यांजकडून सेनापतिपदाचींवस्त्रें आणवून प्रधान याणीं मुरारराव घोरपडे यास दिलीं. पुढें थोडकेच दिवसांनीं हैदरनाईक म्हणून कर्नाटकांत बंडावा करून होता त्याणें मुरारराव यास धरून कैदेंत ठेविलें; आणि त्याचा सर्व मुलुख घेतला तेव्हा पासून सेनापति हें पद बरेच दिवस कोणाकडे नव्हतें.

धाकटे शाहुमहाराज यांजकडून शके १७१९ सन १७९७ इसवी सालीं एशवंतराव यांस सेनापतिपदाची वस्त्रें देविलीं.

नंतर भिवरकजी भोसले पूर्वी प्रधान यांचे लढक रांत शिलेदार होते त्यांचे पुत्र चतुरसिंग हे धाकटे शाहुमहाराज यांजपाशीं होते त्यांचे पुत्र बळवंतरावभोसले हे प्रतापसिंहराजे यांचे फार मर्जीत होते म्हणून त्यांजला प्रतापसिंहराजे यांणीं सेनापति हें पद दिलें ते बळवंतराव वारल्यावर त्यांणीं एक दत्तकपुत्र घेतलाहोता परंतु आपासाहेबमहाराज यांचेकारकीर्दीत त्यांणीं सेनापति ही पदवी रघुजीराजे शिर्के यांस शके १७६१ सन १८४३ इसवी या वर्षी दिली ती त्यांजकडे शके १७७० सन १८४८ इसवी पर्यंत चालली.

समाप्त.

# सातारचे छत्रपति महाराज यांचे अष्ट प्रधानांतील डबीर (सुमंत) यांचे वंशाचा इतिहास.

शके १५८३ सन १६६१ इसवीचे सुमारास शिवाजीमहाराजानीं आपले लष्करांत व्यवस्थे करतां अष्टप्रधान केले त्यांत सोनोपंत म्हणून त्याचे लष्करांत होता त्यास डबीर हें पद दिले. सोनोपंत हा शिवाजीचे लष्करांत शके १५८३ सन १६६१ पासून होता.

शके १५८६ सन १६६४ इसवीचे सुमारास शिवाजीमहाराज दिल्लीकडे गेले त्याजबरोबर सोनोपंत यांचा मुलगा त्रिंबक सोनदेव हा होता. त्रिंबकसोनदेव हा शिवाजीमहाराजा बरोबर पुष्कळ हाल सोसून परत आला

शके १५९६ सन १६७४ इसवी साली राज्याभिषेक झाला तेव्हां अष्टप्रधानांची नांवें संस्कृत भाषेंत देवि ली त्यांत डबीर यांस सुमंत असें पद करून तेंपद जनार्दन नारायण हणमंते यांस दिलें.

सुमंत यांचे राजमंडळांत असे काम होतें की त्यां णीं परराज्यांतील वकिलाचें काम करावें आणि राज पत्राबर दरबाचे संबंधानें समत सुमंत हें निशाण

करावें. राजानें यांस पत्र लिहिणें तें वर राजश्री (ना
व लिहून) पंडित असें लिहून ओवरीं बहुत कायलि
हिणें मुजरा असा असें लिहिण्याची चाल होती.

सुमंतपदाचीं वस्त्रें खालीं लिहिल्या प्रमाणें महा
राजाकडून होत होतीं.

## वस्त्रें.

१ प्रथम भेटीचे वेळेस चादरछडीदार.
१ पदाचीं वस्त्रें - मंदील, जामेवार, चादरछडीदार
किनखाप पटका.

---

१ शिकेकटार.
१ शस्त्रें - ढाल, तलवार.
१ घोडी, घोडा.
१ जवाहिर - शिरपेच, चौकडामोत्याचा कंठीमो
त्याची, तुरामोत्याचा.
१ चौरीरुप्याचे दांडीची.
१ कलमदान नाडीचें.

---

या प्रमाणें देण्याची चाल होती. सुमंत याणीं म

हाराजा स भेटीचे वलेस - कांहीं मोहरा नजर करा ध्याला गत (बहुत करून दाहामोहरा नजर कराव्या लागत.)

शके १६०२ सन १६८० चेसुमारें जनार्दनना रायण यांणें संभाजीमहाराजांस कोल्हापुरचे किल्या वर कैद करण्याची मसलत केली म्हणून संभाजीनी त्यास रायगडास आल्यावर कैद करून त्याचे पायांत बिडी घातली.

संभाजीमहाराज यांस मोंगलानीं धरून नेल्याव र राजारामम्हाराज कर्नाटकांत गेले तेव्हां त्यांणीं ज नार्दननारायण यांस कैदेंतून सोडविलें तो महाराजां बरोबर कर्नाटकांत गेला.

शके १६१४ सन १६९२ सालीं राजारामम्हाराज- यांणीं चंदीचे मुकामीं अष्टप्रधान केलें त्यांत महादा जी गदाधर हणमंते यांस सुमंत पद दिलें. आणि ज नार्दन नारायण यांस आमात्य पदवी दिली.

शाहुमहाराज मोंगलाचे कैदेतून सुटून दक्षणें न येत असतां शके १६२८ सन १७०६ इसवीचे सुमारें औरंगाबादमुकामीं आनंदराव रघुनाथभोपळे हे औ रंगाबादेस सुखवस्तु राहात होते ते येउन भेटले ते

व्हांते हुशार व चतुर असें पाहून शाहुमहाराजांनीं
गोंस आपणा बरोबर आणले.

शके १६२९ सन १७०७ सालीं ताराबाईसाहेब यांजकडील सातारावगैरे किल्ले शाहुमहाराजानींघे तलें तेव्हां आनंदराव याणें चांगला शूरपणा व हुशारी दाखविली.

महादाजीगदाधर ताराबाईसाहेब यांस मिलाफी होते म्हणून त्यांजला काढून शके १६३२ सन १७१० चे सुमारें शाहुमहाराजानीं आनंदराव यांस सुमंत पदाचीं वस्त्रें दिलीं व कऱ्हाड मांलापैकीं नाडगौंडीचें वतन रुपये ५००० आणि खेरिज इनामीसरंजाम १००४१२॥ रुपयांचा दिला.

पुढें आनंदराव यांस निजामसरकारचे राज्यांत वकिलीस नेमिलें त्याणीं वकिलीचें काम चांगलें करून शके १६७० सन १७४८ इसवी सालीं स्वर्गस्थ झाले.

---

आनंदराव यास महिपतराव रघुनाथराव १५ ठलराव, आणि कृष्णराव असे चार पुत्र होते; त्यांतू न रघुनाथराव हे आनंदराव यांचे बंधु त्र्यंबकराव यां स दत्तक दिलें ते औरंगाबाद एथें सुखरूप राहिले

यांजकडे कांहीं सरंजाम राहिलानाहीं.

आनंदराव यांचे पुत्रापैकीं महिपतराव हे कर्ते व हुशार दिसल्यावरून राजाने शके १६७१ सन १७४९ इ सची साली सुमंतपदाचीं वस्त्रें देऊन सरंजाम व इनाम चालत आल्याप्रमाणें चालविला.

शके १६७३ सन १७५१ इसवीचे सुमारें रघुजी भोंसले यांचा दंगा झाला त्यांणीं मांत जामोदएथील मोकासा १५००० व मौर्तजापूर एथील मोकासा २५००० व कसबे डिग्गी प्रांत शेवगांव १५०० व प्रांत राजापुर बऱ्हांदे एथील मोकासा ४५०० या प्रमाणें घेतला. बाकी सरंजाम ५५४१२॥ रुपयांचा महिपतराव यांजकडे राहिला.

या संधीस महिपतराव यांचे सापत्नबंधुकृष्णाराव यांचा तंटा लागून कृष्णाराव यांजकडे ११८३५ व महिपतराव यांजकडे ४३५३७॥ या प्रमाणें सरंजामाच्या वाटण्या झाल्या.

शके १६७५ सन १७५३ चे सुमारें बाळाजिबा जीरावप्रधान यांणीं सरंजामापैकीं ३५३३७॥ रुपयांचा सरंजाम जप्त केला बाकी रुपये ११८०० इनका सरंजाम महिपतराव यांजकडे राहिला.

पुढें महिपतराव निपुत्रिक मरण पावल्यावर त्यांचे बंधु विठ्ठलराव यांस माधवराव नारायण प्रधान यांणीं सुमंतपदाचीं वस्त्रें राजाकडून देविलीं व चालत आलेला सरंजाम चालविला ते विठ्ठलराव शके १७११ सन १७८९ इसवी सालीं स्वर्गस्थ झाले त्या संधीस आणखी १५०० रुपयांचा सरंजाम जप्त झाला.

विठ्ठलराव यांस एक पुत्र जिवनराव होते त्यांजकडे सदर्हू सरंजाम व सुमंतपद चालले.

राघोबादादा प्रधान यांचा व निजाम अल्लीचा खेळ झाल्यावरून मोंगलाईत पीरजाद्यास सुमंत यांचे सरंजामापैकीं १४०० रुपयांचा मुलुख देविला बाकीं ८३०० रुपयांचा सरंजाम जिवनराव यांजकडे चालला.

जिवनराव यांजवर शेवटील बाजिराव प्रधान यांचा लोभ असे. त्यांजकडे प्रधान यांजकडील गणपतीचे उत्साहाचें व बागेकडील अशीं कांहीं कामें होतीं.

जिवनराव यांस दोन पुत्र झाले. त्यांतून महिपतराव हे शके १७३१ सन १८०९ इसवीसालीं जि

वनराव असतानाच वारले दुसरे गोपाळराव का यम होते.

शके १७३२ सन १८१० आषाद व ३ अमीस जिवनराव यांणीं परलोक साधला तेव्हां त्यांचे पुत्र गोपाळराव यांस बाजिरावप्रधान यांणीं पदाचीं व स्त्रीं देवविलीं हे गोपाळराव शके १७४३ सन १८२१ जेष्ठशुद्ध १५ रोजीं मृत्यु पावले त्यांची स्त्री वेणुबाई व महिपतराव यांची स्त्री कृष्णाबाई अशा दोघी हो त्या त्यांस पुत्र नव्हता.

गोपाळराव निपुत्रिक मेल्यामुळें त्यांचा फाय-दा जप्त करून बायांस इंग्रजसरकारांतून पेनशन झालें.

प्रतापसिंह महाराजांचे कारकीर्दित बळवंतराव मल्हार चिटणवीस यांस कांहीं दिवस सुमंतपदवी दिलीहोती परंतु त्या संबंधानें कांहीं उत्पन्न चालले नाहीं.

शके १७६५ सन १८४३ इसवी सालीं गोपाळरा व यांची स्त्री वेणुबाई यांणीं इंग्रजसरकार व महारा जसरकारचा हुकूम घेउन रामचंद्र या नांवाचा पुत्र विधानपूर्वक घेतला ते रामचंद्रराव हल्लीं सातारा

एथें आहेत व त्यांजकडे नाडगौंडीपणाचें वगैरे इनाम चालत आलेले उत्पन्न ते दत्तक झाल्या पासून चालें आहे.

मयत महिपतराव यांची स्त्री. कृष्णाबाई हिणें दुसरा एक अमृतरावया नांवाचा दत्तक घेतला होता; तो इंग्रज व महाराजसरकारानीं नामंजूर केला त्यांजकडे कांहीं उत्पन्न चालत नाहीं.

ती कृष्णाबाई शके १७६४ सन १८४२ इसवी सालीं मयत झाली व वेणूबाई शके १७७४ सन १८५२ इसवीसालीं मयत झाली.

मुळपुरुष आनंदराव यांचें पुत्र कृष्णाराव याजकडे ११८१५ रुपयांचा सरंजाम वाटून दिला असून वर सांगितलें आहे त्यांतून त्यांचे चिरंजीव मल्हारराव यांणीं निजामसरकारा पाशीं कांहीं राज्यकारण केल्यामुळें बाळाजिबाजीराव प्रधान यांणीं १००० रुपयांचा सरंजामजप्तकरून सरकारांत घेतला. मल्हारराव मेल्यावर त्याचा पुत्र आनंदराव यांजकडे राहिलेला सरंजाम चालत असतां शेवटील बाजिराव प्रधान यांची गैरमर्जी झाल्यामुळें ३३७५ रुपयांचा सरंजाम त्यांणीं जप्त केला नंतर आनंदराव वा

रले त्यांजला कृष्णराव व जिवनराव दोघे पुत्र असू न त्यांतून जिवनराव हे निरवंश मरण पावले दुसरे कृष्णराव हल्लीं असून त्यांजला तात्या व भापा मसे दोनपुत्र माहेत कृष्णराव यांजकडे १५०० रुपयांचा सरंजाम व कांहीं नाडगौडीचें वतन हल्लीं चालत आहे तें पुणेजिल्ह्यांत बारामतीमुकामीं राहतात

रामचंद्र गोपाळ सुमंत यांस शके १७६१ सन-अठराशें एकुणचाळीस इसवी सालीं आपासाहेब महाराज यांणीं सुमंतपदाचीं वस्त्रें दिलीं.

रामचंद्रराव यांस दोनपुत्र झाले आहेत एक मल्हारराव ९ वर्षाचा दुसरा खंडेराव पांच वर्षाचा असे दोन आहेत.

या प्रमाणें या पदाची माहिती आहे.

रामचंद्रराव यांस जगदीश्वर इच्छेनें दोनपुत्र आहेत व त्यांची बुध्दी चांगली आहे या साठीं त्या दोन्ही पुत्रांस विद्यान करण्यास रामचंद्रराव यांणीं असला अमोलिकवेळ व्यर्थ जाउंदेउंनये.

# समाप्त.

# सातारचे छत्रपतिमहाराज यांचे अष्ट प्रधानांतील न्यायाधिश यांचे वंशाचा इतिहास.

अष्टप्रधानांत न्यायाधीश हा सातवा अधिकार आहे आणि न्यायाधीश याचें काम न्याय करण्याचें आहे या पदाचीं वस्त्रें बहुत करून पटक्याखेरिज करून बाकी मंत्री यांचे इतिहासांत दाखविल्या प्रमाणें आहेत. निवाडपत्रावर समंत, न्यायाधीश व बार असें निशाण न्यायाधीश यांचें होतें.

न्यायाधीश हें पद फारशी व संस्कृतभाषेंत अष्ट प्रधानाचीं नांवें झालीं तेव्हां एकच नांवानें राहिले

(न्यायाधीश ही पदवी कोणास कोणते रां जानें दिली याची माहिती.)

शके १५८३ सन १६६१ इसवी सालीं शिवाजी महाराज यांणीं प्रथम निराजीरावजी यांस न्यायाधीश केलें नंतर शिवाजीमहाराज दिल्लीस गेले त्यांज बरोबर सोनोपंत डबीर (सुमंत) हे होते त्यांचे पुत्र बाळाजीपंडीत यांस शके १५९६ सन १६७४ इसवीस राज्याभिषेकाचे वेळेस न्यायाधीशही प

दवी दिली.

शके १६१४ सन १६९२ इसवी साली राजाराम महाराज यांणीं चंदीकडे निराजीरावजी यांस न्यायाधीशी केलें.

शके १६३५ सन १७१३ इसवीसालीं शाहु महाराजानीं जाधवराव सेनापति याजपाशीं होनाजी अनंत म्हणून कोणी गृहस्थ न्याय करण्यांत कुशल होते म्हणून त्यांस न्यायाधीशी ही पदवी दिली.

नंतर शके १६६१ सन १७३९ इसवी सालीं होनाजी अनंत मृत्यु पावले, त्यांचे बंधू काशी अनंत यांस शाहु महाराजानीं न्यायाधीशपदाचीं वस्त्रें दिलीं.

शके १६७२ सन १७५० इसवीसालीं रामराजे-यांणीं खंडेराव काशी यांस न्यायाधीशी केलें.

शके १६८५ सन १७६३ इसवीचे सुमारें मधान यांचे मुख्यकारभारी सखाराम बापू यांणीं रघुनाथ बाजीराव यांजकडून विठ्ठलशिवदेव यांस न्यायाधीशीचीं वस्त्रें रामराजे यांजकडून देवविलीं परंतु विठ्ठलशिवदेव बहुतकरून नेहमी पुण्यासच असत त्यास नावाला वस्त्रें मात्र झालीं होतीं.

धाकटे शाहु महाराज यांचे कारकीर्दीस आपाजी

खंडेराव यांजकडे न्यायाधीशी सांगितली.

प्रतापसिंहराजे यांचे कारकीर्दीस चिंतामण चिरकोभारे यांस शके १७५८ सन १८३६ इसवी या वर्षी न्यायाधीशा ही पदवी दिली ती त्यांजकडे तीन वर्षे होती.

आपासाहेबमहाराज यांचे कारकीर्दीस न्यायाधीशा ही पदवी कांहीं दिवस जोतिभिंबक फौजदार यांजकडे होती पुढें न्यायाधीशा ही पदवी कोणाकडे चालली नाहीं.

समाप्त.

# सातारचे छत्रपतिमहाराज यांचे अष्टप्रधानांतील न्यायशास्त्रीपंडीतराव) यांचे वंशाचा इतिहास.

अष्टप्रधानांत पंडितराव हा आठवा अधिकारी आहे आणि पंडितराव यांचे कामदानाध्यक्षतेचें व शास्त्र सांगण्याचें असें आहे या पदाचीं वस्त्रें बहुतकरून मंत्री यांचे इतिहासांत दाखविल्या प्रमाणें आहेत, राजपदावर संमत, पंडितराव असें करण्याचा चाल होती.

१ पंडितराव ही पदवी कोणास कोणते राजानें दिली याची माहिती पारशीभाषेंत अष्टप्रधानांचीं नावें होतीं तेव्हां न्यायशास्त्री असें म्हणत होते. शिवाजीमहाराज यांचे राज्याभिषेकाचे वेळेस संस्कृत भाषेंत नावें दिलीं तेव्हां पंडितराव असें देविलें आणि तीच पदवी तेव्हांपासून चालू झाली.

शके १५८३ सन १६६१ इसवीसालीं शिवाजीमहाराज यांणीं रघुनाथभट यांस दानाध्यक्ष केलें तेंपासून त्यांजकडे शिवाजीमहाराज यांचे कारकीर्दीतचा चाले

शके १६०५ सन १६८३ चे सुमारें संभाजीमहाराज यांचे कारकीर्दिस त्यांचे लोभांत असलेला परमदुष्टकवी कवजीकलुषा यांस त्यांणीं पंडितराव-ही पदवी दिली तो कवजीतुळापुरास औरंगजेबाचे लष्करांत शके १६१० सन १६८८ इसवीसालीं गारमारला

शके १६१४ सन १६९२ इसवीसालीं राजाराम महाराज यांणीं चंदीकडे श्रीकाराचार्य कालगांवकर यास पंडितराव हें पद दिलें.

श्रीकाराचार्य हे ताराबाईसाहेब यांचे लक्षांत यावून त्याजबरोबर करवीराकडे गेले म्हणून शके १६३५ सन १७१३ इसवीसालीं शाहुराजानीं मुदगलभट उपाध्ये यांस पंडितराव हा अधिकार दिला ते मुदगलभट वारल्यावर त्यांचे वडीलपुत्र रघुनाथराव यांजकडे पंडितराव ही पदवी चालली.

शके १७४९ सन १८२७ इसवीसालीं रघुनाथराव मृत्यु पावले नंतर त्यांचे वडील चिरंजीव रामचंद्र गंगाबावा यांस प्रतापसिंहराजानीं पंडितराव हें पद दिलें. त्यांजला (रघुनाथराव) यांजला आणखी दोन पुत्र आहेत त्यांचीं नांवें लक्ष्मणराव व बाळकृष्ण

राव

रामचंद्रराव पंडीतराव व लक्ष्मणराव व बाळकृ
ष्णराव हे त्रिवर्ग हल्लीं सातारा एथें राहात आहेत त्यां
तून लक्ष्मणराव यांस एक पुत्र लहान दोन वर्षांचा-
आहे बाकी दोघांस कांहीं पुत्र संतती नाहीं.

मुळपुरुष संपादन करणारे मुदगलभट यांचे बं
धु वासुदेवभट यांचा व मुदगलभट यांचे कनिष्ठपु
त्र जनार्दन यांचा असे दोनपुरुषांचा पुष्कळ वंश आ
हे परंतु त्यांजकडे पंडितराव ही पदवी नाहीं म्हणून
तो एथें लिहिण्याची गरज नाहीं.

पंडितराव यांजकडे हल्लीं मौजे चिंचणेर व वि
सापूर व चिमळे हे गाव व जमिनी कुळकर्णविगैरेभा
ग्दिस्सा जाउन सुमारें ५००० रुपयांचें उत्पन्न चाल
त आहे.

समाप्त

---

+ चिंचणेर गांव सखाराम बापूजी अमात्य यांचे वंशास इंग्र
जसरकारातून दिले आहे ते बरगे यांचे चिंचणेर व हे पंडीतराव यां-
जकडे चालत आहे ते डांगे यांचे असे दोन चिंचणेर गांव सातारजि०
त वेगळाले आहेत.

# साधारणमाहिती.
## सातारचे छत्रपतिमहाराज यांचे दरबा रांत बसण्याची रीत व मान होते ते.

---

मध्यभागीं सिंहासनावर छत्रपतिमहाराज - पाठीमागें हुजरे. पाणीमोर्चले, चामरे, पंखे पानदा न इत्यादि घेउन उभें राहावें सिंहासनाचे बाजूस आ प विश्वासू दाहाबारा उभे राहावे.

(महाराजांचे उजवे बाजूस अनुक्रमानें बसावयाते)

१ पंतप्रतिनीधी.
२ मुख्यप्रधान.
३ पंतअमात्य.
४ पंतसचीव
५ मंत्री.
६ चिटणवीस.
७ परराज्यांतील वकील
८ कारभारी - मुत्सदी तालुकेदार, मामलेदार व किल्लेदार योग्यते प्र०

महाराजांचे डावेबाजूस अनुक्रमानें बसावयाते.

१ पंडितराव
२ सेनापति.
३ सुमंत
४ न्यायाधीश.
५ फडणवीस.
६ सैन्याधिकारी. वगैरे

र शूर शिपाई योग्य
ते प्रमाणें.

त्यांचे त्यांचे मुतालिक व कारकून यांणीं आ
पले मालकाचे पाठीमागें बसावें.

दोन्ही बाजूस पाठीमागें कारखान्याचे नाईक व
हवालदार यांणीं उभें राहावें.

कचेरींत मुजरे करविणें, योग्यते प्रमाणें बसवि
णें परकी कोणी असल्यास वर्दी लावणें हें सर्व दोन
चोपदारानीं कचेरींत पुढें उभे असून करावें.

दरबारचे देवडीची चौकी चोपदार याचे ताब्यां
त असावी. कोणासदरबारास बोलावणें तें चोपदारा
नें शिपायी पाठवावे.

## छत्रपति महाराज यांची स्वारी चालण्याची रीति.

क्रमाप्रमाणें एकामागें एक.

१ पुढें जरीपटका व भगवे निशाणाचे दोन हत्ती.
प्रधान व सेनापति यांचे जरिपटक्याचे हत्ती २
सर्व फौजेतील निशाणें पागा करवलोक.

दालाईत सेनाधुरंधरपदाचेअधिकारी व सेनासाहेब सुभापदाचे अधिकारी बिनी रक्षणास

४ नोफरखाना, गाडया, रथ.

५ सरदार शूर हत्तीवर व घोडयावर

६ पायदळलोक, पटेकरी, विटेकरी, सांग, बत्ती बाणेकरी. खासबारदार, बंदुकीचेलोक.

७ रणवाद्ये, ताशेमर्फे, हालग्या वाजंत्री, शिंगाडे करणें.

८ कोतवाल हत्ती, सांडणी बाणाच्या कैच्या.

९ खासे घोडे कोतवाल.

१० मंगलवाद्यें शाहाजानें, कालुसनया घोडयावरन गारखाना.

११ भाट बंदीजन

१२ लग्या, निशाणें, बाणदार, जरित्वतोमूर, भाले, बोथाट्या चौपदार, मालदार वेत्रधारी.

१३ जेदीलमल्ल शूरलोक पायदळाचे.

---

इतकें पुढें चालून मध्यें छत्रपतिमहाराज हत्तीवर अंबारींत समोंवताली हुजरे, पायदळ सरदार मावळेलोक लगत पाठीमागे जनानरवाना.